सहामाही ,, ३ ,, ०८

सालअखेर ,, ७ ,, १०८

किरकोळ अंकास ....................... ४

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as

Six monthly............3 ,, 8 as

Single copy....................................1as

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०१०६

दुसरे खेपेस ........०१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines...2Rs.
per line; over10... 4 as.
Repetition perline 3sa.

VOL. XXVII | AKOLA MONDAY 7 AUGUST 1893 | NO.31

वर्ष २७ | आकोला सोमवार तारीख ७ माहे आगष्ट सन १८९३ इ० | अंक ३१


नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७
कलम६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मिसल. नंबर ९

१८९३

सिव्हिल जडज्य साहेब बहादूर जिल्हे अकोलें यांचे कोर्टांत.

नांव—गोराव केशवराव अ०पा० करणार व इष्टमित्र जनार्दनराव जैकृष्णराव देशपांडे.

राहणार—बाळापूर तालुके व जिल्हे—अकोलें यांस मयत.

के वराव बापाचें नाव जैकृष्ण रहाणार बाळापूर तालुके बाळापूर जिल्हा अकोलें यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यात येत आहे कीं त्यानीं ता. १७ माहे आगष्ट सन १८९३इ० रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. आज ता. ३१ माहे जुलई सन १८९३ इ.

V. N. Dandekar.

शिक्का सिविल ज्यडज्य.


## नाग नरसे

आली येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या, गाइ गोपा व कृष्ण (गाय गोऱ्ह्याचें द्वादशी करितां) व पिठोरी किंवा पाठोडा, हीं चित्रें ठेविलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर पैसे पाठविलें असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रें फारच सुरेख छापली आहेत. किंमत शेंकडा १॥ रुपया प्रमाणें. दोनशे घेणारास १। रुपया शेंकडा पडेल.

बाळकृष्ण अनंत कंपाझीटर
वैदर्भ छापखाना आकोलें


## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुकाम वाशीम ता. १।८।९३.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

येथें प्राथमिक शिक्षणा करितां नवीन शाळागृह व्हावयाचें आहे. त्या करितां सरकारानें ९००० नऊ हजार रुपये मंजूर केले आहेत पैकीं डिस्ट्रिक्ट बोर्डानें २००० दोन हजार द्यावयाचें ठरलें आहे. ही इमारत सन १८९४।९५ सालांत तयार होईल असें ह्मणतात. ही तयार झाली ह्मणजे हल्लीं जी एक ठिकाणीं शाळा आहे ती मोडून तिचे दोन भाग होतील इंग्रजी भाग हल्लींच्याच इमारतींत राहील व मराठी भाग नवीन होणाऱ्या इमारतींत जाईल. ही नवीन होणारी इमारत सर्व गांवांतील मुलाकरितां आहे व तीं मुलें ह्मटलीं ह्मणजे दहा वर्षांच्या वयापर्यंत असावयाचीं. ही इमारत मुलांच्या सोयी करितां बांधावयाची, तेव्हां ती सर्व मुलांना सोयीवार पडावी. ह्मणून गांवांच्या मध्यें असली पाहिजे. ही बांधण्या करितां मध्यभागीं जागा पाहिजे ती एक दोन ठिकाणीं जिल्हाधिपतींनीं पाहिली परंतु कांहींना कांहीं उणेपणा येतोच. गांवाच्या मध्यें जागा कोठें दिसत नाहीं. आतां असें समजतें कीं, शुक्रवार पेठेंत येथील राजे साहेब उदाराम यांचा रंगमहाल आहे. तेथें इमारत नाहीं. फक्त पूर्वीच्या रंगमहालाची जागा आहे. त्या ठिकाणीं ही इमारत बांधावी, असा जिल्हाधिपतींचा विचार ठरून तो विचार मि. हिगीन्स साहेब एक्झीक्यूटीव इंजिनियर यांना पसंत पडला असें ह्मणतात. ही जाग्याची निवड वास्तविक जर ठरली असेल तर ही गोष्ट बरी नाहीं. कारण वाशिमचे दोन भाग आहेत. एका बाजूस देवपेठ व दुसऱ्या बाजूस शुक्रवार पेठ तेव्हां वास्तविक पाहतां ही इमारत मधल्या भागांत कोठें तरी बांधिल्यास मुलांना सोयीवार पडेल. ह्या जाग्या संबधीं मे. डे. ए. इन्स्पेक्टर यांचा अभिप्राय मे. डेप्युटी कमिशनर साहेबांच्या अभिप्रायाहून वेगळा आहे. मे. डे ए. इन्स्पेक्टर यांचें ह्मणणें कीं ही जागा अगदीं एका बाजूस असल्यामुळें तेथें मुलें जाणार नाहींत. फक्त शुक्रवारचीच मुलें पाहिली तर २०।२५ सावर अधीक असतील असें मला वाटत नाहीं व तींही बहुतेक लोकांचीं. कारण त्या पेठेंत धनगर, चांभार, रजपूत, कोष्टी, माळी, मुसलमान व मारवाडी ह्मणजे ज्या जातींचें व विद्येचें सर्वदा विळपा मोपल्या इतकें वांकडें असावयाचें. बरें कदाचित मास्तर लोकानीं मोठ्या पराकाष्टेनें ओढताण करून अशा प्रकारचें मुलांना शाळेंत आणिलें तर तीं फार दिवस टिकतही नसतील. मग अशा लोकांच्या वस्तीच्या मध्यें शाळा गृह बांधणें ह्मणजे ९००० रुपये पाण्यांत टाकणें आहे. ही शाळा दुरवर विचार न करितां, वल्हान मुलांच्या अडचणी मनांत न आणतां जर कदाचित बांधली तर खरोखरच चालावयाची नाहीं व मग सरकाराला या गोष्टीचा विचार पडून ९००० नुकसान होईल. शिवाय शुक्रवार पेठेंत पाणी नाहीं. या करितां लोकांच्या अडचणी सर्व मनांत आणून, पुढें येणाऱ्या परिणाचा विचार करून मग योग्य वाटेल तें व जेणें करून लोकांचे हित होईल तें जिल्हाधिपतींनीं करावें अशी माझी सूचना आहे. या बाबतींत मे. डायरेक्टर साहेब बहादुरांना आमचे गांवाचे तर्फें विनंती कीं ही जागा बरोबर चांगली आहे किंवा कसें याचा ही त्यांनीं विचार करावा. कारण शाळा खात्याचें स्वामीत्व त्यांचे कडे आहे व त्यांचें करणें सर्व मान्य होईल करितां सदरील गोष्टी मनांत आणून जागा पसंत होईल व कांहीं प्राथमीक शाळेचें हित होईल असें करणें रावबहादुराकडे आहे साहेब बहादूर ही जागा समक्ष पाही पर्यंत बांधणेचें काम बंद ठेविण्या विषयीं हुकूम होईल तर बरें. नाहीं तर एकदा काम सुरू झालें व मग साहेब बहादुरांच्या मनास ती जागा आली नाहीं तर विचार चालावयाचा नाहीं व पैसे सरकारानें मंजूर केले तेव्हां ते कसे तरी खर्च झाले पाहिजेत असा जर सरकारचा विचार असला तर मात्र गोष्ट निराळी आहे. ज्यांना गरज आहे ते कोठें जरी इमारत असली तरी जातील. परंतु अशा वराला अजून आमचे गांवची स्थिती येऊन पोहोंचली नाहीं. घरांतच शिकविणारा असला तरी विद्या शिकून ती संपादन करावीशी फारच थोड्यांना वाटतें. मग लहान अर्भकांना लांब पाठवून ती केलीच पाहिजे. कांहीं होवो, असें ह्मणून निश्चयानें वागणारे फार कमी. आतां त्या जागेशिवाय गतीच नाहीं. तर सरकारानें इतके तरी करावें कीं, इंग्रजी शिकणारांची शाळा तिकडे बांधावी कारण इंग्रजी शिकणारी मुलें वयानें मोठी असतात. तेव्हां लांबीच्या पल्ल्यावर जाण्याची त्यांच्यामध्यें ताकद असतें—हा एक विचार आहे. दुसरा विचार असा मनांत येतो कीं, सरकारानें नऊ हजारामध्यें दोन इमारती बांधाव्या. देवपेठेंत अगोदर प्राथमिक शिक्षणाची चवथ्या इयत्ते पर्यंत शाळा आहेच ह्या शाळेच्या योगानें देवपेठेच्या मुलांची सोय झाली. बाकी दुसरा मधील भाग व शुक्रवार पेठ राहिली ह्या दोन भागांत वर ध्वनीत केल्या प्रमाणें दोन इमारती तितक्याच पैशांत होतील तेणेंकरून सरकाराला अधीक खर्च न पडतां लोकांची सोय होईल असें विचार आहेत त्या पैकीं, कोणताही का विचार पसंत पडेना त्यांत लोकांची सोय निघणार आहे—आतां पहावें लोकांच्या नशिबानें सरकारच्या काय मनांत येतें तें.

आपला
एक "क्ष"

## शिक्षण पद्धति

( एका अनुभवी शिक्षकाचा वहा )
( मागील अंकावरून पुढें चालूं. )

विद्यार्थी— समजलें गुरुजी. पावसानें जमीन ओली होऊन पुन्हां कोरडी होते, यास ही सूर्याची उष्णता हेंच कारण आहे. जमिनींतल्या पाण्याची वाफ होते आणि ती निघून गेल्या मुळें जमीन कोरडी पडते. असेंच गुरुजी

गुरु—बराबर. तर आतां लक्ष्यांत ठेवा कीं पावसाचें पाणी जमिनीवर पडतें, त्यापैकीं बरेंच पाणी वाहून नदीला मिळतें. कांहीं पाणी जमिनींत जिरून विहिरी आणि तळीं यांत उतरतें. आणि जें पाणी विहिरीच्या पाण्यापर्यंत पोंचत नाहीं, वरतींच राहतें, त्याची सूर्याच्या उष्णतेनें जमीन तापून वाफ होते. आपण विहिरीतलें पाणी वापरतों, त्याची ही शेवटीं वाफच होते. आणि नदीचें वाहत असतां उष्णतेनें त्याची ही वाफ होत असते.

वि०—गुरुजी या सगळ्या वाफेचें पुढें काय होतें?

गुरु—आकाशांत ही सर्व जमून तिचे ढग किंवा मेघ होतात. मेघांतून पुन्हां पाऊस पडतो हें तुह्मी पाहताच. असो, आपण बोलतां बोलतां आज निराळ्याच विषयावर बोलूं लागलों. नद्या कशा उत्पन्न होतात हें मी तुह्मांला आज सांगणार होतों. तें आतां सांगतों. मडक्याला भोंक नसतांही त्यांतलें पाणी झिरपतें हें तुह्मांला माहीत आहेच. त्या मडक्याला जीं बारीक छिद्रें असतात, तीं आपणास दिसत नाहींत, तथापि त्यांतून पाणी जाण्या जोगी तीं असतात. पावसाचें पाणी जमिनीवर पडलें, ह्मणजे त्यांतलें कांहीं पाणी जमिनीला जीं छिद्रें असतात, त्यांतून खालीं जात असतें. जमिनींत जागोजाग पोकळी असते, त्यांत हें झिरपलेलें पाणी जमा होतें. ती पोकळी भरली ह्मणजे जमिनीवरचें डबकें भरल्यावर जसें पाणीवरून वाहूं लागतें, त्याच प्रमाणें, त्या जमिनींतल्या भरलेल्या पोकळींतील पाणी वाट सांपडेल तिकडून वाहूं लागतें. अशा रीतीनें पाणी जमिनींतून इकडून तिकडे खेळत असतें त्या पाण्याला कधीं बाहेर पडण्याला मार्ग सांपडतो, तेव्हां तें बाहेर पडतें. जमिनींतून जेथें पाणी बाहेर येतें, त्या जागेस आपण झरा किंवा उगम ह्मणतों. अनेक झऱ्यांचें पाणी एकत्र वाहूं लागलें, ह्मणजे त्यास ओढा किंवा नाला किंवा ओहोळ ह्मणतात. अनेक ओहोळ एकत्र मिळून पाणी वाहत असतें, त्याला नदी ह्मणतात.

वि.— गुरुजी. आह्मांला आतां नदी कशी उत्पन्न होते तें समजलें; पण आमच्या गांवांत जसा पाऊस पडतो, तसाच आमच्या शेजारच्या गांवांतही पडतो; पियत आमच्या येथें जशी नदी आहे, तशी त्या गांवीं कां नाहीं?

गु.—( किंचित् हंसून ) आंगणांतलें पाणी वाहत वाहत कधीं पडवींत येईल काय? डोंगरावरून पाणी वाहत वाहत खालीं पायथ्यापाशीं येईल, परंतु खालचें पाणी कधीं

डोंगराच्या माथ्यावर वाहत जाईल काय? नाहीं जाणार. याचें कारण इतकेंच कीं पाणी नेहमीं उतरत्या प्रदेशाकडे वाहत जावयाचें. आमच्या या नदीला जिकडून एकदां उतरता प्रदेश मिळाला तिकडेच ती वाहत गेली आहे. जो गांव सपाट जमिनीवर असून आसपासही उंच जमीन नसते किंवा डोंगर नसतो त्या गांवाहून नदी उत्पन्न होत नाहीं. याचें कारण पाणी उतरत्या प्रदेशाकडे वाहतें हेंच होय. उंच जमिनींत मुरलेलें पाणी सखल खोल प्रदेशांत येऊन तेथें नदी उत्पन्न होईल, परंतु सपाट प्रदेशांत जें पाणी मुरतें त्या पाण्यानें त्या प्रदेशांत नदी कशी होईल? या वरून तुमच्या लक्षांत येईल कीं नद्या उंच प्रदेश म्हणजे डोंगर किंवा पर्वत यांच्या पायथ्या पासून उत्पन्न होतात. नदी जेथून होते त्या ठिकाणास त्या नदीचा उगम म्हणतात हें वर सांगितलेंच आहे. आसपास उंच जमीन असून मध्यें खोलगट जागा असते, त्यांत चोहोंकडे पाणी जमा होऊन एखादा मोठा तलाव होतो. तलावांत पाणी पुष्कळ होऊन तें उतरत्या प्रदेशाकडे वाहत जातें. या प्रवाहाला पुढें नदी हें नांव प्राप्त होतें. अशा रीतीनें कधीं तलावांतून म्हणजे सरोवरांतूनही नद्या उत्पन्न होतात. पुढें चा.

वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ वद्य १० शके १८१५

## पोलीस रिपोर्ट.

( सन १८९२ सालचा )

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

वरील तिन्ही कारणांचा सारांश घेतला पाहिजे तो निराळाच आहे. इनस्पेक्टर जनरल व रेसिडेंट यांचें म्हणणें एकच पडतें कीं, वकील लोक चांगले कायदेपंडित असतात म्हणून फौजदारी खटल्यांत अपराधांची शाबिती होऊन शिक्षा थोड्या प्रसंगीं होतात. तथापि गुन्ह्यांची संख्या कमी करावयाची आहे. तर गुन्हा न होऊं देण्याविषयीं खबरदारी घेण्यासाठीं कायद्यानें ज्या सवडी करून दिल्या आहेत त्यांचा यथास्थितपणें उपयोग केला पाहिजे आणि या शिवाय जिल्हा माजिस्ट्रेट व पोलीस सुपरिंटेंडेन्ट यांस अन्य साधनें देऊन कडेकोट बंदोबस्त ठेवण्यास लावलें पाहिजे. कांहीं गुन्हे पत्यांत मोठ्या बहादरीनें आणिले तरी त्या पासून परिणामीं गुन्ह्यांच्या एकूण संख्ये संबंधानें कांहीं फायदा नाहीं. ज्या मार्गांनीं गुन्हे घडतात ते मार्ग रोखून ठेवून गुन्हे करण्यास प्रवृत्त होण्या सारख्या लोकांवर देखरेख व पाहरा कडक रितीचा ठेविला पाहिजे. नेहमीं जे इसम गुन्हे करितात त्यांचे जातमुचलके व जामीन घेतले, त्यांचे छांदिष्ट चलनवलनास प्रतिबंध केला, आणि त्यांच्यानिमित्त ठिकठिकाणीं पोलीसांचीं ठाणीं केलीं तर अपराध कमी कमी होत जातील यांत काडीमात्र संदेह नाहीं. हल्लीं इंडिया सरकारच्या कायदेकौंसिलांत नित्याच्या अपराध्या साठीं एक नवें बिल तयार होत आहे तें पसार झालें म्हणजे कर्नल लेन साहेबांच्या म्हणण्या प्रमाणें बरींच साधनें अनुकूल होतील.

गुन्हा घडल्याची बातमी लागल्या नंतर पोलिसांनीं आपली कारवाई चालवून खटले न्यायाधीशांचे कोडतांत पुराव्यानिशीं सज्ज करून आणिले आणि त्या खटल्यांत पोलिसांस यश आलें असें शेकडा ३३.४ खटल्यांत घडलें. त्याच प्रमाणें वहिमावरून ज्या इसमांस पोलिसांनीं कैद केलें त्यांच्या पैकीं शेकडा ६७.७ इसम दोषी ठरून शिक्षा पावले. पोलिसांचा बंदोबस्त या दोन्ही कसोटीला लावून पहातां गुदस्ता प्रमाणेंच होता असें ठरतें आणि हा बंदोबस्त एकंदरीनें मध्यम प्रतीचा आहे. साही जिल्ह्यांची प्रतवारी त्यांच्या कामाच्या चांगुलपणावर लाविली आहे तींत वाशिम, इलिचपूर, बुलठाणा, उमरावती, आकोला, व वणी असा अनुक्रम आहे.

ज्या इसमांची चालचलणूक, कामधंदा व दीनचर्या हीं संशयात्मक असतात आणि त्यामुळें जे सार्वजनिक शांतता मोडतील किंवा चोरीचे वगैरे गुन्हे करितील असा संभव असतो त्यांस पकडून त्यांच्या कडून ते अपराध न घडतील अशाविषयीं जामीन घेण्या विषयीं कायद्यानें योजना केली आहे. या सवलतीचा उपयोग रिपोर्टच्या वर्षीं ७३ इसमा संबंधानें झाला त्या पैकीं, ५५ असामी वाशिम जिल्ह्यांतील मांग गारोड्यांच्या टोळी मधील आहेत तेव्हां बाकी ३८ इसम म्हणजे शिल्लक राहिलेल्या जिल्ह्यांतील सर्व एकुणात होय. जामीन घेण्याची पद्धत अधीक उपयोगांत यावी म्हणून खुद्द अलिशान रेसिडेन्ट साहेबांचें म्हणणें आहे. जुडिशिअल कमिशनरांच्या अभिप्राया प्रमाणें अपराध्यांना न्यायकोर्टाची मोठीशी भिती नाहीं कांकीं त्यांस चांगल्या कायदेपंडिताचा सल्ला मिळतो आणि कायद्या प्रमाणें शाबितीला पुरेसा एवढा पुरवा मिळत नाहीं म्हणून ते दोषमुक्त होतात; त्याअर्थीं अपराध घडू न देण्या साठीं पोलिसांना कायद्यानें जे अधिकार दिले आहेत त्यांचा पोलिसांनीं जोरदार रितीनें उपयोग केला पाहिजे. अपराध घडून अपराधी सांपडल्या नंतरची न्यायकोडताची पायरी आहे पण त्या पूर्वीच गुन्हा न घडेल अशा विषयीं कडक व सक्तीचा अंमल पोलिसानें गाजविल्यास त्यांत प्रजेचें फार कल्याण आहे. आतां हें खरें कीं हा अंमल गाजविते वेळीं कित्येक निरुपद्रवी अनाथास वृथा जांच होईल आणि तो होईल तितका कमी करणें हुशार अंमलदाराच्या हातची गोष्ट आहे. ( पु. चा.

## पार्लमेंटास वऱ्हाडतर्फे अर्ज

गेल्या ३० वे तारखेस रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या अध्यक्षते खालीं जी जाहीरसभा भरली तिनें नामदार पाल आदिकरून हिंदुस्थानच्या हितचिंतकांचे आभार मानले आणि सिव्हिल सरव्हीस परीक्षे विषयीं कामन्स सभेचा ठराव अंमलांत आणण्यासाठीं पार्लमेंट व इंडिया सरकार यांस धाडण्याचा अर्ज तयार करण्यासाठीं या प्रांतांतील कांहीं सार्वजनिक पुढाऱ्यांपैकीं पांचजणांची कमिटी नेमिली हें गतांकीं आह्मी कळविलेंच आहे. ही सभा सर्व प्रांतांतील लोकांच्या वतीनें झाली. आपला हक्क दुसऱ्यानें चालविणें कोणास आवडणार नाहीं तरी पण दुसरा आपला मनोगत जाणून आपल्या इच्छे प्रमाणेंच वागत आहे असें कळलें म्हणजे आपण त्या दुसऱ्याचे आभार मानतो. त्या प्रमाणें ही सभा अकोल्यास भरली व तिला उमरावती तर्फे खुद्द अध्यक्षच होते तसे इतर ठिकाणचे लोक येऊं शकले नाहींत तथापि इतर जिल्ह्यांतले लोक अकोलकरांचे फार ऋणी होतील कीं त्यांनीं त्यांची इच्छा पुरवली आणि मनोरथ श्रमाविणें सफळ केला. वैदर्भ कर्ते रा. रा. व्यंकटेश रामचंद्र व रावसाहेब देवराव विनायक या उभयतांनीं जाहिर सभा भरविण्याचें श्रेय घेतलें तसेंच ते कमेटी मार्फत अर्ज तयार करून तो वेळेवर पार्लमेंटाकडे व हिंदुस्थान सरकाराकडे रवाना केल्याचें कळवितील तेव्हां आह्मी विशेष आभारी होऊं. अध्यक्षांनीं सिव्हिल सरव्हीसच्या प्रश्नाची माहिती सांगितल्या वर रा. रा. गोविंद विश्वनाथ देशपांडे, व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर, व्यंकटेश कृष्ण देसाई, व शिवरतन सिंहवर्मा यांनीं सुरस भाषणें करून त्या विषयाचा इतीवृतांत सांगितला आणि तो ऐकून सर्वजणांनीं अनुमतिदर्शक आपआपले हात वर केले व आनंदोद्गारांनीं नामदार पाल व त्यांचे जोडीदार सभासद यांस सिव्हील सरव्हीस वरील ठरावा बद्दल आभार प्रदर्शित केले. पार्लमेंटास अर्ज धाडणें आवश्यक आहे असें कळविते वेळीं रावसाहेब देवराव विनायक मोठ्या विरश्रीनें बोलले. त्यांनीं राष्ट्रीय सभेचा प्रभाव कसा अद्भुत आहे हें चालूं सिव्हील सरव्हीस परीक्षेच्या कथानका वरून व्यक्त करून दाखविलें. नंतर त्यांच्या अर्ज धाडण्या विषयींच्या सूचनेस पाठबळ देण्या साठीं रा. रा. पांडुरंग बापूजी हे बोलल्या वर सर्वानुमतें अर्ज तयार करण्या साठीं कमेटी नेमण्यांत आली. तींत गृहस्थ आहेत ते येणें प्रमाणें:— गणेश श्रीकृष्ण खापर्डे, रंगनाथ नरसिंह मुधोळकर मोरो विश्वनाथ जोशी, देवराव विनायक दिगंबर, व प्रल्हाद नारायण जोग. उपसंहारपर अध्यक्षांचें भाषण होऊन सभा विसर्जित झाली.

## The Berar Samachar

MONDAY AUGUST, 7, 1893

The Indian Civil Service has at present become a *national* question. It affords good food for political thought and action. The resolution of the House of Commons in regard to the simultaneous examinations in India and England is a patent fact to every Native mind that can claim to know an iota of the Indian politics. A hearty support and welcome applause are the characterstic features of all the meetings held throughout the length and breadth of India in connection with this question of the simultaneous examinations. Bombay, Poona, Calcutta, Madras and all other important cities in India that have been the centers of political movements have one and all acknowledged the high debt of gratitude which the people of India owe to the Parliamentary champions of India's welfare. The problem that is agitating the Anglo—Indians as well the Natives is pregnant with important and crucial events. Even if the concensus of the members of the House of Commons does not gain due weight and influence with the Government of India so as to put into execution the resolution of the honorable House. It is no small advantage to see the seed of political education sown in the Indian heart and it augurs well that the nation will in no immediate future reap the golden fruit of it. A national victory will not be won in a day but the beginnings of that onward movement prognosticate a brilliant future for the continuous labours of the National Congress. Whether the India Government opens or not the doors of fair and honorable competition for the Indian Civil Service one fact is quite certain that it is getting very hard and trying with the rulers to shuffle its righteous duty to the millions of a loyal and devoted people.

Following in the wake of other sister povinces the people of Berar have publically discharged their duty in the general meeting assembled at Akola on 30th ultimo. Mr. Ganesh Shrikrishna Khaparde B. A. L. LB was unanimously voted to the chair.

Mr. Khaparde, on taking the chair said, that the subject which brought the people together was of great importance. As early as 1858, and even before that, the claims of Indians to the highest posts under the British Administration were recognized, but the recognition was only in theory. It was not translated into practice. To do this various attempts have been made, and the last of them was made by Mr. Paul the other day in England, and it has succeeded so far as to secure a vote of the House of Commons. "To congratulate Mr. Paul on his success, to express our sincere and heartfelt acknowledgments to him for his disinterested labours, and to show to the world at large that the India of today takes deep interest in all questions concerning India, we have come together today, and I have no doubt you will by your vote today give emphatic contradiction to those who assert, that it is only the educated few of India, and ignorant many of England, that make up the agitation."

Mr. Govind Rao Deshpande proposed:—

That the people of this Province most sicnrely thank Mr. Paul and the philanthropic band of Hon'ble members who are very disinterestedly fighting the battle of the inhabitants of India in Pariiament and hereby put on record their sense of deep greatfulness for the resolution carried by Mr. Paul in the House of Commons in favour of simultaneous examinations in India and England for the Indian Civil Service.

He gave a history of the question Mr. Vyankatrao Mudhalkar seconded the proposition in a forcible speech and Mr. V. K. Desai supported it in an able speech with numerous illustrations and humorous incidents. Mr. Shivaratansingh also made a capital speech in Urdu in support of the proposition, and pointed out that the interest of all communities in this respect was one, and the same.

Raosaheb Devarao Vinake Digamber proposed:—That a petition respectfully and earnestly praying for the immediate carrying out of the Resolution of House of Commons, on the subject of the simulta-

neous examination in India and England, for eligibility to Indian Civil Service, be prepared by a committee consisting of the following gentlemen:—

Mr. G. S. Khaparde Raosaheb Devarao
" R. N. Mudholkar Vinayak
" M. V. Joshi Mr. P. N. Jog

and submitted to His Excellency the Viceroy and to the Honorale the House of Commons under the signature of the chairman.

Raosheb Devarao said that it would not do to rest satisfied with the vote of the House of the Commons. It is our duty now to put forward our whole strength and bring about the complete carrying out of the resolution. It is not of a kind that will be readily executed by the executive Government. It is not a matter like that of the currencyon which a resolution was adopted and carried out almost in a day.

---

There is Habitual Drunkards' Act in England for the last 14 years and a time has come when India should have something of the kind. Many addicted to drinking are not lunatics in law but are worse than them in action. Mr. T. B. Tuke contributes to the 19th century an essay upon the subject and his views would recommend themselves to an Indian reader. He writes thus:—

"The plain fact is, the great benefits which would accrue from the passing of a strong Act to inhibit the action of inebriates would be protection to the families and the public, and the custody of estates. It is certain that a small proportion can be cured, and that a compulsory measure would act as a powerful deterrent, strengthening the hands of the relatives and physicians. Probably the compulsory clauses would seldom require to be enforced, for their existence would exercise pressure in the direction of voluntary seclusion. But the benefit to the mass would be in the direction indicated. Surely this is no small matter At present the condition of the family is unendurable, and the future is imperilled. A person who is practically irresponsible has it in his uncontrolled power to squander his last six pence, and it not unfrequently happens that all dependent on him are reduced to actual ruin. The best they can look for is his death. Protection would be obtained if provision were made by which the inebriate in all cases ( i. e. whether submitting voluntarily, or committed, to control) should be compelled to relinquish the management of his affairs, his estate being placed in the hands of committee or a curator; *the period of curatory not to terminate with the period of confinement.* Restitution of civil rights should only be procurable after evidence of reformation and capacity has been laid before a properly constituted authority."

---

The latest number of 'India' contains a fair criticism of the policy of aggrandisement that is the prevailing ideal with the Government of India:—

"Ever since Lord Lytton, instigated by the Marquis of Salisbury, inaugurated his imperial policy, ( with the sole exception of th[e] all too brief period of Lord Rip[on]'s benficent rule ) the frontiers of India have never been free from officially arranged murder and r[o]bbery. I mentioned in our last iss[ue] (p. 165) how an attempt was successfully made to saddle King Th[i]bau personally with the responsibility of executions carried out as a part of the established state policy of the kingdom of Burma. I should like to know which of the three latest Viceroys of India, Lords Lytton, Dufferin, and Lansdowne, if tried before a just and impartial tribunal, could escape the extremest penalty for the bloodshed and rapine, for which they have each been responsible—and that not as a part of our national policy but in frank defiance of that policy, and of the explicit declarations of our Queen and Parliament. Another aggression is being prepared for, a military road from Darjiling towards Lhassa is in hand. No doubt if any one puts question in the House of Lords or Commons, this fact may be denied, but it is, as I believe, a fact all the same; and when a few years hence a further advance into Tibet is deemed desriable, an army will roll swiftly into the devoted country, and as in Burma the honest defenders of their native soil, who armed with bows and arrows, seek to oppose our ruthless aggression, will be published to the world as robbers and murderers, and swept down by gatlings and reating rifles which the Government of India is not ashamed to use against virtually unarmed men, whose only fault is that they love their freedom and their country, and have no wish to be down—trodden by foreigners and enslaved. Will no really Liberal and Christain British statesman keep his eye on this matter?" India.

## A HAPPY NEWS

We congratulate the son of our Rao Bahadur Jathar ( Mr. Kashinath Shriram Jathar ) on his being appointed an Attache to the Resident. If there be a rule that a son of a government servant be given a priority of claim for service provided he has otherwise qualified himself for it this appointment quotes the rule for the best use that can be made of it. With his home education under the direct control of a first-class educationist and with that highly appreciated University learning which he is at present receiving Mr. Kashinath Shriram has ably qualified himself for the post and we heartily wish him every success, honor, and dignity in his new walk of life and our best desire is that he prove himself a worthy son of his revered father.

---

## वऱ्हाड.

हवामान —भीज पाऊस या आठवड्यांचांगला पडला आणि पावसाचीं सुलक्षणें आकशांत दिसत आहेत त्यामुळें लोकांची हरिणकाळजी दूर होऊन पिकपाण्याची आशा पुन्हा लागली. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं'

रा. रा. गणेश गोपाळ दहिगांवकर क्लार्क आफ कोर्ट वाशिम यांस सहा महिन्यांची फर्लो मिळल्या वरून त्यांचा १५० रुपये पगार मि. सैफुदीनखान क्लर्क आफ कोर्ट यास देऊन त्यांच्या १२५ वर रा. रा. नारायण राघवेंद्र येथील स्माळकाजचे क्लार्क आफ कोर्ट. यांस वाशिमास बदलून त्यांचे जागीं रा. रा. पांडुरंग सखाराम अग्निहोत्री जुडिशिअल कमिशनरचे डेपुटी क्लर्क यांस आकोल्यास १०० वर आणिलें.

रा. रा. गोविंद नारायण वकील उमरावती यांनीं काल सायंकाळीं येथील वर्षोत्सव व्याख्यानमालेंत दुसरें व्याख्यान दिलें. विषय महाबळेश्वर वर्णनाचा होता.

यंदाच्या वऱ्हाडच्या- वकिली साठीं ४ उमेदवार असून शिवाय ४ उमेदवार हैदराबाद रेसिडेन्सी कोर्टांतील वकिलीसाठीं आहेत.

रा. रा. त्रिंबक गणेश परांजपे आफि. ए. अ. कमिशनर यांस पहिले वर्ग. माजिस्ट्रेटाचे अधिकार देण्यांत आले.

**अभिनंदन.** रा. राजश्री काशिनाथ श्रीराम जठार ( राव बहादूर डायरेक्टर यांचे ज्येष्ठ चिरंजीव ) यांस आलिशान रेसिडेन्ट साहेबांचे अट्याची नेमलें ही बातमी आह्मी मोठ्या आनंदानें कळवितों. रा. रा. काशिनाथव पूर्वी बी.ए. चा अभ्यास करीत आहेत तेंव्हां त्यांच्या सारख्या शिकलेल्या वऱ्हाडच्या श्रेष्ठ व सर्वमान्य अधिकाऱ्याच्या चिरंजीवाची अट्याचीच्या जागीं योजना झाली ही बहुत बहु उत्तम गोष्ट झाली.

रा० रा० बाळकृष्ण काशिनाथ जोशी अट्याची यांस असिस्टंट कमिशनर नेमल्याची दुसरी आनंदकारक खबर कळते. ही खरी ठरली तर दुधात साखर होय!

---

### नोटीस.

रा. रा. उरजमल रघुनाथ मारवाडी दुकान पिंपळगांव राज्या या दुकाणचे काम करणार गंगाराम बच्छराज मारवाडी यांस.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे येक जवारीचें पेव अजमास ( ७ ) सात खंडीचे आमचे जागेत आहे तें पेव अजमास सात आठ वर्ष जाहाली तुम्ही भरलें आहे. करीतां तुम्हांस नोटीसिने कळविण्यात येतें की तुम्ही आमचे भाडे दरसाल रुपये ( १५ ) प्रमाणे तुम्हीं पेवातील जवारी काहाडण्याचे तारखे पर्यंत चुकते केल्या शिवाये जवारी काढूनये जर काढाल तर तुंम्हांस आमचा नोकर पुंजाजी वल्लद हसाजी माळी हा प्रतीबंध करील त्याजबद्दल तुमची पुढें बिलकूल तकरार ऐकली जाणार नाहीं. करिता तुंम्ही सर्व भाडें वर लिहील्या प्रमाणें आमचे नौकरास देऊन नंतर पेंव काढावें तुंम्ही पेव काढता अशी वदंतां ऐकल्या वरून ही नोटीस तुम्हास दिली कळावें ता० ५।८।९३ इ०

( सही )
गोविंद अंताजी चितळे
दस्तुर खुद.

---

### नोटीस.

रा. कड्या वा॥ येकोबा शेनोळ राहणार मौजे आसलगांव तालूके जळगांव यांस— या नोटीसीनें अजी मर्द कड्या शेनोळ राहणार आसलगांव हल्लीं वस्ती औवें तालुका मलकापूर जिल्हा बुलढाणा इजकडून—तुह्मास या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं तारीख २ आगष्ट सन १८९० रोजी तुह्मी मला गंधर्वानें बायको केली व मला चांगले रीतीनें वागण्याबद्दल दस्तऐव खुद्द तुमचे सहीचा लिहून दिला त्या प्रमाणें मला नऊ महिनें तुह्मी वागविलें पुढें तुह्मी मला फार जाचणूक करून व मारहाण मारूंन आंगावरील डागीनें काढून घेऊन हाकलून दिलें. त्या दिवसा पासून मी माझे आई बापाचें घरीं आहे. आज सव्वा दोन वर्षे झालीं. मी माझे उदर पोषणास लोकाचें कर्ज रुपये १५० काढलें. ते रुपये देऊन तुह्मी मला घेऊन जावें. नाहीं पेक्षां मी तुह्मी दस्तऐवजांत लिहून दिलेल्या शर्तीं प्रमाणें गंधर्वाच नवरा करून जाईन, कारण तुह्मी मला असा दस्तऐवज लिहून दिला कीं जर मी तुला उत्तम रितीनें वागविणार नाहीं तर तुला लिहून दिलेला दस्तऐज हाच तुझी फारकती असून तुला गंधर्व करण्यास माझे कडून मनाई नसून तूं दुसरा नवरा केला असतां तुझेवर माझा हक्क चालणार नाहीं अगर मी तुजवर दावा करणार नाहीं. नोटीस दिले दिवसा पासून ६ दिवसाचें आंत निकाल जर केला नाहीं तर मी खास गंधर्व करून जाईन. तुमचे कोणेतही प्रकारें तकरार ऐकणार नाहीं. शिवाय तुह्मीं मजला डागिण्या सुद्धां नवरा करून जाण्यास परवानगी दस्तऐवजांत लिहून दिली असून डागीने काढून घेतले त्याबद्दल मी दावा करून डागीने भरून घेइन व खास गंधर्व करून जाईन करितां वरील मुदतींत निकाल करून नोटीसीचा खर्च व माझा झालेला सदरील पोट खर्च द्यावा नाहीं पेक्षां रितीनें तरतुद करीन ह्मणून दिली नोटीस तारीख ३ आगष्ट सन १८९३ इ०

सही.
अजी मर्द कड्या शेनोळ
राहणार औवें निशाणी
खुद्द बगांडीची

---

### नोटीस

नोटीस बेशमी मोतीराम तुळाराम या नांवाची दुकान मालक वोसन दपाल अज्ञान पालन करणार ताराबाई जवजे मोतीराम दुकान बजाजी राहणार पेठ उमरावती. यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आमची भाजी बाजारांतील मकान विकत तारीख २१।४।९३ इसवी रोजीं घेतले व बयाना बद्दल रुपये ५० पन्नास दिलें परंतु तुह्मी आजून पावेतों खरेदीखत करून घेतलें नाहीं व आमचे रुपये दिले नाहीं व तुह्मास पहीली नोटीस तारीख १५।७।९३ इसवी रोजी दिली असून त्या नोटीसीत आठ दिवसाची मुदत दिली असोन त्याचाही जबाब दिला नाहीं करितां या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी नोटीस पावले तारखेपासून ४ दिवसांचे आंत आमचे रुपये ऐन व्याजा सुद्धां दाखल करून द्यावे. जर दाखल न केल्यास आह्मी बयान्याचे रुपये वापस न देतां दुसऱ्यास मकान विक्री करून व कमी किंमत आल्यास त्या सुद्धां नुकसानी तुमचे जवळुन भरून घेऊ व नोटीसीचा खर्च व उमरावतीस येण्या जाण्याचा खर्चासुद्धां दिवाणींत दावा करून रुपये घेऊ मग तुमची तकरार ऐकिली जाणार नाहीं ते कळावें तारीख ६।८।९३ इ.

( सही )
रामराव कृष्णराव जाहगीरदार बाबुळगांव तर्फे मु. वामन खंडेराव.

---

## वर्तमानसार.

स्पेनची दान जान नावाची आगबोट बोटेत आग लागून जळाली व २०० माणसें ठार झाली.

मीठ कोठें कसें ठेवावें, कसें वाळवावें, वगैरे बाबतींत मुंबईसरकारानें नवे नियम करून ते गेल्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध केले आहेत.

झेलम येथें महापुरानें पुष्कळ प्राण्यांचा व मालमिळकतीचा नाश झाला व रेल्वेचा रस्ता बंद झाला.

दिल्ली पासून भातिंडापर्यंत व भावलपूर पर्यंत रेल्वेचा एक फाटा करण्यास कलकत्त्याची एक व्यापारी कंपनी तयार झाली आहे. अशा वेळीं आमच्या नेटिव व्यापाऱ्यांनीं असल्या कामांत पुढें सरावें हें अवश्य आहे.

माझोली येथें गोरक्षणाच्या संबंधानें बखेडा उत्पन्न होण्याचा संभव दिसत असल्यामुळें गोरखपूर येथील कांहीं लष्करी लोक तेथें पाठविले आहेत.

काश्मिरांतील बारा मोहोल्ला येथील तार आफीस, पोष्टआफीस व रहदारी बंगला यांचा महापुरानें विध्वंस केला.

ता. २७ रोजीं विलायतच्या पार्लमेन्ट सभेंत ठोसाठोसी झाली. ऐरिश होमरूल बिलांतील पैशाच्या संबंधाचीं कांहीं कलमें मि. ग्ल्याडस्टन यांणीं बदलून आणलीं त्याबद्दल चर्चा होत असतां कांहीं मेम्बरांनीं हातघाईवर येऊन एकमेकांस ठोसेही लगावले!

विलायतचें इंडिया आफीस अजी काढून टाकावें व प्रत्येक वीस वर्षांनीं हिंदुस्थानच्या कारभाराची पार्लमेन्टानें तपासणी करावी असा एक कायद्याचा मसुदा सर वेडरबर्न व मि. दादाभाई हे पार्लमेन्टपुढें ठेवण्याकरतां तयार करीत आहेत.

सयामचीं सर्व लढाऊ गलबतें व त्यांवरील फौज बंदरावर उतरून हातांत सुरे घेऊन शत्रूवर हल्ला करण्यास अगदीं तयार आहे. नदी काठच्या राजवाड्याच्या रक्षणार्थ टारपेडोचा पाहारा ठेवला आहे.

शहरावर भडीमार करण्यास जास्त आरमाराची आवश्यकता आहे व सायामकडून खचित सामना होणार सायामची १२००० फौज सज्ज असल्यामुळें लढाई जुंपल्यास ती बरीच लांबेल यांत कांहीं शंका नाहीं.

मेकांग नदीच्या डाव्या आंगच्या प्रांताचें फ्रान्सानें मागणें केलें हें पाहून चीन चकित झालें आहे. त्या नदीच्या दोन्ही आंगचा पुष्कळ लांबपर्यंतचा प्रांत आपला आहे असें चीनचें म्हणणें आहे.

चीनसरकारानें फ्रान्साच्या विरुद्ध व्हावें अशी चीनांत असलेल्या मांडेरियन लोकांची खटपट आहे.

सायामच्या हद्दींत ज्यांचें हितांहित आहे अशा लंडनशहरांतील व्यापाऱ्यांनीं लार्ड रोजबरी यांस एक पत्र पाठविलें असून त्यांत हल्लींचा तेथील प्रकार फार भयंकर झाला असून फ्रान्सानें सायामास जी धमकी दिली आहे ती सायामची योग्यता कमी करणारी असून बंदर बंद करण्यानें इंग्लिश व्यापाराला अडथळा आणणारें आहे असें कळविलें आहे.

इंग्रजांचें एक लढाऊ गलबत बांकाक येथें जाण्याकरतां हांगकांग येथून रवाना झालें.

सायमच्या गल्फमधील बेट फ्रेंचांनीं कबजांत घेऊन आपला बावटा लावला.

बांकाक येथील इंग्रजांचे जीव व मालमता यांचे रक्षण करण्यांत येऊन हल्लींच्या प्रकाराकडे दुर्लक्ष करण्यांत येणार नाहीं असें लार्ड रोजबरी ह्मणाले.

सिमल्यापर्यंत रेल्वे करण्याचा विचार पुन्हा सुरू झाला आहे.

हिंदुस्थानांत इतक्यांत रुपये बंद करून सोन्याचे नाणे सुरू करण्याचा विचार नाहीं असें सर लुबकच्या प्रश्नास मि. ग्ल्याडस्टन यांणीं उत्तर दिलें.

बीहनसराई व लोरेन्सपूर यांच्या दरम्यानचा रेल्वेरस्ता महापुरानें वापरण्यास नालायक झाला हारो नदीवरचा पूल पार वाहून गेला आगगाडी व तारायंत्र हीं दोन्हीं बंद पडलीं आहेत. झेलम प्रांतांतही महापूर झाल्यानें सिंध सागर रेल्वेचा रस्ता अगदीं खराब झाला आहे.

रावळपिंडी प्रांतांतील लेन्सडौन्स महापूर येऊन फार नुकसान झालें व पुष्कळ माणसेंही मेलीं. वजिराबाद येथील शेतें अगदीं निरुपयोगी झालीं. चनाब नदीच्या काठचीं सर्व शेतें वाहून गेलीं व गुरे व घरेंही गेलीं. झेलमें नदीच्या आसपास चहूंकडे पाणीच पाणी झालें आहे पाच खेडीं अगदीं साफ नाहींशीं झालीं व झेलम शहरचा निमे भागही उध्वस्त झाला. शेकडो लोक घरां दारां वाचून उघडे पडले आहेत.

महापुरानें पंजाबांत फार नुकसान झालें.

ठा० अ०

—एम. टुरपिन नांवाच्या गृहस्थानें लढाईंत अतिशय संव्हार करणारें एक नवीन यंत्र शोधून काढिलें आहे. त्याची रचना साधी आहे, व तें विजेच्या योगानें चालविलें जातें. असें ह्मणतात कीं, त्याचा महत्वाचा भाग ह्मणजे एक हलकी दोन चाकांची गाडी असते. त्यांत गोळे फेंकणाऱ्या यंत्राचे दोन चार भाग असतात. चार गोलंदाज असले ह्मणजे या यंत्राच्या योगानें पंधरा पंधरा मिनिटांच्या अंतरानें दरतासास चार भडिमार करितां येतात; व बावीसहजार चौरस मिटर जागेवर पंचवीसहजार जळजळीत शस्त्रें फेंकलीं जातात. यावरून समरांगणांत उपयोग केला असतां हें यंत्र मनुष्यांना चण्या प्रमाणें भाजीत नेईल असें दिसतें.

फार मोठा कालवा—रशियन सरकार काळा समुद्र व कास्पियन समुद्र यांना जोडणारा एक कालवा तयार करण्याच्या विचारांत आहे; त्याची सर्व्हेसुद्धां झाली आहे. हा कालवा झाला ह्मणजे रशियाचा अशियाखंडातील व्यापार सुलभ होईल. सु.प.

कागद तयार करण्याची कला आतां इतकी उत्तम दशेला आली आहे कीं, बादतें झाड कापून त्याचा छापण्याजोगा उत्तम कागद तयार करण्यास पुरतें चोवीस तास सुद्धां लागत नाहींत. करमणूक.

नागपूर शहरांत पटकीच्या आजारानें कांहीं माणसें दगावलीं अशी बातमी आहे.

येत्या भाद्रपद वद्य षष्ठीस कपिला षष्ठीचा योग आहेत. न्या. सु.

जुनागड संस्थानापैकीं प्रभासपट्टन येथें ताबुदांच्या मिरवणुकी संबंधानें मुसलमान लोकांनीं मोठा भयंकर दंगा करून कित्येक खून केले, हिंदु लोकांचे मुख्य देवालय आणि सर्व देवस्थानचीं देवळें जाळून टाकलीं आणि मूर्ती फोडल्या एकंदर ११ हिंदु ठार मारले गेले. त्यांत देवळांतील तिघा पुजाऱ्यांना तर त्या अधमानीं रॉकेल तेल ओतून जीवंत जाळले! याशिवाय एक देवी डाक्टर, एक डाक्टर, एक जेलर व एक कंपौंडर असे ठार झाले. जखमा तर पुष्कळांस झाल्या. सर्व गांव अगदीं घाबरून गेला असून लोकांनीं सरकाराकडे दाद मागितली आहे.

स्टेट रेल्वेवरील लोकल व पासेंजर ट्रेनमधील तिसऱ्या वर्गाचा दर १॥ पै करवा असा विचार घाटत आहे.

शेतकीसंबंधी एक कान्फरन्स येत्या ता. २ अक्टोबर रोजीं भरविण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें असून त्या करितां शेतकी खात्याचे डायरेक्टर्स व दुसरे मोठे कामगार पाठवावे असें इलाख्याचे सरकारांस फर्माविण्यांत आलें आहे.

एक्सचेंजच्या उतरत्या भावामुळें परदेशी गहूं जाण्याचा बंद होऊन पंजाब व नार्थ वेस्ट प्राव्हिन्सेसमध्यें धान्याची स्वस्ताई होईल असें पायोनियरकार ह्मणतात.

अमेरिकेंत एकानें असें यंत्र काढिलें आहे कीं, तें पुढें ठेवून बोललें असतां लांबपर्यंत बोलणें ऐकूं जातें. हजारों लोक एखाद्या मैदानांत जमून त्या सर्वांना ऐकूं जाईल? इतक्या मोठ्यानें बोलण्याची जी अडचण होती ती या यंत्रानें दूर झाली. आतां दहा दहा वीस वीस हजार मनुष्यांस बोलणाराचे बोलणें सारखें ऐकूं येतें. शिवाय या यंत्रांत मजा ही आहे कीं, सर्व लोकांना बोलणाराचा आवाज सारख्याच स्वराचा ऐकूं येतो; जवळच्या मनुष्यास मोठा व दूरच्यास लहान असा येत नाहीं! अमेरिकन लोक काय काय करतील याचा नेम नाहीं!

अलीकडे नवे एक शिवण्याचे यंत्र तयार करण्यांत आलें आहे ते चालविलें असतां एकीकडे शिवून एकीकडे सुंदर रीतीनें गात असतें.

दुधावर कर — काशी येथील म्युनिसिपालटीनें दुधावर कर बसविल्यामुळें तेथील दुधवाले अहीर लोकांनीं गांवांत दूध विकण्याचें बंद केलें आहे, यामुळें लोकांचे फार हाल होत आहेत. क०त०


नोटीस

राजमान्य राजश्री रघुनाथ दास 'रामप्रताप साहू दुकान अकोलें यांस—

नोटीस देणार मोतीलाल राम गोपाळ मारवाडी दुकान हिवरखेड तालुके अकोलें याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, आह्मी तुह्मास आमची लिहिलेली हुंडी आमचे वर संमत १९५० मिती आषाढ वद्य १४ प्रथमची रुपये ५००० पांच हजाराची मुदत दिवस १२१ ची तुह्मास दिली त्याचे मोबदल्याचे रुपये सदासुख सिताराम दुकान खामगांव यांस पटविले ते रुपये सदासूक सिताराम यास तुह्मी अद्याप दिले नाहींत. व आह्मास पावती अद्याप सदासुख सिताराम यांची पावती आली नाहीं वरून नोटीस देतों कीं, ही नोटीस पावल्या पासून चोवीस तासांचे आंत सदासुख सिताराम यांची पावती आह्मास आणून द्यावी अगर आह्मास रुपये देऊन आमची पावती घ्यावी तसें न केल्यास रीती प्रमाणें तजवीज केली जाईल. व हुंडी रद्द समजून मुद्दतसीर रुपये दिले जाणार नाहीं कळावें. मिती आषाढ शुद्ध ४ रोज सोमवार संमत १९५० ता० १७ जुलई सन १८९३ इ.

पूर्वी नोटीस रजिष्टर करून दिली होती ती तुह्मी घेतली नाहीं. ह्या नोटीसीचा जबाब तीन दिवसांत द्यावा.

( सही. )

मोतीलाल राम गोपाल मारवाडी दुकान हिवरखेड दस्तूर खुद्द.

नोटीस

किसन वलद नारायण सावरकार राहणार मौजे माझोड तालुके आकोलें यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्याचें कारण कीं मी तुझी लग्नाची बायको असून शिवाय तूं मौजे खानापूर येथील माळी नांव उकडी याची बायको जनी इजला चोरून आपले घरांत आणून ठेविले होते त्यामुळें तुझेवर पातुर कोर्टांत फिर्याद होऊन १० रुपये दंड ही जाला सबब विनाकारण मजला रोजचेरोज तुह्मी मारहाण करून अखेर नागदिवाळीचे चवथे दिवशीं मजला घरांतून हाणून दिलें तेव्हांपासून आज तारखे पर्यंत मजला वस्त्र व खाण्यापिण्यास कांहींच दिलें नाहीं. सबब मी सुमारें आठ महिन्या पासून लोकांचें कर्ज काढून खालें. आतां मजला कर्जही मिळेना व पोटास भाकरही मिळेना सबब मी नारायणराव देशपांडे तांदळीकर यांचे जवळ दोन रुपये महिना व पोटाला भाकर असें ठरवून नोकरीस राहिलें असून त्यांचे जवळून रुपये घेऊन लोकांचें कर्ज देऊन टाकिलें आहे. हल्लीं तुह्मांस नोटीसीनें कळविलें जातें कीं आज तारखे पासून आठ दिवसांत तुह्मी मौजे तांदळी येथें येऊन नारायणरावांचे रुपये मी घेतलेले देऊन टाकावेत आणि मजला तुमचे गांवांत नेऊन वेगळे घर बांधून देऊन माझी अन्नाची व वस्त्राची सोय करीत जावी असें विषयीं तुह्मास या पूर्वीही जातीनें ह्मटले ते तुह्मी ऐकले नाहीं. ह्मणून नोटीस देण्याचें कारण पडलें. वर लिहिलेले मुद्दतींत जर तुह्मी, मी आठ महिने लोकांचें कर्ज काढून खाल्लेला पैसा देणार नाहीं तर तुमचेवर दिवाणी दावा करून पैसा घेतला जाईल. नोटीशीचा खर्च तुमचेवर आहे. कळावें ही नोटीस दिली. तारीख ३१।७।९३ इ०

( सही )

बनी मर्द किसन सावरकार हल्लीं राहणार तांदळी खुर्द निशाणी बांगडी असे.


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ,, ३ ,, ८९
साळअखेर ,, ७ ,, १८
किरकोळ अंकास ..........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ......०१

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy.................................4as

Advertisement
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4 as.
Repetition perline 3a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL. XXVII AKOLA MONDAY 14 AUGUST 1893 NO.32

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख १४ माहे आगष्ट सन १८९३ इ० अंक ३२

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध ३ शके १८१५

## नफ्यानें शेती देणें

( शेतकऱ्यांची बुडणूक. )

शेतकरी ह्मणजे जो शेत वाहतो तो. याहून अधीक व्यापक अर्थ आह्मांस नको. शेतामध्यें कष्टमशागत करून त्याच्या उत्पन्नावर जो चरितार्थ चालवितो असेच लोक 'शेतकरी' या संज्ञेखालीं येतात अशी कल्पना केली ह्मणजे शेतकरी लोकांचा जो खरा वर्ग निघतो त्यांची स्थिति फारच शोचनीय आहे. कांहीं लोक सामान्यतः शेतकऱ्यांमध्यें मोडत असतात त्यांचा समावेश वरील अर्थानें शेतकऱ्यांच्या गटामध्यें होऊं शकत नाहीं. ज्यास कांहीं रोजगार धंदा नाहीं त्यानें खुशाल ह्मणावें कीं मी शेतकरी आहे असा अलिकडे प्रघात आढळतो. मोलमजुरी करणारे कामकरी पुष्कळजण शेतकऱ्यांमध्यें मोडतात आणि ते कधीं प्रसंगीं हंगामाच्या वेळीं मोलमजूरी इतर कामाप्रमाणें शेतकामामध्यें करितात. हा मजूरदारांचा वर्ग वगळला तसा आणखी कांहीं विशिष्ट जमीनदार लोकांचा वर्ग निराळा काढला पाहिजे. हे जमीनदार ह्मणजे सरकारचे प्रत्यक्ष फाळेदार. सरकारचा सारा दिला ह्मणजे त्याचें स्वामित्व ह्या जमिनीवर पूर्णपणें चालतें. जमिनीचे खरे मालक असे वरील शेतकऱ्यांच्या वर्गांत कित्येकजण सांपडतील पण त्या शेतकऱ्या शिवाय पुष्कळ शेट सावकार, पैसेवाले, पांढरपेशे लोक, व इनामी जमेदार इत्यादि लोक जमिनीच वास्तविक मिळकती संबंधानें मालक खरे पण त्यांच्यामध्यें घरीं जमीन वाहतात असे थोडे. शेवटील वर्गांतील श्रीमान व गबर लोक बहुधा आपल्या मालकीची जमीन लाऊन काढतात आणि त्यांच्या बद्दल वार्षिक ठराविक नक्की रक्कम हक्काच्या स्वत्वपणा निमित्त घेत असतात. हाच वर्ग आमच्या प्रस्तुत लेखा संबंधानें लक्षांत ठेविला पाहिजे.

शेतकरी लोक शेतीवर उदरनिर्वाह करितात आणि त्यांस शेती शिवाय उपजीविकेचें साधन ठाऊक नसतें. त्यांची धनदौलत काय ती शेतीच्या उत्पन्नावर उभारलेली असते आणि त्यांस नादानपणा व नादारी शेतीच्या धंद्यांत बूड लागल्यास प्राप्त होत असते. अशा लोकांस जमीनदार श्रीमान लोक कसे वागवितात हें कळलें व त्या वर्तनाचा स्पष्टार्थ उघड करून सांगितला ह्मणजे हल्लीं शेतीला पोकळ महत्व कसें येत चाललें आहे व सरकारी सारा वाढविण्यास हा वर्तनाचा खोटा आधार कसा दाखविला जातो हें कळेल. हें वर्तन ह्मणजे प्रस्तुतचा नफ्यानें शेती लाऊन काढण्याचा प्रघात होय.

वऱ्हाडांत पुष्कळ जमीन बिघ्याचे बिघे एकेका इसमाच्या स्वाधीन आहे असा प्रकार फार दिसतो. कर्नल मेकेंझी साहेबांनीं जुडिशिअल कमिशनर असतांना आपल्या रिपोर्टांत एक विधान नमूद केलें होतें कीं कांहीं सुज्ञाच्या समजा प्रमाणें वऱ्हाडांतील एक तृतियांश शेती शेतकऱ्यांच्या ताब्यांतून जाऊन वर निर्दिष्ट केलेल्या पैसेवाल्या लोकांच्या हातांत आहे. हें विधान खरें आहे इतकेंच नाहीं तर आमच्या मतें सरकारी सारा शंभर रुपयाहून अधीक रकमेनें देणारे असे जमिनीचे मालक एकत्र मिळून बहुतक लागवडीच्या जमिनीचे मालक निघतील ह्मणजे बाकी राहिलेली शेती फुटकळ फुटकळ तुकड्याच्या रूपानें शेतकऱ्यांच्या ताब्यांत अशी थोडीच निघेल. तेव्हां हें सर्व कळविण्याचा सारांश एवढाच कीं शेतकरी वर्गांत मोडणाऱ्या लोकांस दोन सरकार असतात. पहिलें सरकार ह्मणजे खुद्द इंग्रज सरकार व दुसरें सरकार ह्मणजे जमिनीचे मालक होत. या दोन्ही सरकारचीं देणीं जो शेतकरी शेती नफ्यानें वाहतो त्यास द्यावीं लागतात. आणि हीं दोन भागलीं ह्मणजे जो अवशिष्ट भाग राहील तो फायदा किंवा उभ्या वर्षाची मजूरी समजा- अशी नफ्यानें शेती वहितीस घेतली ह्मणजे जो फायदा किंवा वेतन मिळणार त्यावर खरा शेतकरी आपलें कुटुंब पोसतो. या नफ्याच्या शेती पासून खऱ्या शेतकऱ्यांस किफायत होते अशीं वर्षें विरळा येतात आणि बूड ज्या साली लागते अशी वर्षें शेंकडा नव्वदाहून ज्यास्ती प्रमाणानें येतात आणि त्यामुळें शेतकरी काबाडकष्ट करून ही अन्नास महाग असतो, कर्जबाजारी होतो आणि त्याच्या जवळ खुद्द मालकीचा एखादा छोटा नंबर असला तर तो सावकाऱ्याच्या भरीस जातो असें आमच्या अनुभवास आलेलें आहे. या साठीं आह्मी ह्मणतों कीं नफ्यानें शेती करण्या पासून शेतकरी ठार बुडतो, सावकार डोळे मिटून तरतो आणि सरकार आपला सारा वाढवविण्यास कारण दाखवितें.

नफ्यानें शेती करण्याची ही कार्यकारणपरंपरा विलक्षणच आहे. शेती वाहण्याचे तीन मुख्य प्रकार आहेत. घरीं शेती करणें ह्मणजे शेताची नांगरटी, पेरणी, वगैरे सर्व कामें शेतीच्या मालकानें आपल्या पैशानें करावीं आणि या खर्चा विरुद्ध शेती जें पीक देईल ती त्याची जमा होय. या दोन्ही तोंडाची वजावट केली असतां जमेच्या बाजूला शिल्लक राहिली ह्मणजे शेतीनें त्या रकमेच्या मानानें हात दिला ह्मणतात आणि खर्चाच्या बाजूला शिल्लक राहिली तर शेतींत तितकी बूड आली. येणें प्रमाणें शेतीचा सालीना आढावा जे शेती घरीं करितात त्यांस आपलें उत्पन्न ठाम कळण्यासाठीं काढावा लागतो. दुसरा प्रकार ह्मणजे बटाईनें शेती वाहणें हा होय. यांत जमिनदार व वहितदार सरकारी सारा उत्पनांतून देऊन बाकीचें उत्पन्न निमेनिम वाटून घेतात. कित्येक स्थळीं हें सारा भरण्याचें व वांटणीचें प्रमाण सममाग नसून कम जास्त असतें. तिसऱ्या सदरांत नफ्यानें शेती करणें हा प्रकार मोडतो. यांत जमिनदार पुढील सालासाठीं अगोदरच वहितदारा पासून करार करून घेतो कीं जमीनदारास वहितदारानें सरकारी सारा भागवून सरकारी साऱ्याच्या दुप्पट, तिप्पट, व कोठें कोठें चौपट रोख पैसा द्यावा आणि जमिनीचें उत्पन्न त्या रकमेच्या मोबदल्यांत खावें. हे मुख्य तीन प्रकार झाले दुसरे कांहीं प्रकार आहेत ते या तिन्ही पैकीं कोणच्या ही दोघांच्या मिश्रणा पासून होतात पण या संयुक्त प्रकारांचा प्रस्तुत लेखांशीं कांहीं संबंध नाहीं.

सरकार आपला सारा पैशाच्या रूपानें घेतें. हा सारा तीस वर्षांपूर्वींच ठरलेला असतो. एखादें वर्षीं अवर्षण होऊन शेती बिलकूल आली नाहीं तर सरकार एक वर्षभर साऱ्याची सूट देतें. ही सूट ह्मणजे खरोखर एक वर्षभर लांबणीवर टाकलेलें सरकार देणें होय. ही सूट देण्याचा प्रसंग अगदीं क्वचितूच प्रसंगीं येतो. वऱ्हाडांत निदान अव्वल इंग्रजी पासून अद्याप सूट मागण्याची वेळ आली नाहीं. या सुटीच्या बाबी शिवाय सरकारचा सारा शेतीच्या पिकावर कांहीं कांहीं एक अवलंबून नसतो. फक्त तो हंगामाच्या वेळींच वसूल केला जातो. शेती चांगली पिकावी, सारा बरोबर योग्य वेळीं जमा व्हावा व रयत सुखी असावी हा सरकारचा हेतू असतोच पण या सात्विक हेतूचा शेतीच्या धंद्यास प्रत्यक्ष उपयोग कांहीं होत नाहीं. शेती पिको अगर न पिको, सरकारचा सारा भागविलाच पाहिजे. शेती रुपयांतल्या दोन आण्या पासून सोळा आणे किंवहूना आठरा आणे पिकली तरी त्याचा विधिनिषेध सरकारास कांहीं नाहीं. सरकार ही संस्था लक्षांत आणली ह्मणजे तिच्या करण्यास फारशी नांवें ठेवण्यास जागा नाहीं. सरकारला राज्यकारभार चालवावयाचा असतो आणि त्याच्या खर्चा बद्दल प्रजाजन सरकारास जमिनीवर कर देते. राज्यकारभाराच्या बहुविध व्यापारा पुढें सरकारास सारा वसूल करण्या पलिकडे शेतींत मन घालतां येत नाहीं. धान्याच्या रूपानें पूर्वीच्या काळीं सारा घेण्याची चाल असे. पण प्रत्येक शेतामध्यें धान्य किती होतें हें कळण्यास सरकारपाशीं देखरेख करणारे निराळें खातें नाहीं. असें खातें असूनही त्याचा सरकारला फायदा होणार नाहीं. सरकारचें देणें इमानें इतबारें देणारे लोक थोडे. तें बुडवूं पाहणारे इसम पुष्कळ सांपडतील. तेव्हां धान्याच्या रुपानें किंवा त्या धान्याच्या ऐवजी हजार मालाच्या भावा प्रमाणें पैसे घेणें आरंभीं सोपें दिसतें पण त्याला अनेक विघ्नें येतात. जेथें जेथें सारा मुक्रर केलेला असतो तेथें तेथें सरकारचा कारभार निमटपणें चालतो. शिवाय पैशाच्या रुपानें अगाऊ ठरविलेला सारा घेणें सरकारच्या राज्य व्यवस्थेला अत्यंत आवश्यक आहे. राज्यव्यवस्थेचा खर्च सरकारचा कायमचा असतो तेव्हां तो भागण्यास कायमचें नक्की उत्पन्न पाहिजे. दरसालच्या पीकपाण्याच्या आबादानीवर या उत्पन्नाचा साक्षात् हवाला दिला तर हें उत्पन्न हवे प्रमाणें चंचल, अस्थीर व अनिश्चयात्मक होईल. आणि सरकारची निरनिराळीं खातीं अगदीं नियमित व कायम असतात व तीं तशींच असावीं लागतात तेव्हां जमिनीच्या साऱ्याचें उत्पन्न सालाबादच्या पीकपाण्यावर बसविणें राज्यव्यवस्थेच्या उत्क्रान्तीस व अपक्रान्तीस कारण होईल. म्हणून सरकार आपला सारा पैशाच्या रूपानें व नियमित केलेल्या निरखा प्रमाणें घेतें आणि तसें करणें अगदीं भागच आहे. ही रयतवारीची पद्धत नफ्यानें शेती लाऊन काढण्याच्या पर्यायाची आहे. पण या पद्धतीचा उद्देश व्यापारी तत्वावर अवलंबून नसतां तर तिचा राजकीय प्रकरणाशीं संबंध पडतो. रयतवारी मध्यें प्रजेपासून अमूक एका दरानें सारा घ्यावयाचा असतो. हा दर शेताचा मगदूर, सालिना अंदाजी उत्पन्न, व सरकारचा हक्क हीं पाहून बसविलेला असतो. मूळ तत्व चांगलें असतें पण त्याचें उल्लंघन करून आपल्या कराचा बोजा सरकार प्रजेच्या आद्याच्या मानानें फार वाढविते त्याला रयतेचा नाइलाज आहे

सरकार सारा वसूल करिते त्या प्रमाणें नफ्यानें शेती देणार पोट—सावकार आपल्या स्वामित्वाच्या हक्काबद्दल साऱ्याच्या एकपट, दुप्पट, तिप्पट, चौपट व पांचपट ही पैसा जमिनीच्या पिकाऊपणाच्या मानानें वहितदारापासून घेत असेत. या नफ्यानें शेती लाऊन काढण्याच्या प्रकारास आपण सावकारी किंवा शेतीचा व्यापार ह्मटलें तरी चालेल. ही सावकारी वहितदारास घातुक, शेतीस वाईट व जुगारी सट्ट्याच्या स्वरूपाची झाली आहे. जमीनदाराचा विचार असा असतो कीं, घरीं शेती करण्याचें प्रयोजन नाहीं कांकीं तिची खटपट करण्याचा त्याचा संकल्प नसतो. बटाईनें जमीन देणें जमीन-

दार सावकाराला परवडत नाहीं. वहितदाराचा विश्वास काय, शेताच्या उत्पनावर देखरेख कोण करणार, आणि शेत पुढील वर्षी कसें काय पिकतें इत्यादि काळजी दूर करण्यास जमीनदाराला नफ्यानें शेती लावून काढण्याची उत्तम सोय निघाली आहे. साधारणपणें वहितदाराची ऐपत पाहावी आणि त्याच्या कडून करारनाम्यानें मालकी बद्दल कांहीं रक्कम ठरवून घ्यावी ह्मणजे ऐन हंगामाच्या वेळीं पैसा वसूल करून नंतर शेताचें उत्पन्न वहितदाराला शेतांतून हालवूं द्यावें आणि वर्षांतून एकदां आपली थैली भरून मोकळें व्हावें. ही युक्ती जमीनदाराच्या सावकारीला चांगली लागते. शेतांत अधिक पैसा घालवयाला नको, तिच्या उत्पन्नाची फिकीर नको, व गादीवर बसल्याच जागीं एकदा जमीनींत घातलेला पैसा वरील नफ्याच्या रूपानें सोळा आणे व्याज पोंचवितो. तेव्हां ही राजविलासी सरकारच्या पद्धतीच्या तोडीची युक्ति किती बरें नामी! या प्रांतांतील जमीन चांगली पिकाऊ आहे, दरसाल थोडी बहुत जमिनीची मेहनत झाली ह्मणजे नापीक कांहीं होत नाहीं. जमिनीचा कस कमी होत असला तरी ती कमतरता साक्षात्पणें दिसून पडत नाहीं व वार्षिक किफायतीस ही कांहीं बट्टा लागत नाहीं. सरकारी साऱ्याची रक्कम तीस वर्षांपूरती मुक्रर असते पण जमीनदाराची सावकारी त्याहून वरिष्ठ कोटींतली आहे. त्याला अप्रतिबंध व्यापाराचें तत्व चांगलें माहित असतें. जो कोणी पुढील वर्षासाठीं मालकीचा पैसा साऱ्याच्या अधीक पटीनें देईल तो जमीनदाराचा एका वर्षाच्या मुदती करितां वहितदार होतो.

वहितदाराला दरसाल कोडें पडतें. वहितदार ह्मणजे खरा शेतकरी. त्याला शेतीचाच धंदा ठाऊक असतो. त्याच्या कुटुंबास शेती वहितीला पाहिजे असते तेव्हां तो सावकारास खूष ठेऊन ज्या नफ्याच्या अटीनें शेती मिळूं शकेल तीच अट कबूल करितो. सरकारच्या साऱ्या प्रमाणें जमीनदाराचा हक्क दिलाच पाहिजे आणि तें देण्यासाठीं त्याचें घरदार वगैरे इस्टेट गहाणवटाच कौल नाम्याच्या करारानें ठरलेली असते. वहितदार शेतकऱ्याला बरीवाईट शेती पिकविलीच पाहिजे. भाड्याचें तट्टू व तरवडीचा फोक या म्हणी प्रमाणें त्याच्या मनांत विचार जागृत असतो. जमीन नीट पिकेल अशा बद्दल तो शेतकरी हरतऱ्हा करीत असतो. पण त्याचें लक्ष जमीन उत्तम करून शेती सुधारण्या कडे फारसें नसतें. चालू सालीं मेहनत केली तर आपला श्रमाचा मोबदला पुढील वर्षी येईल असा भरंवसा त्याला कशानें असणार! सरकारचें व सावकारचें देणें ठामच आहे. तें भागविण्यासाठीं व कुटुंबाचें पोषण करण्या साठीं त्याला मेहनत करूनही आकाशाकडे डोळे लावावे लागतात. पाऊस अगोदर पडला पाहिजे, तो वेळेवर पुन्हा पाहिजे आणि तिसरें पिकावर रोग पडता कामा नये किंवा टोळधाड, उंदीर, घूस वगैरेची शेतपाखरणी इत्यादि ईतिसमुच्चयाची बाधा होऊ नये. एवढ्या गोष्टी साध्य झाल्या ह्मणजे शेतकरी एक साल तरला असें समजावयाचें. या सांगितलेल्या गोष्टी मनुष्याच्या हातच्या नाहींत, त्या केव्हा घडतील व घडणार नाहींत याचा नेम नाहीं आणि बहुत करून एखादी तरी विघ्नकारक गोष्ट हजर नसते असें विरळा घडतें. सारांश शेतकऱ्याच्या उत्पन्नाची हाकाहाकच. परिणामीं तोच काय तो मरणार असतो.

नफ्यानें शेती देण्या पासून जे नफे तोटे होतात त्यांच्या संबंधानें दुसऱ्या कांहीं गोष्टी लक्ष्यांत घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी की प्रत्येक देशांत कांहीं उद्योग अशा स्वरूपाचे असतात कीं त्यांस अप्रतिबंध व्यापाराचें तत्व लागूं शकत नाहीं आणि तें तत्व जोरानें लागूं केलें तर त्या देशचा तो उद्योग बुडतो व देशाचें मोठें अहित होतें हिंदुस्थानची स्थिती अशा प्रकारची आहे कीं या देशाच्या पुष्कळ उद्योगधंद्यास हें तत्व लागू शकत नाहीं. जुन्यां कलाच प्रचारांत आहेत आणि नव्या यंत्रादिकला या देशांत लोक उपयोगांत आणीत नाहींत तो पर्यंत हीच स्थिती राहणार आहे. अशा उद्योगा पैकीं या देशचा शेतीचा धंदा होय आणि ही गोष्ट वऱ्हाड सारख्या प्रांताला विशेषें करून लागूं शकते. शेतीला अप्रतिबंध व्यापाराचें तत्व लागूं होण्यास या देशास तीन गोष्टी सावनीभूत झाल्या पाहिजेत. जमीन मुबलक आहे तसें जमिनींत भांडवल घालणार लोक आणि उत्कृष्ट शेतकरी असे मिळाले पाहिजेत. घरीं शेती वाहिली किंवा किमानपक्षीं बटाईनें दिली म्हणजे जमीनदार पैसेवाला असेल तर त्या पासून शेतीची निगा चांगली राखली जाऊन शेती सुधरण्याची आशा असते. प्रत्यक्ष शेतीमध्यें अधीक भांडवल खेळूं लागतें व शेतकऱ्यास नेकीनें शेती करण्यास आशा लागते. पहिल्या प्रकारामध्यें शेतींत खपणाऱ्या घरधन्यास योग्य बक्षील मिळतें व त्याच्या शेतांत राबणाऱ्या लोकांस मोलमजूरी मिळते. बटाईनें देण्यांत जमीनदाराचें व वहितदाराचें हित एकाच गोष्टींत असतें. परस्परा मधील विश्वास व स्नेहभाव वाढतो आणि दोघांचा एकच हेतु असल्यामुळें शेती सुधरते. लबाड वहितदार मिळाला तर नुकसान होतें खरें पण लबाड ह्मणून ठरलेल्या शेतकऱ्यास तिसरा प्रकार रूढींत नसतां तर शेतीच वहितीला मिळाली नसते. नफ्यानें शेती लाऊन काढण्यापासून शेतीमध्यें नवें भांडवल येऊं शकत नाहीं, व जमीनदार व वहितदार यांचें हित परस्परांशीं विरुद्ध असतें. आणि विरुद्ध दिशेच्या परस्पर कलहामध्यें बलाढ्य असतो जमीनदार तो विजयी होतो आणि वहितदार गरीब असतो व त्याच्या उपजीविकेचें जहाज समुद्रांत वहात असते. त्यामुळें तो केव्हां बुडेल याचा नेम नसतो. नफ्यानें शेती लाऊन काढण्याचा व्यापार सरकारास कळतो तेव्हां; त्यांचें ह्मणणें पडतें कीं, शेतकरी शेतीच्या उत्पन्नावर आपलें पोट भरून सावकारास साऱ्याच्या अनेक पटीनें रोख पैसा देतात त्या अर्थी शेतीवर सारा वसूल केला जातो तो फार थोडा आहे आणि तो वाढविणें अगदीं गैरवाजवी; नाहीं. हल्लीं सरकार सारा वाढविणार ह्मणतें तर रयत लोक सरकारास दूषणें देतात पण जो धारवाडी काटा आपण सरकारपुढें ठेवितो तो आपण आपल्या दर वर्षाच्या व्यवहारास च लाविला तर आपलें करणें कितीसें न्याय्य होणार आहे! सरकारनें सारा वाढविला तर तो एकपक्षीं पुरवला पण सरकारनें मेहरबानीनें असा नियम केला पाहिजे कीं नफ्यानें शेती कोणी देऊं घेऊं नये आणि तो तशी देणें घेणें झाल्यास त्यास सरकारची पूर्ण मंजुरात पाहिजे. जमीनदार धनाढ्य असेल तर चांगला खरा पण नफ्यानें शेती देणारा जमीनदार मात्र श्रीमान नसावा कांकीं त्याच्या मनाला तिसऱ्या प्रकारानें शेतीचा व्यापार करण्याशिवाय दुसरा मार्गच चांगला दिसणार नाहीं. जो जमिनदार श्रीमान असून घरीं शेती वाहतो त्यास शेती हात देते व त्याच्या जिवावर पुष्कळ कुटुंबें पोसलीं जातात. तसेंच जो श्रीमान जमीनदार बटाईनें शेती देतो त्याच्या राज्यांत वहितदार शेतकरी सुखानें नांदतो. वहितदाराचे बरें वाईट तेच जमिनदाराचें असल्या कारणानें भांडवल शेतींत अधिक पडतें व उभयतांचें कल्याण होतें. शेतकरी दिवसेंदिवस गरीब व भिकारी होत आहे तेव्हां त्यांचा तरणोपाय ह्मणजे आह्मास हा एक दिसतो कीं नफ्यानें शेती देणें बंद केलें पाहिजे. वऱ्हाडांत शेतकरी लोकांचा भरणा मोठा आहे त्यांचें यथायोग्य संगोपन होण्यास वरील उपाय चांगला आहे शेतकऱ्याचें. कुटुंब रात्रंदिवस शेतांत खपत असतें त्याच्या मजूरीचें वाजवी मोल केलें तर हल्लीं नफ्याच्या शेती पासून जो मोबदला मिळतो तो फारच अल्प आहे. सर्व कुटुंब खपतें तेव्हां त्याला मोठभाकर अनियमितपणानें मिळते हें कांहीं त्यांच्या श्रमाचें योग्य वेतन नाहीं. योग्य वेतनाची व्याख्या एक खात्रीची सांगतां येणार नाहीं तरी पण त्याचा अर्थ सरकारनें आपल्या नोकरा संबंधानें केला आहे तो घेतला ह्मणजे चालेल. ५५ वे वर्षानंतर वृद्धापकाळीं पेनशनच्या रुपानें जें निराळें वेतन बेरोजगारी स्थितींत मिळतें तें शेतकऱ्यास त्याच्या श्रमाबद्दल मिळण्याची थोडीतरी आशा आहे काय? त्याचें तर पोट निव्वळ हातावरचें. जो दिवस गेला तो निभावला. त्याला दुसऱ्या दिवसाची मारामार! या संकटमय स्थितींतून सोडविण्यास आह्मास जो एक उपाय सूचला तो आह्मी सरकारपाशीं व श्रीमान जमीनदारापाशीं सांगितला या पुढील त्या उपायाचें यथायोग्य विवेचन आह्मी करूं शकत नाहीं परंतु आह्मी बळकट आशा करितों कीं या लेखापासून नफ्यानें शेती देण्याच्या व्यवहारास थोडाबहुत प्रत्यवाय घडेल आणि तो जितपत घडेल तितकें इष्ट कार्य साधणार आहे.

## पोलीस रिपोर्ट.

(सन १८९२ सालचा)

(मागील अंकावरून पुढें चालूं.)

इंदूर, ग्वालेर, मंडलेश्वर या भागाकडून चोरीनें लपवून छपवून अफू वऱ्हाडांत आणल्या विषयीं एकंदर पांच खटले झाले आणि त्यांत गुन्हेगारांस कैद व दंड अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षा झाल्या. मुर्तीजापूर स्टेशनावर केदारीमल या नांवानें चार डाग आले होते आणि पूर्वींच मंडलेश्वरच्या पोलिसांनीं वर्दी दिल्या वरून ते डाग फोडून पाहतां १ मण २९ $\frac{1}{2}$ शेर–अफू लपविलेली बाहेर निघाली. मल्कापूर स्टेशनावर २२ शेर अफू कपड्याच्यां गठेल्यांतून धाडलेली पत्यांत निघाली. वाशिम जिल्ह्यातील चांदस मुक्कामीं एका गाडींत १०१ $\frac{1}{2}$ शेर अफू पकडली. ही गाडी जालन्याकडे जात होती. या गाडीचा फोटो घेण्या इतकी इच्छा मध्यें अफू लपविण्याची उत्तम युक्ति काढली होती पण अखेरीस ही चोरी कार्यवशात् उजेडांत आली. धामणगांव स्टेशनावर तर गंगोत्रीच्या ह्मणून बाटल्या उतारूपाशीं आढळल्या त्यांच्या बुडा पासून वर तोंडा पर्यंत अफू भरलेली असून तोंडाशी मात्र पवित्र गंगोदक भरलें होतें. जगन्नाथ पंडिता सारख्यांचा गंगेनें उद्धार केला पण गंगेच्या उदकाच्या मिषानें पाप करणाऱ्यास मात्र गंगा तारीत नाहीं हें धामणगांवच्या प्रकरणा वरून पक्केंपणीं कळेल! अफू लबाडीनें वऱ्हाडांत आणल्याचीं हीं उदाहरणें पाहतां लोक आणखी किती हुन्नरानें अफू लपवीत असतील व असे गुप्त प्रयत्न किती सफल होत असतील याचा कांहीं अंदाज करितां येत नाहीं.

सन १८९२ अखेर, पोलिस खात्यांत ५६० आफिसर व २३४९ शिपायी असे मिळून २९०९ लोक होते. पोलीसच्या खालच्या दर्जाच्या जागा फार कमी पगाराच्या आहेत आणि त्या जागेचें काम बिकट, जोखमीचें व सक्तपणाचें असतें त्यामुळें चांगले चांगले लोक या खात्यांत पुष्कळसे येऊं इच्छित नाहींत. पोलीस शिपाया मध्यें भरणा करण्या विषयींच्या नियमांत नवीन फरक व सवडी घातल्या आहेत त्या अन्वयें डिस्ट्रीक्ट सुपरिन्टेंडंट आपल्या हाता खालीं पोलिसची फौज नव्या शिपायांच्या भरतीनें व्यवस्थशीर व पुरे इतकी ठेऊं शकतील. १८९२ त पोलिस शिपायी जे आपल्या कामांत चुकले अशा त्या २९१ जणा पैकीं ६३ बडतर्फ झाले व बाकीच्यांस दंड वगैरे शिक्षा खात्या मार्फत झाल्या आणि न्यायकोडतांत पोलीस आक्टा प्रमाणें व पिनल कोडा प्रमाणें ४६ शिपायी चुकींत सांपडले तरी त्या अपराधांत पुरावा मिळण्या साठीं पोलीसांनीं जबरदस्ती, मारहाण वगैरे अन्याय केल्याचें एक ही उदाहरण नाहीं हें समाधानकारक आहे. इनस्पेक्टर जनरल लेन साहेब हे आपल्या कामांत अत्यंत दक्ष, वचनाचे धड व कर्तबगारींत चतर असे आहेत तेव्हां त्यांनीं सर्व पोलिस ठाणीं, व आफिसें रिपोर्टाच्या वर्षांत तपासलीं यांत विशेष नवल तें काय! कर्नल लेन साहेबांच्या तोडीचे आफिसर वऱ्हाडांत थोडेच आढळतील आणि त्यांचा कित्ता पोलीस खात्यांतील आफिसर लोक अंशतः गिरवितील तरी देखील मोठा फायदा होईल.

## भयंकर दंगा

गेल्या मोहरमच्या संबंधानें काठेवाड संस्थानांत विरावळ येथें हिंदु व मुसलमान यांच्या मध्यें जो मोठा दंगा झाला आणि कांहीं खून पडले त्याच दंग्याचा परिणाम मुंबईच्या हिंदुमुसलमानावर घडला. मुंबईस गेल्या १० व्या तारखेस मुसलमानांची सभा भरून असें ठरलें कीं काठवा-

डांतील मुसलमानांचा ताबुतांच्या दंग्या संबंधानें मोठा छळ होत आहे तो बंद करण्याची व्यवस्था करावी आणि त्या व्यवस्थे निमित्त त्या समेंत आठ हजार रुपयांचा फंड उभा राहिला. शुक्रवारीं ही धूमसत राहिलेली दुहो फार माजली आणि अखेर मुंबईच्या हिंदु व मुसलमान या मध्यें हातघाईवर पाळी येऊन चार पांच लोकांची कत्तल ही उडाली. बंडावा झाला तेव्हां सर्वत्र बंदोबस्ता साठीं लष्कर बोलावलें आणि रात्रीं अकरा वाजे पर्यंत पूर्ववत शांतता केली.

# The Berar Samachar

MONDAY AUGUST, 14, 1893

## ANY POSSIBILITY OF A BRIGHT FUTURE?

In what direction are we to look for the realisation of the hope of being advanced, enlightened, and bettered? How can, the supreme interests of the people of India, be secured, our poverty rendered less depressing and grinding, our hopes and desires raised until they become generally what many are already worthier and worthier? Is there not a diversity of interests between an Englishman and an Indian subject under the British rule? These interests have grown to enormous proportions. The Imperial debt is in round numbers £ 150,000,000. It is held by British investors. There is also railway stock totalling many millions; there are also indigo, tea, coffee, and cinchona estates representing a capital expenditure and investments at least as great as the Empire's debt; and there are also the claims of those employed in the two Civil Services. These interests are so great that the question of leaving India to the management of her children as far as possible with as much advantage to her as possible must be once for all banished from the mind. The Ulster tenant right grants compensation to the out—going tenant for unexhausted improvements and for the good will of the farm.

The poverty of India is an acknowledged fact rendering all discussion about any such compensation absolutely nugatory. For good or for evil then the highest concerns of India and England are identical. Inspite of the discontent which is widely prevalent among us, it is by no means likely that England can effectually remove the root of it. When it is plain that there can possibly be no complete severance between India and her rulers we cannot reconcile why the attitude of our rulers towards us should be so strange. Our feelings are never respected; our demands are generally made to faint on the breasts whence they spring. Even our rulers are convinced that things in India are not perfect. Nor can Indian administration remain in the prsent state. More and more freedom must now be given to such of the provinces as may be worth this privilege and boon. This done will serve as a natural safeguard against disloyalty and discontent. The English Supremacy is even now heartily preferred to several others previous. But the influx of education is training the mind to seek what its fair and just dues are. These granted will stimulate the people to a hearty co-operation, loyalty, and devotion—the natural outcome of gratitude and esteem. The present reflections are the most genial and natural outcome of the present excitement favourable to India an her labouring population. Unless this course were pursued there would be continued unsettlement and disquiet.

Englishmen in India are simply doing a police duty with all that is involved therein and nothing more. Naturally enough they alone are at peace. But if this is done why should not be the people allowed to rule themselves according to their own ideas and experience—what suits them best in this their progressive transition from darkness to light? We confess that in the view we now express the matter is looked at from the point of view of the ruled and not from the standpoint of the rulers. To secure the greatest good of the greatest number, without injuring any body's however trifling, insignificant, and unworthy, without reference to any caste or creed, complexion or race, language or religion, prepossessions or prejudices, public eulogy or detraction, our sole inspiring and guiding desire is to express what we deem most expedient however unpalatable, and therefore undesirable. We plead for an Englishman when we think he is treated with unjust harshness or ignored with deliberate obliquy. When we find the reverse we are fearless in decrying him. To turn to our argument then—British India is not governed as an Indian state. The benefit to the governed can not be as great in the worst governed Indian State with all its imaginably mischievous atrocities and enormities. British rule has not secured so much satisfaction and content. Nor can it raise as much revenue without serious but uneffective discontent. The reasons why are on the face of the assertions. English and Indian idiosyncracies of character, all the stored up force and experience of respective ancestors and of the several national and individual histories, are separated by a wide and unbridgeable gulf. Sympathy and a higher kind of altruism alone could connect the two sides of the yawning chasm; of altruism of the best order, the English as a race are singularly deficient. Anglo—Indians are strangers in a strange land, mere, birds of passage; they cannot suit themselves to their unfamiliar environ ment; they are unfamiliar to the thousand and one incidents of daily life and experience which more than any thing else, guide the wise statesman in a course which proves successful in the ends that serve humanity. Among other things they as rulers do in India is to substitute the rigid forms of law and a scientific routine for adaptability and sympathy. Their point of view and ours are different. Theirs is held to be right and ours without dispute or question wrong. The millions of the miserable Indians groan under smarting pains because their rulers relentlessly regard oriental affairs from a western stand—point and act accord ingly. This is strictly true with our Berar Educational Department which inspite of the vigour and able administration of our revered Raobahadur Ja tar has united sympathy and altruism. If we contend for the claims of some one else it is because long residence and experience have rendered him peculiarly fit for what we contend for him though perhaps he himself may not like his pretensions urged so far. To see an outsider at the head of a large department and thus to see the chances of the worthy subordinates overlooked is a justly painful sight; is an evil that cannot be too great; is a catastrophe to the whole Department as it now is and will come to be in time to come. The prospect of rising to the highest and topmost position by honest service almost thank less in lower grades is for ever closed! But these are things which our people can not catch even a glimpse of and can not unite with us to vindicate the cause of justice. Blindness natural no spectacles can lessen nor eyebalms alter!

Ask an Indian living in an English district bordering on an Indian state, whether he would prefer to stay under the rule of the English collector, or cross the border and become amenable to Oriental governance however arbitrary. He would, unhesitatingly, answer that he would prefer to live in the Indian state circumstances permitting. Such an answer may be humilitating to the pride and self-complacency of our rulers. But it need not be wondered at.

We have treated this argument as abstractedly as possible. Without going so far as to give two pictures to reveal at a glance why a Native rule however absolute and tyrannical is preferred to a rigid British administration we have briefly summarised the facts as they are and attributed the reasons for them. No doubt an Englishman after a long experience however unbending himself has in him both sympathy and love for those about him. But he goes away when most fit for use. To maintain rigidity departmental heads must in numerous cases be of foreign extraction but to cheapen administration and to effect a compromise in judiciary and political branches of administration a larger portion to Natives will be by far a good never too good. Time, diffusion of education and moral advancement have contributed to this end now. The time is favorable now.

## वऱ्हाड.

हवामान– या आठवड्यांत पाऊस उत्तम झाला आणि मधून मधून चांगली उघाडीही होते त्यामुळें पीकें जोरांत आलीं असून कांहीं कांहीं ठिकाणीं ज्वारीचे पेरे नव्यानें झाले. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

मि. सी. ए. डब्ल्यू. डेव्हीस स्पेशल असिस्टंट कमिशनर यांस तारीख १३ जून पासून पेनशन मिळाल्या कारणानें मि. गाडविन आस्टीन यांस स्पेशल असि. कमिशनर नेमून मि. विङ्ल्फ, प्रीडो, व बाळकृष्ण काशिनाथ जोशी या तिघांस असिस्टंट कमिशनर अनुक्रमें वर्ग पहिला, दुसरा व तिसरा असे नेमण्यांत आलें.

या वरील वर्गावर्गांत रिकाम्या झालेल्या शेवटील अव्वाचीच्या जागेवर रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार यांस नेमलें.

कै० रा. रा. केशवराव जैपकृष्ण एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर वर्ग ४ यांच्या रिकाम्या जागीं मि. ओग्रेडी यांस वर्ग ४ चे ए. अ. कमिशनर करून शेख महमद इस्मायल यांस त्यांच्या एक्स्ट्रा असि कमिशनरच्या आफिशिएटींग जागींच कायम केलें.

कै० मुनशी अयोध्या प्रसाद एक्स्ट्रा असि. कमिशनर वर्ग २ यांच्या रिकाम्या जागीं मसर्से प्राइस, म्यागिल, एदलजी जमशेटजी संजाना, व बाल्शा यांस अनुक्रमें एक्स्ट्रा असि. कमिशनर वर्ग २, ३, ४, व ५ अशी वरवरच्या जाग्यावर बढती दिली.

आकोल्याच्या वर्षोत्सव व्याख्यान मालेंतलें तिसरें व्याख्यान रा. रा. बळवंत विष्णु वैद्य यांनीं 'अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानची माहिती' या विषयावर काल सायंकाळीं दिलें.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल कारितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७

कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मिसल. नंबर ६

१८९३

सिव्हिल जडज्य साहेब बहादूर जिल्हे अकोलें यांचे कोर्टांत.

नांव— लक्ष्मीबाई

जवजे नारायणदीन

राहणार कवठ ता० बाळापूर

जिल्हा अकोला यांस मयत

नारायणदीन बापाचें नांव शिवदीन राहणार कवठ तालुके बाळापूर जिल्हा अकोलें यांचें कर्ज वसूल कारितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज कारितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. २१ माहे आगष्ट सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हाकिकत दाखल करावी. ता. ८ माहे आगष्ट सन १८९३ इ.

V. N. Dandekar.

शिक्का सिविल ज्यडज्य

## वर्तमानसार.

सर्पदंश झाल्या बरोबर त्या ठिकाणीं तोंड लाऊन रक्त शोषण करण्याचा उपाय फार गुणावह आहे.

चोरांचे वऱ्हाडी–बारासेट ( बंगाला ) येथील फौजदारी तुरुंगावरील हेड वार्डर आणि त्याचा असिस्टंट हे तुरुंगांतील कांहीं कैद्यांस रात्रीं दरवडे घालण्यास बाहेर सोडीत असत, व ते लूट आणीत त्यांत त्यांची पाती असे अशाबद्दल त्यांजवर हल्लीं खटला चालल्याचे स्टेटसमन वरून समजतें. तुरुंगांतून सोडलेले कांहीं कैदी दरवडा घालीत असतां पकडले आणि त्यावरूनच हें पाप बोंब करून चवाठ्यावर आलें आहे.

इंग्लिश हापिसरांचे खून– सरहद्दीवर बानू येथें वजिरी लोकांनीं एका इंजनेर साहेबांचा व पंजाबी घोडे स्वारांचे खून केले असें कळतें.

स० शो०

पुरा सहा फूट उंच असा माणूस दोनशे तिहींत एक.

आस्ट्रेलिआंत कित्येक सुवंट एक फुट लांबपर्यंत होतात.

एक जर्मन शास्त्रज्ञ ह्मणतो कीं, सूर्यबिंबावती ज्या ज्वलत् शिळांचें ( जळणाऱ्या धोंड्याचें )कडें आहे त्यापासून आह्माला हिरेमाणकें मिळतात!

रशियांत पुरुष २६ वर्षांचा होईपर्यंत वयांत येत नाहीं.

एक सुरवंट एका महिन्यांत आपल्या शरिराच्या वजनापेक्षां सहा हजारपट अन्न खतो. माणसाला आपल्या वजनाइतकें खाण्यास तीन महिन्यापेक्षां अधिक वेळ लागतो.!

अमेरिकेंतल्या सार्वजनिक पुस्तकालयांत एकंदर पुस्तकें ५,००,००,००० आहेत. युरोपांत २,१०,००,००० आहेत. हिंदुस्थानचें नांव घेतां कशाला? क. णु.

—इंग्लंड मधून पुष्कळ सोनें अमेरिकेंत पाठविण्यांत येत आहे.

—रशिया व जर्मनी यांच्यामध्यें एकमेकांच्या देशी जाणाऱ्या व्यापाराच्या मालावर जबर जकात बसविण्याची लढाई सुरू झाली आहे.

चिकागो शहरीं जें जंगी प्रदर्शन चालूं आहे यांत अत्यंत दुर्मिळ आणि बहुमोल वस्तू आणल्या आहेत त्यांतील वस्तू लुंगावून आपल्या अजब चौर्यकर्मांचें सगळ्या जगास प्रदर्शन दाखवावें ह्या हेतूनें लंडन शहरांतील विलंद चोरांनीं आपल्यांतील अत्यंत कसबी चोरांस चिकागो येथें पाठविलें आहे असें लंडन पोलिसानें केलेल्या तपासावरून दिसतें.

—श्राद्धांत सरकारचा हात:—आसाम प्रांतांतील सरकारानें हिंदुलोकांच्या श्राद्धाचे नियम ठरवून देण्याचें काम आपल्याकडे घेतलें असून श्राद्धविधि पाहिजे तेथें करितां येतो असें त्यानें ठरविलें आहे व ह्या ठरावास अनुसरून हिंदुला रजा देण्याचे कामीं हात आखडण्यांत आला आहे असें अमृत बझार पत्रिकेंत लिहिलें आहे.

—गुडमॉर्निंगचें सरकिलर:—शाळेंतील मुलांस रस्त्यांत जातांना जर साहेब लोक भेटले, तर त्यास 'गुडमॉर्निंग' ह्मणून सलाम केलाच पाहिजे, असें एक विलक्षण सरकिलर बंगाल्यांतील विद्याखात्याचे डायरेक्टर साहेबांनीं काढल्याची बातमी इं० डे० न्यू० मध्यें छापली आहे. सु. प.

पुष्कळ लहान मोठ्या बेटांचे दोन द्वीप समूह पासिफिक महासागरांत आहेत. ह्यांची लांबी ६०० मैल, व क्षेत्रफळ १५,००० मैल असून त्यांवर मनुष्य खाणाऱ्यां अशा मनुष्यांची १६७००० वस्ती आहे तीं बेटें आपल्या संरक्षणाखालीं आहेत असा जाहिरनामा ग्रेटब्रिटननें नुकताच प्रसिद्ध केला आहे.

पश्चिम आस्ट्रेलियांत कुलगार्डी येथें जी सोन्याची नवी खाण लागली आहे, तींत इतकें पुष्कळ सोनें निघत आहे कीं, तितकें आजपर्यंत कोणत्याही खाणींत निघालें नाहीं. ह्या खाणींतील ४ $\frac{3}{4}$ टन दगडाच्या चुऱ्या पासून ९००० औंस ह्मणजे एका टनांत २,००० औंस सोनें निघालें असें इंग्रजी वर्तमान पत्रावरून समजतें. ह्या पुष्कळ सोन्याच्या लालचीनें तिकडे चोहोंकडून मजुरांचा एक सारखा लोट वाहत आहे.

तारीख १ आगस्ट पासून मुंबई शहरांतील घंडोलचीं दुकानें बंद करण्याचा सरकारानें ठराव केला आहे.

गुरांचें लोकवस्तीचे प्रमाण— पुढील माहिती उपयुक्त वाटल्यावरून आह्मी पुढें देतों:—

| खंडाचें नांव. | लोक संख्या. | गुरांची संख्या. |
|---|---|---|
| युरोप. | ३००००००००० | १८०००००० |
| आशिया | ८००००००००० | ८७०००००० |
| आफ्रिका. | २००००००००० | १९०००००० |
| उ. अमेरिका. | ९०००००००० | ४७०००००० |
| द. अमेरिका | २८००००००० | १०००००००० |

उत्तर व दक्षिण अमेरिका यांची लोकसंख्या सुमोर १० कोट आहे व गुरांची संख्या १९ कोटी आहे ह्मणजे एका मनुष्यास दिड गुरुं पडते आणि आशियेंत ८० कोट लोकसंख्या असून गुरांची संख्या ८ $\frac{3}{4}$ कोट आहे ह्मणजे दर १० मनुष्यांस एक गुरुं पडतें. ही किती भिकार संख्या ह्मणावी. तरी खाण्यासाठीं असल्या अपुऱ्या संग्रहांतील गुरांचा सारखा संहार चाललाच आहे, आणि ही अपुरी संख्या आणखी कमीं करणसाठीं रोगांनीं ही कंबर बांधली आहे तेव्हां आशिया खंडास सगळेच ग्रह प्रतिकूल आहेत असेंच ह्मणावें दुसरें काय गु. सू.

अन्टवर्प येथें जें पुढील सालीं प्रदर्शन होणार आहे त्यांत विमानाचे योगानें पांचशें यार्ड उंचीवर लोंबत ठेवलेलें असें एक बाबूंचें लहानसें गृह करून त्यांत विजेचा चंद्र करून त्याचा प्रकाश प्रदर्शनाच्या जागीं पाडणार.

कांहीं बंगाली लोकांनीं विलायती औषधें इकडे तयार करण्याचा कारखाना काढला आहे. न्या. सु.

पुणें येथें रेमार्केटा जवळ एक अकलेची पेढी स्थापन झाली आहे. राजकीय, सामाजिक धर्म संबंधी, व्यवहारोपयोगी आणि इतर सर्व किरकोळ कामासंबंधानें ज्या त्या विषयांत निष्णात अशीं मनुष्याचें हातून थोडक्या पैशांत व सुलभ रीतीनें सल्ला मसलत देऊन फौजदार कचेरी पासून तो तहत स्टेटसेक्रेटरी पर्यंत वेळ पडल्यास पत्रा पोंचविण्या संबधानें हरएक प्रकारें मदत करण्यास सदर पेढी तयार आहे. पु. वै.

मि० खरशेटजी जीजीभाई वारिबेड सी० एस० आय० सी० आय० ई० ह्यांचा पुत्र खरशेटजी जीजीभाई यांस मृत्यूनें हिराऊन नेल्यामुळें त्यांच्या कुटुंबांत मोठा आकांत उडाला आहे.

शेर अलीखान यांचा पुत्र काबूल तुरुंगातून पळून गेल्या मुळें अमीर भयाभीत झाला आहे. म. मि.

हैद्राबादच्या निझामाचे जवाहिर चोरीस गेलें होतें; त्या पैकीं १५।१९ लक्षांचे जवाहिराचा शोध लागला असून आणखी तपास सुरू आहे.

सोलापूर येथील पोलिसानें तेथील मुसलमान लोकांचा एक ताबूत जुलमानें उचलून चावडीवर नेल्यामुळें मुसलमानानीं पोलीसावर फिर्याद केली आहे व समन्सें निघाली आहेत.

काबुलच्या अमिराचे मुत्सद्दी पेन हे येत्या सपटंबरात पुनः हिंदुस्थानांत येणार आहेत.

सुरतेचे कलेक्टर मि० लेली यांणीं गेल्या अधिक मासांत जे ब्राह्मण वगैरे तापी स्नानास येत असत, त्यांस ३ दिवस दक्षणा वांटली व त्यांचे फोटोग्राफ काढून घेतले असें गुजराथ दर्पणमध्यें लिहिलें आहे.

चिनांत शानसी प्रांतांत दुष्काळ पडून हजारो लोक मरत आहेत. व अन्नार्थी लोक मनुष्य मांसच खाऊं लागले आहेत. स० शो०

नवीन कायदा— दुष्टबुद्धीच्या कजाग सास्वा आपल्या सुनेंस व नणंदा आपल्या भवजयांस फार गांजतात, त्या योगानें कधीं फार मोठाले अनर्थ त्या कुटुंबावर येऊन कोसळतात, हा प्रकार बंद करण्याचे घाटत आहे

चाळीसगांव येथें पालखीची मिरवणूक निघाली असतां रस्त्यांत मुसलमान लोकांनीं अडविली. कांहीं मुसलमान काठ्या घेऊन मारामारी करण्याच्या बेतात आले होते; परंतु हिंदूनीं माघार घेतल्यामुळें तो प्रसंग टळला.

स्तुत्य व आश्चर्यकारक कट— चोपडें येथें गतवर्षी मुसलमानानीं हिंदूंचे देवास जोडा मारला होता, त्यामुळें तेथील हिंदूचीं मनें इतकी क्षुब्ध झालीं आहेत कीं, त्यांनीं यंदा कट करून ताबुतांचें दर्शन देखील घेऊं नये असा आपसांत निश्चय केला. यामुळें फक्त गावांतीलच लोक ताबूत पाहण्यास गेले नव्हते, इतकेंच नाहीं, परंतु प्रेक्षक ह्मणून आसपासच्या खेड्यांतील लोकही ताबूद पहाण्यास आले नव्हते. कोणीही हिंदूनीं ताबूद उचलण्यास साह्य केलें नाहीं.

गुल्बुर्गा येथील लिंगायत लोकांनीं गेल्या आठवड्यांत सभा भरवून असा ठराव केला कीं, जे कोणी लिंगायत विद्यार्थी वेदपाठशाळेंत दाखल होऊन वेद मंत्र शिकणार नाहींत. त्यांना भिक्षा घालावयाची नाहीं, त्यांस लग्न कार्यांत दक्षिणा द्यावयाची नाहीं, अथवा त्यास नुसतें. पाचारणही करावयाचें नाहीं.

कोर्ट फी वाढविण्याचा विचार:- दिवाणी कडील स्मालकाज दाव्यांत सरसकट आठ आणे प्रोसेस फी; व इतर दाव्यांत सरसकट एक रुपया फी, या प्रमाणें नवी व्यवस्था करण्याचा विचार सरकारांत चालू असल्याचें समजतें. असें झालें तर पांच पंचवीस रुपयापर्यंत लहान रकमेच्या खतांचे दावे करणाऱ्या लोकांस फारच जड जाणार आहे, ह्याचा विचार हा ठराव करण्यापूर्वी होणें फारच आवश्य आहे. क.त.

एकापुढें एक अशी अक्षरें भराभर उठत जाण्याचे टाईप रायटर नांवानें एक यंत्र निघालें आहे, त्याचा उपयोग जज्जानीं जजमेंटे व जबान्या घेण्याचें कामीं करावा असा हायकोर्टानें ठराव केला आहे प्रत्येक तावावर सह्या मात्र कराव्या लागतात. खा. चि.

पामीरहून हिंदुस्थानांत येण्याची बाबुपर नांवाची एक खिंड नवीन सांपडल्याचें जें मागें सांगितलें त्या अंगास रस्ता तयार करण्याची आतां तयारी चालली आहे.

बनुच्या शेजारी पंजाबचा एक स्वार व एक इंग्रज इंजनर यांस वजीरी लोकांनीं ठार केलें.

कटक येथें १५००० रुपये खर्च करून एक लढाऊ बुरुज लवकरच बांधण्यांत येणार आहे.

येत्या हिवाळ्यांत २६० घोडे खरेदी करण्या करतां सरकारांतून १,६९,००० रुपयांची मंजुरी झाली आहे.

क्रिमिनल प्रोसिजर कोर्टांत दुरुस्ती करण्याचें एक बिल हल्लीं हिंदुस्थानसरकारच्या कायदे कौंसिलापुढें आलें आहे. त्याचे जनक सर हाचिसन आहेत.

हरिद्वारचे यात्रेकरू तीर्थ ह्मणून जें तेथून पाणी आणतात त्याच्या योगानें व तेथून जी मेवा मिठाई आणतात त्याच्या योगानें पंजाबांत पटकीचा फैलाव होतो असें पंजाबांतील सरकारी कामदारांचें ह्मणणें आहे.

अर्जेंटिना येथील सर्व लोक बेदील होऊन मोठा बंडावा माजला आहे व कडक लढाया ही झाल्या.

मुलींचें आठ वर्षांचें आंत व मुलांचें १४ च्या आत कोणीही लग्न करूं नये करील त्यास कडक शिक्षा होईल व ५० वर्षांच्या पुरुषानें १४ .वर्षांच्या वयाच्या आंतील मुलीशीं लग्न करूं नये असा हैसूर सरकार कायदा करीत आहे.

संप किंवा एकोपा हें मोठें जालिम औषध आहे. बनारसच्या म्युनिसिपालिटीनें दही दुध वगैरेवर कर बसाविण्याचा ठराव केला. गवळ्यानें कट करून दही दुध विकण्याची बंद केली व जो विकील त्यास जातीबाहेर टाकण्याचा ठराव केला. अर्थात कोणासही दही दुध मिळेनासें झालें. मुलाबाळांचे हाल सुरू होऊन बड्या काळ्या गोऱ्यांचे चहा व ह्मसकेही बंद झाले अर्थात म्युनसिपालिटी विचार करावयास बसली, हजारों गवळी भोंवते बसले. म्युनिसिपालिटीनें बसविलेला कर रद्द केला गवळ्यांनीं घरीं जाऊन धंदा सुरू केला. असें सांगतात. लोक कट करूं लागले ह्मणजे काय होणार नाहीं? हवें तें होईल. हातांत हत्यारेंही घेतल्या वांचून राजांची उलटापालटही करतां येईल. एकोपा हे इतकें जालिम औषध आहे. आणि असा एकोपा होण्यास जातीभेद हें उत्तम साधन आहे.

सायामच्या सॉलोमन नांवाच्या बेटांवर इंग्लंडनें आपलें स्वामित्व स्थापन केलें. आहे.

या कामांत सायाम शरण आला व फ्रेंचाची बहादुरी झाली व इंग्लंडास भला मोठा ठोसा बसला असें ह्मणून फ्रेंचपत्र आनंद करीत आहेत.

कोणी सरकारी डाक्टरानें आपलें चाकरीचें काम संभाळून नेटीव संस्थानिकास औषधोपचार करण्यास कांहीं हरकत नाहीं, पण चाकरीच्या कामी व्यत्यय येण्यासारखा असल्यास सरकारच्या मंजुरीची अवश्यकता आहे व कांहीं जास्त फी घेण्यासही मंजुरी पाहिजे अशा प्रकारचे सरकारानें आलिकडे कांहीं नियम केले आहेत. ठा० अ०

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ॥ ३ ॥ ०८
सालअखेर ॥ ७ ॥ १०८
किरकोळ अंकास ..................... ४

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Annum, in arrears 7 „ Rs 8 as
Six monthly............3 „ 8 as
Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

dvertisement
Below 10 lines... 2Rs.
per line over10... 4 as.
Repetition perline 3as.

VOL. XXVII | AKOLA MONDAY 21 AUGUST 1893 | NO.33

वर्ष २७ | आकोला सोमवार तारीख २१ माहे आगष्ट सन १८९३ इ० | अंक ३३

## शिक्षण पद्धति

( एका अनुभवी शिक्षकाचा धडा )

( ३१ अंकावरून पुढें चालूं. )

गुरुजी—तर आतां सांगा पाहू पावसाचें निथळें पाणी पडतें, त्याची काय व्यवस्था होते ती.

विद्यार्थी—मी सांगतों, गुरुजी. कांहीं पाणी जमिनींत जिरून तळीं विहीरी यांत उतरतें, कांहीं डोंगरांत किंवा उंच जमिनींत जिरून डोंगराच्या पायथ्याशीं झऱ्यांतून बाहेर पडतें; आणि त्याचे ओहोळ आणि नद्या होतात. कांहीं पाणी उष्णतेनें वाफ रूप होऊन आकाशांत जातें आणि त्याचे मेघ होतात.

गुरुजी—शाबास, आपल्या या वऱ्हाड प्रांतांत पाणी आणि वाफ अशीं पाण्याचीं दोन रूपें आढळतात. जमिनीवर किंवा जमिनीच्या आंत असतें तें पाणी आणि आकाशांत असतें, ती वाफ. कित्येक देशांत थंडी इतकी कडक पडतें, कीं तेथें पाणी देखील थिजून तुपा सारखें घट्ट होतें. अशा घट्ट झालेल्या पाण्यास बर्फ ह्मणतात.

विद्यार्थी — विहिरींतलें पाणी घट्ट झालें ह्मणजे पोहोऱ्यानें काढण्याची मोठी अडचण पडत असेल, नाहीं गुरुजी?

गुरुजी —( हंसून ) नाहीं, कांहीं अडचण पडत नाहीं. ईश्वराची योजनाच तशी आहे. जमिनींतलें पाणी जर घट्ट झालें तर जमिनीच्या पोटांत जे पाण्याचे प्रवाह वाहत असतात ते सारे बंद होऊन, नद्या तळीं विहिरीं यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं; आणि मनुष्याच्या शरीरांत शिरांतून रक्त वाहण्याचें बंद पडलें ह्मणजे जसें मनुष्य मरतें, तसेंच पाणी वाहण्याचें बंद पडलें, तर सर्व सृष्टि मरून जाईल.

विद्यार्थी— तूप उष्णतेनें वितळतें तसें बर्फ उष्णतेनें वितळून पुन्हां त्याचें पाणी होतें किंवा नाहीं, गुरुजी?

गुरुजी— होय, बर्फाचें उष्णतेनें पुन्हां पाणी होतें.

विद्या०— तर मग, गुरुजी, पाणी घट्ट झालें तरी माणसें मरणार नाहींत; कारण बर्फाचें पाहिजे तितकें पाणी करितां येईल.

गुरुजी— होय तें खरें. विहिरींत असलेल्या सर्व पाण्याचें बर्फ झालें तरी आपण मोठ्या प्रयासानें तें वर काढून उष्णतेनें त्याचें पाणी करूं तथापि, विहिरींत नवें पाणी येण्याचें बंद झालें, आंतील सर्व पाणी खर्च झालें, ह्मणजे पुढें आपली काय वाट होईल? तसेंच झाडांच्या मुळ्यांस जसें पाणी शोषून घेतां येतें तसें बर्फ शोषता न आलें, तर झाडें कशीं वांचतील? पशुपक्ष्यादिकांनीं बर्फाचें पाणी करितां न आलें, तर त्यांची तहान कशानें भागणार?

विद्या०— खरेंच, गुरुजी, सगळ्या पाण्याची वाफ झाली तर पशुपक्षी, वनस्पती व माणसें या सर्वांस मरण्याची पाळी येणार यांत संशय नाहीं.

गुरुजी—पण तसें होत नाहीं, ईश्वर दयाळु आहे. त्यानें सर्व गोष्टींची तजवीज आधींच करून ठेविली आहे. जमिनीच्या पोटांत उष्णता आहे, ह्मणजे आपण जमीन खाल खणीत गेलों, तर वरच्या पेक्षां खालीं उष्णता अधिक आहे, असें आपल्या अनुभवास येतें.

विद्यार्थी—खरेंच गुरुजी. परवां शाम्दा तेल्यानें आपलें जोंधळ्याचें एक पेंव उघडलें त्यांत आमच्या शेजारचा गणु शिंपी पडला. आणि जरी त्याला लागलाच वरती काढला, तरी तो थोड्याच वेळांत मरून गेला. लोक ह्मणाले तो उष्णतेनें मेला. जमिनीच्या आंत उष्णता असतें, हें आतां माझ्या ध्यानांत आलें.

गुरुजी—पेंव उघडल्यावर एक दोन दिवस आंत मनुष्य उतरून, दाणे काढीत नाहींत. वरच्या हवेनें आतली हवा थंड झाली आणि आंतली उष्णता निघून गेली ह्मणजे मग खुशाल उतरावें. असो; जमिनीच्या आंत उष्णता असल्या मुळें, आंतील पाण्याचें बर्फ होत नाहीं; आणि पाण्याचे प्रवाह जमिनीच्या आंतून सतत वाहत असतात. जमिनीच्या वर जें पाणी असतें, त्याचें मात्र थंड हवे मुळें बर्फ होतें. तें देखील सगळ्या पाण्याचें बर्फ होत नाहीं. तूप तापवून पातेल्यांत निवत ठेविलें, तर तें थंड होतांना, वरच्या तुपाच्या आधीं खपल्या होतात, खालचें तूप पातळच असतें. तसेंच तळ्यांतील पाणी थंड हवें मुळें वरून घट्ट झालें असलें, तरी आंत पातळ पाणी असतें.

विद्या०—गुरुजी मागल्या सोमवतीच्या दिवशीं मी बाबा बरोबर पूर्णेवर गेलों होतों थंडी म्हणते मी; आणि बाबा मला नदींत आंघोळ करून ये म्हणाले. माझ्या तर बुवा जिवावर आलें. तरी पण बाबा रागावतील, म्हणुन भीत भीत गुडघा भर पाण्यांत जाऊन तेथें बसलों तेव्हां खालचें पाणी गरम लागू लागलें, म्हणून मी आणखी पुढें गेलों. कारण मला आतां कळलें. पाण्याला वरची हवा लागते म्हणून वरचें पाणी मात्र थंड राहते आणि जमिनीच्या उष्णते मुळें, जमिनी जवळचें पाणी उष्ण राहतें. असेंच न, गुरुजी?

गुरुजी—जमिनीच्या आंत उष्णता असते, ही गोष्ट तुला आतां चांगली समजली.

विद्यार्थी—गुरुजी, एके दिवशीं सोम्या महार दारू पिऊन धुंद झाला होता आणि तो गणु पाटलाच्या शेतांत डाहरा आहे, त्यांत पडला. त्याला बाहेर काढल्यावर तो सांगत होता कीं आंत भाजल्या सारखें त्याला वाटत होतें. आणि वरून जरी जमीन कोरडी असून खपल्या ही धरल्या होत्या. तरी आंत पातळ चिखल होता.

गुरु०--याचें कारण तुला आतां समजलेंच आहे. असो. या देशांतली हवा उष्ण असल्या मुळें येथें बर्फ होत नाहीं. थंड देशांत बर्फाचे अनेक चमत्कार होतात, तूं मोठा झाल्यावर पुस्तकें वाचून तुला त्यां विषयीं आणखी ज्ञान होईल. तूर्त इतकें पुरें.

गुरुजी—अनेक ओढे मिळून नदी होते, हें तुम्हांला पूर्वीं एकदां सांगितलें आहे. जशीं गांवाला, बगीचाला, जनावरांना नांवें असतात, तशीं नद्यांला नांवें असतात हें तुम्हांला ठाऊक आहेच.

विद्यार्थी—गुरुजी, नदीला नांव कसें पडतें?

गुरुजी—नदीला जे ओढे मिळतात, त्यांत जो मोठा ओढा म्हणजे सतत वाहणारा असेल, त्याचें नांव बहुत करून नदीला पडतें.

विद्यार्थी—आपल्या गांवची मोर्ना लहान नदी आहे. सोमवतीला आम्ही जातों ती पूर्णा केवढी तरी मोठी नदी आहे!

गुरुजी—या मोर्नेसारख्या अनेक नद्या आणि ओढे मिळून पूर्णा नदी झाली आहे, म्हणून ती इतकी मोठी आहे. आपल्या या वऱ्हाडांत पूर्णे इतकी मोठी नदी दुसरी नाहीं. मोर्नां पेक्षां पूर्णा मोठी आहे म्हणूनच मोर्ना हें नांव पुढें चालत नाहीं.

विद्यार्थी—गुरुजी, पूर्णा अखेरीस कशाला मिळाली!

गु०-- पूर्णा पश्चिमेकडे वऱ्हाडच्या हद्दी पर्यंत वाहत गेली आहे, आणि खानदेशांत तापी नदी आहे, तिला ही मिळाली आहे. तापी पूर्णे पेक्षांही मोठी नदी आहे, म्हणून पुढें तापी हेंच नांव चालत आहे. तापी नदी अखेरीस समुद्राला मिळाली आहे. वऱ्हाडच्या पूर्व हद्दीवरून वर्धा नदी दक्षिणे कडे वाहत गेली आहे. तसेंच दक्षिण हद्दी वरून पैणगंगा नदी पूर्वेकडे वाहत गेली आहे. वर्धा आणि पैणगंगा या नद्या पुढें मिळाल्या आहेत. त्यांत पैणगंगा मोठी असल्या मुळें तिचेंच नाव पुढें चालत आहे. गोदावरी म्हणून एक मोठी नदी आहे, तिला पैणगंगा मिळाली आहे, आणि गोदावरी पूर्वेकडच्या समुद्राला मिळाली आहे. दोन नद्या जेथें एकत्र मिळतात, त्याला संगम ह्मणतात. संगम ह्मणजे बरोबर जाणें किंवा वाहणें. नदी समुद्राला जेथें मिळतें, तें नदीचें मुख ह्मणतात.

वि०—ओढे नदीला मिळतात. एक नदी दुसऱ्या नदीला मिळतें, कांहीं नद्या समुद्राला मिळतात, हें आतां मला समजलें. पण समुद्र कशाला मिळतो, गुरुजी!

गुरु०— वा: खासा प्रश्न केलास समुद्र पाहिल्या वांचून त्याची खरी कल्पनां तुला करितां येणार नाहीं तथापि तुला सांगतों. एक. समुद्राला आपल्या पूर्णे पेक्षां मोठाल्या हजारों नद्या मिळाल्या असतात या वरून समुद्रांत पुष्कळ पाणी असतें, हें तुला समजतें किंवा नाहीं!

विद्यार्थी— होय, गुरुजी, समजलें!

गुरु०— समुद्रतळें पाणी फार खोल असते. विहिरींत खोल पाणी असेल तरी पाणबुडे लोक तळाशी जाऊन आंत पडलेलें भांडें वर आणितात. तसें समुद्रांत बुडी मारून तळाशीं जातां येत नाहीं; मनुष्य गुदमरून जातें.

वि०—तर मग समुद्र किती खोल आहे, हें कसें समजेल!

गु०---एक लांब दोरी असते. तिला एकेक फूट लांबीवर खुणा केल्या असतात. तिच्या एका टोंकास लोखंडाचा गोळा बांधून तो समुद्रांत सोडितात. तो गोळा समुद्राच्या तळाशीं टेकला ह्मणजे दोरीवरून अमुक फूट खोल पाणी आहे, असें समजतें. त्याला ( लोखंडाच्या गोळ्याला ) बुडीद असें ह्मणतात. नद्या, तळीं, विहिरी या पेक्षां समुद्र फार खोल असतो. हें आतां तुला समजलें असेल.

वि०—होय गुरुजी, समजलें. पण नदींत आणि तळ्यांत फार खोल पाणी असतें; कोठें उथळ असतें, तसें समुद्रांत असतें काय?

गु०— होय; जमिनीवर जसें उंचवट आणि खळगे असतात तशी समुद्राच्या तळींही उंच जमीन आणि खोल जमीन असते. समुद्रांत बुडीद टाकून तळीं खोल जमीन आहे किंवा उंचवटा आहे हें समजतें. तळ्याच्या पाण्या प्रमाणें समुद्राचें पाणी वरून सारखें दिसतें, तरी त्या पाण्याखालीं कोठें कोठें सपाट मैदानें व कोठें खोल दऱ्या आणि उंच पर्वत असतात. परंतु ते सर्व पाण्यांत बुडालेले असतात, त्यामुळें आपणांस दिसत नाहींत.

वि०—अबबब, एवढा का मोठा समुद्र असतो!!

गु०—पावसाळ्यांत व पावसाळा संपल्यावर कांहीं दिवसपर्यंत पूर्णा नदीला पाय उतार होत नाहीं; ह्मणून नावेंत बसून पलीकडे जावें लागतें. ती नांव लहान ह्मणजे सुमारें ४० माणसांस अडचणीनें बसतां येईल, एवढी असतें. व नदीचें पात्र लहान असतां ही पलीकडच्या तिरावर जाण्यास सुमारें अर्धा तास लागतो. कारण नावाड्यांस ती जलदीनें नांव चालवितां येत नाहीं. समुद्रांत इकडून तिकडे जाण्या करितां नांवा असतात, त्या इतक्या मोठ्या असतात त्यांत शेंकडों माणसांस बिछान्यानें वाळून हात पाय पसरून घरांतल्या सारखें खुशाल निजतां येतें. त्या नांवा चालविणारे लोक ही फार कुशल असतात; असें असतां समु-

द्राच्या एका तिरावरून दुसऱ्या तिरास जाण्यास नांव अहोरात्र चालूं असली तरी कित्येक दिवस लागतात. या मोठाल्या नांवांस गलबतें, तारू, जहाज, फतेमार अशीं नावें आहेत. जे लोक हीं गलबतें चालविण्याचें काम करितात, त्यांस खलाशी नाखवा, दर्यावर्दी असें ह्मणतात.

वि०— गुरुजी, आपल्या इकडे साहेब आहेत, यांचा देश समुद्राच्या पलीकडे आहे, नाहीं बरें!

गु०— होय त्यांचा देश आपल्या देशाहून फार दूर आहे; त्याला विलायत ह्मणतात विलायतेस जाण्याचा मार्ग समुद्रांतून आहे; पूर्वी या देशांतून विलायतेस जाण्यास सहा सात महिने लागत असत. अलीकडे एक जवळचा जलमार्ग सांपडल्यामुळें तीन महिन्यांत विलायतेस जातां येत होतें. हल्लीं गाड्या जशा वाफेच्या जोरानें चालतात, तशीं गलबतें वाफेच्या जोरानें चालवूं लागल्या पासून तर वीस दिवसांत विलायतेस जातां येतें.

वि०— सहा महिन्यांचा प्रवास आतां वीस दिवसांत होतो ना! केवढी तरी वाफेची शक्ति अद्भुत आहे !! पण, गुरुजी, गलबतावरील लोक समुद्रांत असतां खाण्या पिण्याचें कसें करितात!

गु — गलबतें आपल्या घरापेक्षां देखील मोठालीं असतात. त्यांत स्वयंपाक करण्याच्या खोल्या असतात. निजावयाच्या व मौज पहात बसावयाच्या जागा वेगळ्या असतात, तात्पर्य, आपल्या घरा प्रमाणें त्यांत सर्व सोई असतात. फरक इतकाच कीं गलबतांत बसून समुद्रांत दूर गेल्यावर कोणत्याही बाजूनें पाहिलें असतां वर आकाश आणि खालीं पाणी, आणि आजू बाजूस दूर अंतरावर असलें तर एखादें गलबत या वांचून कांहीं एक दृष्टीस पडावयाचें नाहीं. असा मुला, आज तुला समुद्र म्हणजे काय व तो केवढा असतो या विषयीं सांगितलें. तर आतां सांग पाहूं समुद्र म्हणजे काय तें?

वि०—समुद्रांत पाणी पुष्कळ असतें व तें फार खोल असतें. तसेंच गांवें, नद्या डोंगर, प्रांत देखील समुद्रांत बुडून जातील एवढा तो लांब व रुंद असतो. त्यांतून पार जावयास वाफेची मोठालीं गलबतें असतां ही कित्येक दिवस लागतात. एवढा तो अफाट दिसत असतो. असेंचना गुरुजी!

---

## वऱ्हाडसमाचार

मित्ती श्रावण शुद्ध ९ शके १८१५

## मुंबईचा भयंकर दंगा

गेल्या अंकीं मुंबईस हिंदुमुसलमानामध्यें भयंकर दंगा झाल्याचें व तो त्याच दिवशीं ह्मणजे शुक्रवार तारीख ११ रोजींच लष्करी लोकांनीं मिटविल्याचें आह्मी कळविलें होतें. परंतु तो दंगा खरोखर शुक्रवा रात्रीं न मिटतां दुसरे दिवशीं शनिवारीं व पुढील दोन दिवस मोठ्या जोरानें वाढत वाढतच चालला होता. तारीख ११ पासून तारीख १४ पर्यंत सर्व मुंबई शहराची दाणादाण उडाली होती. सहस्त्रावधी लोकांचा काम धंदा बंद पडला होता. मुसलमानांनीं हिंदुवर हल्ले करावे व हिंदूंनीं मुसलमानावर हल्ले करावे अशी त्या विस्तृत व प्रचंड शहरभर धुमाधूळ माजला होता. मुसलमानांनीं देवळें पाडलीं, मूर्ती छिन्न भिन्न केल्या, दुकानें लुटलीं हिंदूंनीं मशिदी जाळल्या, कबरी उकरल्या, रस्तलूट चालविली व परस्परांनी एकमेकांच्या कत्तली उडविल्या. दोन दोनशें, पांचपांचशें, व कित्येक वेळा तर हजार-हजार दंगखोरांच्या टोळ्या जमून खडाजंगीचा सामना होई. दगड व सोटा, हीं दोन मूळ अयुधें. त्या शिवाय कुऱ्हाडी, सुरे, चाकू वगैरे शस्त्रें वापरण्यांत आलीं. भर रस्त्यावर खून व मारामाऱ्या व लुटालुटी राजरोस चालल्या होत्या. ज्यांनीं मुंबई शहर पाहिलें असेल त्यांस या दंग्याच्या भयंकर स्वरूपाची कल्पना येईल.

केवढें अफाट व विस्तीर्ण मुंबई शहर त्याची आठ लक्षाहून अधीक लोकवस्ती व आसमंताच्या परिवांतील सत्रावधि लोक वरील दंग्यानें भयाभीत होऊन गेले होते. कोणाच्या प्राणावर केव्हां बेतेल याचा नेम नव्हता. लोकाच्या जीविता व वित्ताची, शाश्वती बिलकूल तिळमात्र राहिली नाहीं. मुंबईस पोलीसची फौज कितीही पुष्कळ होती तरी तिचें कांहीं चाललें नाहीं. पोलीसाच्या डोळ्या समोर भररस्त्यावर दिवसा टोळ्या कांहीं खून झाले. मुंबईस पायदळ घोडेस्वार पलटणी होत्या. त्या बंदोबस्ता साठीं दंग्याच्या ठिकाणीं दाखल झाल्या तरी त्यांच्या हातून पुरेशी व्यवस्था झाली नाहीं. पुण्याहून फौज आणविली. खुद्द कम्पांडर साहेब मुंबईस हजर आहेत. दंगखोर, लुटारू व खूनवाले हिंदु मुसलमान लोक जिवावर उदार होऊन निकरानें एकमेकावर तुटून पडत तेव्हां लष्करी शिपायांनीं बंदुकीच्या ठोशानें मारले, गोळीनें ठार अगर घायाळ केले, कित्येकांस कैद करून जबर अटकेंत ठेविलें तरी कांहीं दंगखोर जेरीस आले नाहींत. दंगेवाले हिंदु व मुसलमान लोक एकदां टोळ्या बनवीत, सरकारी पोलिसांच्या व लष्कराच्या दर्शनाबरोबर दाणादाण झाल्या सारखे निरनिराळे होत असत आणि पुन्हां थोड्या वेळानें दुसरी कडेच दंगा माजवीत असा क्रम चालला होता. शुक्रवारीं पहिले दिवशीं रात्रौ सामसूम वाटली पण शनिवारीं व रविवारीं हिंदु लोक अत्यंत चवताळले. मुसलमानांच्या अनन्वित कृत्या मुळें हिंदू गिरणीवाले मजूरदार व हजारो इसमांनीं आरंभाच्या कत्तलीस भरती आणिली. भायखळा, नळबझार, इरस्कीन रोड वगैरे भागा कडील धामधूम गिरगांव काळबादेवी रोड माझगांव, परळ, चिंचपोकळी, बांद्रे वगैरेकडे अत्यंत माजत चालली आहे. मुसलमान व हिंदु लोक आपापल्या जात भाईंच्या गटामध्यें जीव बचावयाच्या साठीं भरवस्तींत जाऊन राहिले. घरदार चीजवस्तु वगैरे जशाच तशाच टाकून मुलाबाळास पाठीवर व कडेवर घेऊन लहान मोठे लोक आपापल्या लोकांत लष्कराच्या मदतीनें राहण्यास गेले. मुसलमानांच्या महल्यांतून हिंदूंनीं पळ काढला व मुसलमानीं हिंदूंच्या महल्यांतून पळ काढला. दंगेवाले रस्त्यांनें बेफाम रीतीनें हिंडत होते असेंच नाहीं. तर जिकडे तिकडे बंदुक भरलेली हातांत घेऊन व तिच्या तोंडाशीं तीक्ष्ण धारेचें 'बायनेट' दंगेखोराच्या अंगांत बर्ची प्रमाणें खुपसण्यांत पोलीस लष्कर टेहळणी करीतच होतें पण दबाधरून चोरून छपून बंदोबस्तांतली जागा चुकवून भलतीच कडे दंगा आरंभणाऱ्यास काबीज करणें मोठें कठीण झालें. आणि ह्मणूनच रविवारच्या दंग्याधोप्या नंतर सोमवारींही लष्करी तळ बसला होता तरी पूर्ण शांतता झाली नाहीं.

दंग्याच्या तीन चार दिवसांत सुमारें १००।२०० मनुष्यें प्राणास मुकलीं ४००।५०० जखमा व घायाळ झालीं व १२००।१३०० लोक कैद झाले आहेत. इतक्या लोकांच्या नुकसानी मुळें दंगेवाले कमजोर व कमकुवत झाले, पोलिसांचा व लष्करांचा बंदोबस्त कडेकोट व जबर असून सर्व शहर शिपायांनीं व पलटणवाल्यांनीं व्यापून सोडलें, बाहेरून फौज जास्ती मदतीस येऊं लागली, हिंदूमुसलमानांतील पुढाऱ्यांनीं मध्यस्तीस आरंभ केला, आणि मुनसिपाल कमिशनर मि. आचवर्थ व पोलीस सुपरिनटेंडंट मि. व्हिन्सेट यांनीं लोकांच्या दिलाची खात्री करून पूर्ववत् दुकानें उघडण्यास व इतर व्यवहार चालविण्यास सोमवार तारीख १४ पासून लावलें. या व अशा अनेक साधनांनीं व उपायांनीं दंगा मोडत चालला, शांतता वाढत चालली व लष्करी अमलानें मुंबई शहर पूर्वस्थितीस येत चाललें आहे.

खुद्द महाराणी व्हिक्टोरिया सरकार यांस ही दंग्याची बातमी तारेनें कळली तेव्हा त्यांनीं हिंदुमुसलमानांतील धर्माच्या निमित्त झालेल्या दंग्याबद्दल अत्यंत दुःख प्रदर्शित केलें आणि लवकर शांतता व्हावी अशा अर्थाची तार मुंबईच्या गव्हरनरास पाठविली. लार्ड हॅरिस यांनीं पुण्याहून दंगा बंद करण्यासाठीं हरतऱ्हा केली. व ते मुंबईसही येणार होते पण कम्यांडर साहेबांनीं पुण्यास राहण्यासाठीं विनंती केली. पोलीस, पलटणी, व्हालंटीअर्स लोक बंदोबस्ताच्या कामांत तत्पर आहेत. दिवसा व रात्रौ खडा पाहरा सर्व ठिकाणीं आहे तेव्हां पुन्हा गडबड अगर दंगाधोपा होण्याची भिती दिसत नाहीं. पोलीसांस, सोल्जरांस व इतर कित्येक लहान मोठ्या आफिसरांस पुष्कळ दुखापती झाल्या. रक्त बंबाळ कपडे होण्या सारख्या अनेक जणांस जखमा व खोंका पडल्या आहेत आणि त्यांत कित्येक मुख्य मुख्य आफिसर लोकही आहेत. कांहीं अधिकाऱ्यांस तीन दिवस झोंप नाहीं, जेवण्यास फुरसत नाहीं व कांहीं गोरे उन्हाच्या तल्खीमुळें ठारही मेले. एकंदरीनें दंगा झाल्या नंतर जो बंदोबस्त व तयारी होती ती विशेष वर्णन करण्यासारखी असत. 'केसरीकरां' च्या ह्मणण्या प्रमाणें पोलिसांनीं दंगा उद्भवण्यापूर्वीं जी व्यवस्था करावयास पाहिजे ती मात्र अगोदर ठेवण्यांत आली नाहीं. कदाचित्, इतक्या विकोपाला सर्व गोष्टी जाऊन पोंचतील आणि त्याला इतकें भयंकर स्वरूप येईल असें पहिल्यानें स्वप्नींही आलें नसेल.

कांठेवाडांतील जुनागड संस्थानांत प्रभास पट्टण येथें ताबुताच्या वेळीं मुसलमानांनीं हिंदू लोकांवर मोठा हल्ला केला. तेव्हां गिझनीच्या महमदानें सोरटी सोमनाथाच्या देवळा संबंधानें मागें अनर्थ केले त्याची सर्वांस आठवण झाली असेल. खून पाडले, हिंदूचीं देवाल्यें भ्रष्ट केलीं, लुटालूट केली वगैरे सर्व कांहीं अघेर नगरींतल्या गोष्टी करण्यांत आल्या. जुनागड संस्थानची हिंदू प्रजा अनाथ व त्रस्त झाली इतकेंच नव्हे तर तिला प्राणाचीही निराशा वाटली. तेव्हां तिनें मुंबईच्या भाटे आदिकरून हिंदू लोकांची मदत मागितली. हिंदूंनीं माधवबागेंत सभा भरवून मुंबई सरकारास प्रभास पट्टणच्या हिंदूच्या संरक्षणासाठीं अर्ज धाडला आणि निराश्रित व पीडित झालेल्या लोकांस मदत देण्यासाठीं फंड उभारला. ही गोष्ट हिंदूंनीं कायदेशीर व उदार बुद्धीची केली. तिचें अनुकरण मुसलमानांनीं आपल्या जात भाईच्या संरक्षणासाठीं केलीं व तसाच फंड उभारला यांत कांहीं गैर नसून सर्व राजमार्ग होता. या मुसलमानांच्या सभेचा संदर्भ प्रस्तुत झालेल्या दंग्याशीं लावतात तो खोटा आहे असें मि. अमिरुद्दीन तय्बजी– प्रभास पट्टणच्या मुसलमान रयतेच्या बचावा निमित्त उभालेल्या फंडाचे सेक्रेटरी यांनीं एक पत्र प्रसिद्ध करून खुलाशानें कळविलें आहे. त्यांनीं असेंही ह्मटलें आहे कीं कोणत्याही मुसलमानाविषयीं अन्याय व छळ होऊं नये एवढ्या साठीं हा प्रयत्न असून शिवाय हिंदूंनीं उभारलेल्या फंडाच्या संस्थेबरोबर एक मतानें व सख्यानें वागण्याचा विचार आहे.

प्रभासपट्टणच्या दंग्याचा व मुंबईच्या दंग्याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं असें कांहीं वरील हाकिकती वरून ठरत नाहीं परंतु एवढें मात्र खरें कीं मुंबईस झालेल्या दोन्ही हिंदू मुसलमानांच्या सभेचा प्रत्यक्ष संबंध या दंग्याशीं नाहीं. प्रभास पट्टणच्या दंग्यानें वीरश्रीला चढून मुसलमानांनीं कत्तल आरंभली असावी आणि नंतर त्या आगळीकी पाहून क्षुब्ध व संतप्त झालेल्या हिंदूंनीं मुसलमानास उलट कत्तलीनें चांगला उतरा दिला हेंही एका पक्षीं मनुष्य स्वभावाला अनुरूपच झालें.

'गोरक्षण' चें मोठें कारण मुंबईच्या दंग्यांत आहे असें ह्मणतात पण तें आह्मांस बिलकूल मान्य नाहीं. गोरक्षणाच्या संस्था महाराष्ट्रांत ह्मणण्या सारख्या प्रबल नाहींत इतकेंच नाहीं तर कित्येक ठिकाणच्या संस्था नुसत्या नामशेष आहेत. गोरक्षण, कोठेंच कांहीं होत नाहीं ह्मटलें तरी चालेल. तेव्हां गोरक्षणामुळें मुसलमानास गोमांस खाण्यास मिळालें नाहीं ह्मणून त्यांनीं दंगा केला असे कांहींच वास्तवीक प्रकार नाहीं. खरोखर गोरक्षणानें असा दंग्याच्या दुर्दीन प्राप्त झाले तर आह्मी हिंदूलोकांस कृतकार्य व धन्य समजूं. आणि गोरक्षणा मुळेंच हा दंगा उसळला असेल तर तो किती अन्यायाचा, शिरजोरपणाचा, व राज्याला हानिकारक आहे हें वरवर पाहणाऱ्यांसही कळून येईल.

बहुत करून असले धर्मप्रकरणांतले दंगे एकाच विवक्षित कारणामुळें उद्भवत नाहींत. नांवाला एखादें कारण लोक सांगतात पण वास्तविक तसा प्रकार नसतो. या सर्व

आमचे दुम्यांन गव्हाचा ४२५ खंडीचा सट्टा होऊन सट्टा त्यांजकडेस पाठविला असून बयाण बद्दल दर खंडीस रुपये १० प्रमाणें रकम रुपये ४२५० मुळचंद जुगलकिशोर यांजकडून आह्मास मिळाली नाहीं. करितां जाहीर करण्यांत येत आहे कीं तो सट्टा कोणी त्याज पासून विकत घेऊं नये. घेतल्यास त्याजवर आमचे बयाण्या बद्दल रकम रुपये ४२५० चा बोजा राहील कळावें तारीख ६ माहे मे सन १८९४ इ०

[ सही ]

मनसुकदास चुनिलाल साहू दुकान खामगांव तर्फें देवीदास छोटमल कोठारी राहणार खामगांव. दस्तुर खुद्द

---

नोटीस

नोटीस बेशर्मा तुकाराम वल्द जानजी पळसकार राहणार येवदे हल्लीं वस्ती मौजे कुटासें तालुके अकोट यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुझी लग्नाची बायको असून तीन वर्षां पूर्वीं तूं मनला चांगल रीतीनें वागवीत होतास. सुमारें तीन वर्षें झालीं तूं वाईट मार्गास लागल्या मुळें व मनला खाण्यास न दिल्या मुळें माझे बाहिणीचे घरीं राहणें भाग पडलें. मी व माझे चुलत्यानें कित्येक वेळ तुजला निरोप दिले कीं मनला घेऊन जावें परंतु तूं नेलें नाहींस या कारणांनीं मनला निर्वाहा करितां सावकारांचें कर्ज काढावें लागलें व त्याचा कर्जासाठीं माझे मागें फार तगादा आहे तीन वर्षांत मनला १५० दिडशें रुपये कर्ज झालें आहे तें मनला देऊन माझी रशीद घ्यावी व मनला नांदण्या करितां घेऊन जावेस ह्मणून ही नोटीस देण्यांत येते कीं, पंधरा दिवसांचे आंत वरील प्रमाणें अमल करावा. तसें न केल्यास ही नोटीस तुह्मास कबूल झाली असें समजून फारकतीची वाट न पहातां दुसरा गंधर्वाचा नवरा करीन व झालेले कर्जा करितां तुमचेवर दिवाणींत फिर्याद करीन कळावें तारीख ३ माहे मे सन १८९४ इ.

[ सही ]

निशाणी हवसी मर्द तुकाराम पळसकार राहणार येवदे ईचे हातची बांगडी असे (०)

नादारी मोकदमा नंबर $\frac{२२}{१८९४}$

नमुना नंबर (जी)

वि० नादारी कोर्टाचे ज्यडज्य जि० आकोले.

सर्व लोकांस नोटीस देण्यात येते कीं, सेख छनु वा सेख जलाल बकरकसाई राहणार अकोलें हा नादारी आहे असा आज तारीख २१ माहे एप्रिल सन १८९४ इ. रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १४ माहे जुलई सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्यां करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा आसायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तकार सांगणें असेल ते आणि त्या बद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस नमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्याणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलची प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावे तारीख २८-४-९४ इ०,

B. B. Sule
Judge
Bankruptcy Court
AKOLA

...scene of barbarity
it was begun and closed in
...they rise into eminence after
every 17 or say 18 years. Perhaps
आणि त्या

नादारी मोकदमा नंबर १९/१८९४

नमुना नंबर (जी)

वि० नादारी कोर्टाचे ज्यडज्य जि० आकोले

सर्व लोकांस नोटीस देण्यांत येते कीं, विठोबा वा नाऊसा कळाल राहणार कुरणखेड हा नादारी आहे असा आज तारीख १३ माहे एप्रिल सन १८९४ इ. रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ७ माहे जुलई सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा आसायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहू त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नावें नमूद करावी. ही नोटीस नेमण्या करिता नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या याद्यो उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे सांगविणें असतील त्याणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकिकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचे प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहुन एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावे तारीख २७-४-९४ इ०

B. B. Sule
Judge
Bankruptcy Court
AKOLA

नोटीस.

रा. रा. मुळचंद जुगळकिशोर साहू दुकान खामगांव यांस.

मनसुकदास चुनीलाल साहू दुकान खामगांव यांजकडून या नोटीशीनें असें कळविलें जातें कीं चैत्र शुद्ध १५ संवत १९५१ मारवाडी रोजीं गहु खंडी (४२५) सव चारशे आम्हां पासून तुम्हीं घेतले त्या जबद्दल सट्टा एक रुपये ४२५० च्यार हजार दोनशे पन्नासचा रिती प्रमाणें वैशाख वद्य १ संवत १९५१ मारवाडी रोजीं आम्ही तुम्हांस सट्टा पाठविला त्यांत दर खंडीस रुपये (१०) प्रमाणें रुपये ४२५० बयाणा बद्दल नगदी घेतले म्हणून खामगावचे सराफी रिती प्रमाणें लिहून दिलें आहे. व रुपये पावले म्हणून सही केली आहे. परंतु रिती प्रमाणें आम्हांस बयाणाचे रुपये (४२५०) आज पावेतों मिळाले नाहींत खामगावास सट्याची रीत अशी आहे कीं सट्टा पाठविले दिवसा पासून तीन दिवसांत बयाण्याचे रुपये देणें. त्या प्रमाणें सट्टा तुम्हांस पावला परंतु बयाण्याचे रुपये आजपावेतों तुम्हांस आम्ही दररोज मागणी करितों परंतु देतो देतो अशी हुल देत आहां व रुपये मात्र देत नाहीं. यास करितां या नोटीशानें तुम्हांस कळविण्यांत येतें की आमचा गव्हाचा सट्टा तुम्ही कोणास न विकतां नोटीस पावले पासून तीन दिवसांचे आंत रकम रुपये (४२५० बयाण्याचे) आमचे दुकानावर आणुन हजर करावे तसे न झाल्यास रिती प्रमाणें दिवाणी कोर्ट मार्फत नोटिशीचे व कोर्टाचे खर्चासह अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च व नुकसान होईल तीसह सर्व वसूल करणें भाग पडेल म्हणून दिली नोटीस ता. ९ माहे मे सन १८९४ इसवी.

(सही)

मनसुकदास चुनीलाल मारवडी
दुकान खामगांव तर्फे देवीदास
छोटमल कोठारी वस्ती
खामगांव दस्तुर खुद.

## जाहिरात.

खामगांव व इतर ठिकाणचे सर्व साहुकार व दुकानदार यांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं मुळचंद जुगळकिशोर साहू दुकान खामगांव यांचे व

आमचे दर्म्यान गठ्ठ्याचा ४२५ खंडीचा सट्टा होऊन सट्टा त्यांजकडस पाठविला असून बयाण बद्दल दर खंडीस रुपये १० प्रमाणें रकम रुपये ४२५० मुळचंद जुगलकिशोर यांजकडून आम्हास मिळाली नाहीं. कारितां जाहीर करण्यांत येत आहे कीं तो सट्टा कोणी त्याज पासून विकत घेऊं नये. घेतल्यास त्याजवर आमचे बयाण्या बद्दल रकम रुपये ४२५० चा बोजा राहील कळावें तारीख ५ माहे मे सन १८९४ इ०

[ सही ]

मनसुकदास चुनिलाल साहू दुकान खामगांव तर्फे देवीदास छोटमल कोठारी राहणार खामगांव. दस्तुर खुद्द

---

नोटीस

नोटीस बेशर्मा तुकाराम वा। जानजी पळसकार राहणार येवदे हल्लीं वस्ती मौजे कुटासें तालूकें अकोट यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुझी लग्नाची बायको असून तीन वर्षां पूर्वीं तूं मजला चांगल रीतीनें वागवीत होतास. सुमारें तीन वर्षें झालीं तूं वाईट मार्गास लागल्या मुळें व मजला खाण्यास न दिल्या मुळें माझे बहिणीचे घरीं राहणें भाग पडलें. मी व माझे चुलत्यानें कित्येक वेळ तुजला निरोप दिले कीं मजला घेऊन जावें परंतु तूं नेलें नाहींस या कारणांनीं मजला निर्वाहा करितां सावकारांचें कर्ज काढावें लागलें व त्याचा कर्जासाठीं माझे मागें फार तगादा आहे तीन वर्षांत मजला १५० दिडशें रुपये कर्ज झालें आहे तें मजला देऊन माझी रशीद द्यावी व मजला नांदण्या करितां घेऊन जावेस ह्मणून ही नोटीस देण्यांत येते कीं, पंधरा दिवसांचे आंत वरील प्रमाणें अमल करावा. तसें न केल्यास ही नोटीस तुह्मास कबूल झाली असें समजून फारकतीची वाट न पहातां दुसरा गंधर्वाचा नवरा करीन व झालेले कर्जा करितां तुमचेवर दिवाणींत फिर्याद करीन कळावें तारीख ३ माहे मे सन १८९४ इ.

[ सही ]

निशाणी हवसी मर्द तुकाराम पळसकार राहणार येवदे ईचे हातची बांगडी असें ( ९ )

नादारी मोकदमा नंबर $\frac{२२}{१८९४}$

नमुना नंबर ( जो )

वि० नादारी कोर्टाचे ज्यडज्य जि० अकोले.

सर्व लोकांस नोटीस देण्यांत येते कीं, सेख छनु वा। सेख जलाल बकरकसाई राहणार अकोलें हा नादारी आहे असा आज तारीख २१ माहे एप्रिल सन १८९४ इ. रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १४ माहे जुलई सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्यां करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा आसामी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्याणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलची प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावे तारीख २८-४-९४ इ०

B. B. Sule
Judge
Bankruptcy Court
AKOLA

दग्यांत विशेष स्मरणांत ठवण्यासारखी गोष्ट अशी कीं चांगले वतनदार, सुशिक्षित, श्रीमान, सुखवस्तु असे मुसलमान नव्हते तसे हिंदूही नव्हते. मुंबईच्या दंग्यावर टीका करणार विलायतचें पत्रकार असें उघड ह्मणू लागले आहेत कीं राष्ट्रीय सभेच्या चळवळी मुळें ही धर्मांतील काटाफूट हिंदुमुसलमाना-मध्यें वाढली आणि तिचा परिणाम अशी भंयकर क्रांति व दंगे धोपे झाले. अगोदर या दंग्याला आरंभी जें धर्मस्वरूप होतें तें थोड्याच तासा नंतर विलयास जाऊन लुटा-रूपणा व लुच्चेगिरीपणा फार माजला. जे भुकेकंगाल व अन्नाला मोताद होते त्यांना ही संधी चांगली मिळाली. व त्यांनींच शेवटीं दुःखमय प्रसंग आणिला. राष्ट्रीय सभेचें जें ह्मणणें आहे कीं देशांत भिकारी लोक फार आहेत, त्यांस लिहिता वाचतां देखील येत नाहीं, व त्यांच्या पोटापाण्यासाठीं धंदाही त्यांस कांहीं विशेष येत नसतो तेव्हां जर कधीं का-ळीं बंडावा झाला तर राष्ट्रीय सभेतील लो-कांचें या आशिक्षितां पुढें चालणार नाहीं सरकारच्या तलवारीचा बंदुकीचा निभाव न लागतां सर्व राष्ट्रांतील बिथरलेल्या शेतकऱ्या पुढें साऱ्या लष्करेंचे कांहीं ही चालणार नाहीं केसरीकारांनीं निर्णीत केल्या प्रमाणें हा दंगा मि. ह्यूम साहेबांच्या प्रसिद्ध स-रक्यूलरचा क्षुल्लक दाखला आहे धर्मवेड दं ग्यास कारण असेल परंतु लोकांचा कंगाल पणा व मुळमानाचा पोकळ वरचढपणा ही कारणें विशेष जोराचे दिसतात. इंग्रज रा-ज्याच्या पूर्वींही हिंदु मुसलमानांचा एको-पा व एकभाव होत चालला होता. खरोखर तो इंग्रजी आल्या पासून दुणावत चालला आहे. खरोखर हिंदुमुसलमान लोक राज-द्रोही ह्मणजे इंग्रजाच्या विरुद्ध असते तर दोघांनीं एक समटीचा पक्ष इंग्लिशांची राज्य स्थापना इंडियांत होऊं दिली नसती परंतु जीं आपसातील वैमनस्यें, धर्मभेद, व भाषा भेद राज्यास सार्वनीभूत झाली तींच कार-णें पुन्हां उद्भवूं दिल्यास राज्यास अपाय कारक आहेत इतकेंच नाहीं तर त्यामुळें राज्य केव्हां बुडेल याचा नेम नाहीं इंग्रजी अंमलदार कित्येक मुसलमानाचा वृथा थोर-पणा करितात व हिंदूची त्या मानानें अव हेलना करितात त्यापक्षपाताच्या वर्तन क्रमा मुळें मुसलमानांस मुंबईत दंगा करिते वेळीं मोठासा विधिनिषेध वाटला नसावा. हल्लीचा काळ संमेलनाचा व एकीकरणाचा आहे तेव्हां त्याला धर्म भेदा अन्वयें पक्षपात काडीमात्र उपयोगी नाहीं. यथान्याय हिंदूमुसलमान प्रजेचें संरक्षण व तिला अधिकारदान एकाच तराजूनें झालें पाहिजे.

The Berar Samachar

MONDAY AUGUST, 21, 1893

We are almost horrified to hear the accounts of riots in Bombay during the past week. The old animosities between race and race have again renewed their former smarts and have burst ablaze anew. It is a consolation, and indeed a great consolation it is that the diffusion of education has withheld a number of educated men of both the communities from adding fuel to the fire. The Mahomedans on the whole are yet a barbarous race. The fire of fanaticism was fanned by a Bombay meeting among the Mahomedans sympathising with their people at Prabhaspattan. This was natural as the Bombay Mahomedans fancied their bretheren wronged. But this indirectly proved the cause of the present outbreaks which are both inhumane and barbarous excelled by the only once which occasioned them.

It is a belief among the Hindus that when the age of Krishna came to an end, the deity retired to Pattan. There is a shrine there of the God who thence ascended the Heavens. From this point of view the temple is of as much importance to the Hindus as Juggonath or Oudh is. Every religious Hindu pilgrim going to Dwarka and Dakor is considered to have fully paid homage to his Gods if he visits Pattan. What Makka is to a Mahomedan Prabhas Pattan is to a Hindu. The Mahomedans at Pattan which is unfortunately situated in the Junagad territory the domain of a Mahomedan Nabob have evidently outraged the feelings of the Hindus. On the Tabut day while the tabuts were taken to be immersed, some Mahomedans surprised the monks at the Temple suddenly. Of all the existing religions the Mahomedan religion is the most intolerant. The Mahomedans of lower India were once Hindus. Most of them were forceed to conversion by the iron hand of their intolerant rulers. Long series of generations have now rendered them as fanatic and intolerant as the genuine followers of the Kuran. Be it as it may! The Hindus at Pattan had long smelt of the projected disturbances. Such disturbances are invariably the outcome of several smothered complaints under which one or the other of the parties long groan, ultimately breaking out under the name of religious zeal and fanaticism. The Hindus at Pattan had communicated their suspicions to the Political Agent at Rajkot. Being assured by him that even a bit of their immaterial property was not in danger and finding streets assigned to the processions the Hindus were completely quieted and unconscious of the calamity that befel them. The tabuts reached the destination of the immersion. The growin cares were well nigh lulled to sleep by the sure and immediate immersion that was to take place in a few minutes. When lo a band of Mahomedans suddenly appeared before the Gadi and Sthan of their revered deity! The monks offered a short remonstrance. They were drenched in carosine oil taken there for the purpose and were burnt alive! This barbarity, this tremendous atrocity is almost unprecedented in Indian annals at least as far back as the 11th century. The monks were burnt alive in cold blood. The monstrocity was further completed not only by the profanation of the shrine most sacred to a Hindu! The Sthan was burnt, the idol broke asunder and Musjid raised over it. This took place in an inconceivably short time. Though now we take a number of hours to describe this foul scene of barbarity it was begun and closed in a few minutes. The Mahomedans of Berar and especially those of Amraoti have evinced a remarkably mild, tolerant, and generous tone both of mind and behaviour. We cannot but com mend their prudence and sense. When the news of the disturbances at Pattan were carried to Lukhmidas Khimji the worthy townsman of Bombay mea sures were concerted to relieve the families of the distressed, subscriptions raised, and plans to redress the wrong proposed and formed. A week followed and the Bombay Mahomedans held a counter meeting. This meeting is the germ, the real though indirect cause of the infuriated Hindu and Mahomedan Riot in Bombay.

Several reflections both happy and melancholy are awakened in us by this tremendous disturbance! Infinite com pensation may be made by the damaging party to the party damaged. But the consecrated Pattan Sthan has lost its holiness for ever. Other temples or other ordinary musjids have been profaned or destroyed. They can be replaced. But the holiest of Hindu shrines is gone and gone for ever. Were the assurances of the Political Agent purely empty and singularly misleading? While sufficient indications are given that the Hindus have become enervated both in body and religious zeal, can their spirit remain torpid and inactive when thus sorely outraged and insulted? Whatever the truth in the report, inspite of the number of preventive measures now adopted by the ruling power has this spirit not been stirred up and awakened? Can it be lulled to sleep? Will the Hindu and his Mahomedan brether never make a common cause? All other questions except the last may be an—swered in the affirmative. The last alone demands some observations. When our Government has abolished Suttee, has allowed remarriage when it had the boldness to encroach on the province of social reform inspite of the public opinion of the whole country, it is indeed very strange that it should not be able to quell this bitter hostility between race and race. Thanks to Cumberlege the Superintendent of Police at Amraoti. His name is inseparably associated with the suppression of a furious riot in the local Jail. His soundness of mind never deserts him. When remonstrance failed he dashed into the conflict of the excited criminals and restored peace Mr. Nicholetts and and Mr. Cumberlege showed the most noteworthy unbiased spirit passed the Mohuram at Amraoti very smoothly. and quietly. Much however is also to be attributed to the amicable feelings subsisting among the two races. If the Mohurums pass off smoothly every where and if there be disturbances every year in some isolated places giving sufficient indications for them long before the period, the authorities can easily suppress them. Is then the government afraid to take steps where the Mahomedan susceptibilities are concerned? The confidence of the people is considerably shaken. However preposterous their ideas they have room to suspect the government has in these disturbances one inexhaustible means for setting class against class! The Bombay Gazette believes & infers these disturbances as the do—ings of lawless budmashes! Our readers can see how unjust this inference! These disturbances are the natural outcomes of fanaticism. If the Badma—shes wanted an opportunity to loot and plunder we can not comprehend why they rise into eminence after every 17 or say 18 years. Perhaps the Bombay Gazette might answer that the plunder amassed every twentieth year is sufficient to maintain them for another score of years to come! No doubt educated men of both the religions have not taken any direct or indirect part in these disturbances. This is natural. Diffusion of education has both enlightened and softened such men. Every year in some part or other of this wide country we have similar disturbances. The Hindus have bitter complaints: they are unjustly dealt with. This province has not yet forgotten how in our neighbouring province at a town not far from us namely at Burhanpur the Mahomedans were successively riotous and how the generous Chief Commissioner inspite of the brutal Havoc on Hindu population pronounced his verdict in favour of the other race! Be it as it may we wish these disturbances will cease once for all and the actions of the Government whatever they be hitherto will be restored to their former esteem and popularity.

## वऱ्हाड.

हवामान— शुक्रवार रात्री पासून पाऊस थोडथोडा पडूं लागला आहे आणि सध्यां च्या चिन्हावरून पाऊस चांगला होईल असा रंग दिसतो. किरकोळ दुखणी जो रावर आहेत आणि कित्येक जिल्ह्यांतून तु-रळक पटकीचा वाखा सुरू असल्याचे कळतें.

रेव्हेन्यू कमिशनरचे क्लार्क आफ कोर्टचे जागीं रा. रा. रघुपतराव मोहनराव पोलीस इनस्पेक्टर यांस निवडलें.

कुमार श्रीहरबानजी आफिशिएटींग डे पुटी कमिशनर यवतमाळ यांस ज्या गुन्ह्यां स मरणाची शिक्षा नाहीं अशा गुन्ह्यांची चौकशी करण्याचा अधिकार देण्यांत आला आहे.

हैद्राबाद मेडिकल स्कूल मधून पसार झालेले दोन विद्यार्थी वऱ्हाडांत हास्पिटल अ-सिस्टंटचे कामावर आले आहेत त्यांचीं नांवें येणे प्रमाणें:— आर. यल्लपा राजप्पा, आ-णि एम. जाफरबेग.

असिस्टंट कमिशनर, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, आणि दुसरे आफिसर लोक यांच्या लोअर व हायर परीक्षा उमरावतीस तारीख ८ नोवेंबर रोजीं सुरू होतील.

आडगांवाहून एक बातमीदार कळवितो कीं तेथील पोष्टमास्तर आपले कामांत हयगय करितात असें वरिष्टास कांहींजणांनीं लेखी अर्जानें कळविल्या वरून त्यांच्या कामाची योग्य शहानिशा चालली आहे.

काल रोजीं सायंकाळीं वर्षोत्सव व्याख्या न मालेतील पांचवें व्याख्यान रा. रा. शंकर नारायण डांगे बी. ए यांनीं दिलें. विषय 'पाश्चिमात्य लोकांचे कांहीं विचार' हा होता.

कैफानें प्राणहानि— परवां शनिवारीं ये-थील सहा तरूण मुसलमानांनीं निशा ये-ण्या साठीं भांग तयार केली आणि अंमल जोरदार यावा ह्मणून बचनागही भांगेंत घातला. त्या भांगेचा परिणाम त्यांच्या शरी-रावर फार भयंकर होऊन चौघेजण मरण पावले.

रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार अस्थाची यांची नेमणूक उमरावतीस झाली आणि त्या अन्वयें ते लवकरच येथून उमरावतीस जातील.

## वर्तमानसार.

मुंबईच्या दंग्याची परिसमाप्ति झाली शांतता पूर्ववत् होऊन सर्व व्यवहार पूर्वी प्रमाणें सुयंत्र चालूं झाले. पण हिंदु लोकांत जी दहशत बसली आहे ती अतिशयच आहे. गेल्या आठवड्यांत दहा हजारावर हिंदु लोक मुंबई सोडून आपल्या घरीं गेले. रेल्वे कंप-न्यांची उतारूच्या गर्दीमुळें त्रेधा उडाली आहे.

इंग्रजवकीलाची काबुलास रवानगी.

सरहद्दीच्या संबधाचे जे कांहीं लढे आहेत त्यांबद्दल समक्ष बोलणें करून निकाल करून घेण्याकरतां एका सरकारी कामदारास अमिराच्या भेटीकरता काबुलास पाठीवेणें जरूर आहे असें ठरून त्याप्रमाणें सर मार्टिमर डुरंड यांस पाठविण्याची तयारी झाली आहे. त्यांच्या रक्षणाकरतां त्यांच्याबरोबर कांहीं युरोपियन आफीसरही जावयाचे असून त्यांच्याही नेमणुका होऊन चुकल्या आहेत. हें वकील मंडळ बहुधा या महिन्याच्या अखेरीस काबुलास जाण्याकरतां पेशावराहून निघणार आहे असें सिमल्याची तार सांगत्ये.

त्याच्या बरोबर पुढील कामदार जावयाचे आहेतः– बातमी खात्याचे मुख्य क. एलिस; झोबचे पोलिटिकल एजंट क्या. माकमोहन; ले. स्मीथ; पंजाबच्या सरहद्द फौजेतील सर्जन मि. डोनल्ड; परराज्य डे. रजि. मि. क्लार्क; व याशिवाय कांहीं पार्शियन दुभाषी आहेत वकील सर मार्टिमर यांच्या रक्षणाकरतां पेशावर पासून अमिराचे लश्करी लोक त्यांच्या बरोबर हजर राहणार आहेत. आपल्या बरोबर इंग्रजी फौजेची गरज नाहीं असें सर मोर्टिमर डुरंग यांचेंच ह्मणणें आहे.

ता. २१ च्या सुमाराम सर्व तयारी पुरी होईल आणि लंडी कोटल येथें सर्व मंडळी एकत्र जमेल; नंतर एक दोन दिवसांतच पुढें रवाना होईल. हुजऱ्याचे वगैरे काम करण्याकरतां कांहीं स्वार बरोबर जावयाचे आहेत हें मंडळ ज्या वाटेनें जावयाचे त्या वाटेनें सर्व तयारी अमिराकडून करण्यांत आली आहे.

हें वकील मंडळ काबुलास असें पर्यंत जमरूद पासून लुंडीकोटल पर्यंत टेंपररी तार होणार आहे.

पुण्याची रंगशाळा बंद करून जें कांहीं उत्पन्न होईल तें भागीदारांस वाटून देण्यांचें ठरलें असें प्रसिद्ध झालेल्या नोटिशीवरून समजतें.

विलायतच्या युनिवर्सिटीच्या परिक्षा कलकत्यास होण्याचे ठरलें. युरोपियन मुलांकरतां ही सोय आहे.

हजारो लोक कोठें दिसत नाहींसे झाले आहेत पण उरजगांव येथील अमिराच्या, फौजेवर रात्रीचा हल्ला झाला व त्यांत हजारो लोकांचा पराभव झाला व असें काबूलच्या पत्रावरून समजतें.

खीलातच्या संस्थानांत कांहीं गडबड सुरू झाली आहे. गव्हार खान नावाच्या एका माणसानें ३००।४०० लोकांसह खीलात शहरीं शेजारच्या पांच कोसांवरचीं कित्येक खेडीं लुटलीं खीलातचा राज्यकारभार खानाचा मुलगा करीत आहे व या हल्ला करणारास कसा हाकून लावावा हें तेथील इंग्रज कामदार मे. पोल यांणें त्यास सांगितलें आहे इतकेंच नव्हे तर तो दंगेखोर राजधानींशहर जें खीलात त्याच्या जवळ येऊं लागेल तर आमचा फौज त्याच्यवर हल्ला करून त्यास हाकून लावील असें त्यास आश्वासनही दिलें आहे असें अलहाबादची तार सांगत्ये.

गिलगीत रस्ता पुरा करण्याची तयारी चालली आहे.

फ्रांन्सानें मागितलेला मेकांग नदीच्या डाव्या अंगचा प्रांत खुला करून स्वाधीन करण्याची सायाम सरकारची तयारी चालली आहे तसेंच चाटाबून फ्रांन्सास आपल्या ताब्यांत घेण्यास सोईवार पडावें असेंही सायमकडून करण्यांत येत आहे.

सायामच्या दरबारी असणारा फ्रेंचवकील बेबनाव झाल्यामुळें जो तेथून निघून गेला होता तो परत येऊन आपल्या कामावर रुजू झाला. ठा० अ०

सर्पांचे खेळ करणाऱ्या दोवां गारुड्यांचा लाहोरास उत्तम ठरेल त्यास एक पागोटें बाक्षिस दिलें जाईल या शर्तीवर पुष्कळ लोकांसमक्ष खेळ झाला. प्रथम त्यांतल्या एका गारुड्यानें एका सापाचे वेगळाल्या तऱ्हेचे खेळ करून शेवटीं त्याणें तो साप आपल्या तोंडांत घातला त्याचें डोकें चावलें नंतर दुसऱ्या गारुड्यानें आपल्या जवळच्या सापाच्या तोंडांत हात घालून त्याच्या कडूनें तो गिळविला व तो प्रकार पाहून लोकांनी त्यास इनाम दिलें. इतकें झाल्यावर त्या सापानें त्यास विळखा घालून त्यास चावा घेतला पण त्या गारुड्यानें जवळच कांहीं औषध लाविलें व तो बराही झाला असें सांगतात.

निजामाच्या जमाखर्चाच्या व्यवस्थेची स्थिती कशी आहे व कशी असावी यासंबंधानें सरदार डिलरजंग यांणीं एक मोठा निबंध लिहून छापून प्रसिद्ध केला आहे. निजामसरकार त्याबद्दल काय विचार करतें हें पाहणें आहे. हे सरदार डिलरजंग ह्मणजे आपल्या इकडे प्रसिद्ध असलेले अबदूल हक्क आहेत हें सर्वांस माहित असेलच. त्याणीं आजपर्यंत शहाणपणाचीं जीं कित्येक अचाट कृत्यें केलीं आहेत त्यापैकींच हा एक उद्योग आहे असें दिसतें. व यावरून तें पुन्हा निजामशाहींत शिरणार असें दिसतें. ठा.

अमेरिकेंत एक गृहस्थ कालेजांत शिकत आहे व जाहिराती कशा लिहाव्या हा धंदा शिकण्याचा त्याचा हेतु आहे. अमेरिकेंत चांगल्या जाहिराती लिहिणाराला सालीना दहा हजार डालर उत्पन्न होतें व शिकलेला मनुष्य त्यांत पडला असतां खात्रीनें ज्यास्त पैसे मिळवील हें सागणें नकोच.

महामारी रोगासंबंधीं तोडगा – महामारी रोगोत्पादक एक प्रकारचे सूक्ष्म जंतू आहेत असें आतां जवळ जवळ सिद्ध झालें आहे. व ते जंतू असलेली लस रसायनरीत्या तयार करून, देवी काढतात, त्या प्रमाणें ती सूक्ष्म पिचकारीनें त्याचे खालीं घातल्यास महामारी होण्याची भिती नाहीं असें जर्मनीतील जंतूंचें आस्तित्व करणारे डा. कोच व त्यांचे अनुयायी यांचें ह्मणणें आहे. व त्या संबंधी तिकडे अनुभवही घेऊन पाहिले आहेत असें ह्मणतात. बा. वृ.

पार्लमेंटचें हिवाळ्याचें सेशन अक्टोबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत सुरूहोईल.

दिवाणी हुकूम नाम्यावरून प्रतिवादीस एक वेळ तुरुगांत घातलें, आणि त्या कैदेंतून तो कोणत्याही कारणानें सुटला, तर त्याच हुकूम नाम्यावरून प्रतिवादीस पुन्हा कैदेंत ठेवितां येत नाहीं असें मनिलालदत्त यांच्या खटल्यांत कलकत्ता हायकोर्टानें नुकतेंच ठरविलें आहे.

खानदेशांत मडगांव येथें जें सरकारी शेत आहे तें विकून टाकल्याबद्दल सरकारानें परवानगी दिली. हें शेत ९०० एकर असून त्यापैकीं निम्मे चराऊ रान, व निम्मे शेत जमीन आहे. ह्या शेतीपासून कांहीं फायदा नाहीं असें वाटल्यावरून बहुतकरून तें विकण्यास सरकारानें निश्चय केला असावा असें दिसतें.

चिकागो येथील प्रदर्शनांत दुभत्या गाईसाठीं एक ९००० डालरचें व १००० डालरचें अशीं दोन बक्षीस ठेविलीं आहेत. प्रदर्शनांत दाखविण्यास आणीत असतां जिच्या दुधापासून २५ शेर लोणी तयार होईल तीस बाक्षिस देण्याचा ठराव आहे शु. सू.

निजाम हैद्राबादचे माजी डेपुटी अकौन्टंट जनरल मि. गयाप्रसाद एम. ए. मृत्यु पावल्याची खबर आली आहे हे गृहस्थ ४००. रु. पगारावर तेथें नोकर होते व बरेच हुद्याचीं कामें त्यानीं केली होतीं असें ह्मणतात.

सावकारांनीं सावध व्हावें– लष्करी लोकांना कर्जाऊ दिलेला पैसा फिर्याद करून परत घेतां येत नाहीं.

बडोद्यास कांहीं स्त्रिया कोकिलाव्रत धरल्यामुळें कोकिलाशब्द ऐकण्यास गेल्या असतां त्यांस कोणी लुटल्याचें वर्तमान प्रसिद्ध झालें याला अविचारी धर्म कर्माचा परिणाम कां ह्मणूं नये!

यंदाच्या औद्योगिक परिषदेस ता. २ सप्तंबर रोजीं सभेपुढें सात विषय येणार आहेत. सु० प०

हिंदुस्थानांत "रबरी" ची लागण मोठ्या कसोशीनें चालूं आहे सिलोनमध्यें रबरी झाडाचे पीक उत्तम येऊन त्याचा व्यापार सुरू झाला. सध्या त्या झाडाची लागण मद्रास व ब्रह्मा या देशांत करण्याच्या कामी लोक गुंतले आहेत.

अमृतसर येथील एका खोजानें पारीस शहरामध्यें हिंदु लोकांचीं पक्वानें तयार करून विकण्याचे दुकान उघडलें आहे. नित्य त्या दुकानदारास खर्चवेच जाऊन २० रुपयांचा फायदा होतो. म. मि.

---

नोटीस

वजीर वल्लद निजाम अज्ञान पालन करणार उमरावबी मर्दे निजाम यांस–

नोटिशीनें कळविण्यांत येतेकीं गायगांव तालुका बाळापूर येथील मदतमाश इनामी जमीन नामे चकवालें नंबर ३ ही आपल्या घराण्यांतील असून त्यांत आपले सर्वांचे हक्क आहेत तर ती जमीन तुह्मी आपले नातलग शरफु वल्लद अमिरुद्दीन यांच्या नादीनें व सल्यानें विकणार असल्याचे ऐकतें. तुह्मास त्या इनामी जमिनीचा कोणत्याही प्रकारें गहाण लहान, विक्री वगैरे अफरातफर करितां येणार नाहीं. तसें करण्यास कायद्यानें मनाई आहे. जमिनीचें उत्पन्न तुह्मीच खाता व माझ्या पोटापाण्याची तजवीज कांहींच करीत नाहीं माझ्या खाविंदास मरून चारवर्षांवर दिवस होत आले पण त्या मुदतींत इनामाचे उत्पन्न मला कांहीं मिळालें नाहीं. तर या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं आज पर्यंतचा माझा उत्पन्नाचा पैसा नोटीशीचे तारखे पासून आठ दिवसांत आणून द्यावा. तसे न केल्यास कोर्ट मार्फत सर्व खर्चासह सर्व रक्कम भरून घेतली जाईल. आणि जमिनीची विल्हेवाटीनें अफरातफर कराल तर त्या बद्दल जबाबदार तुह्मास धरलें जाईल. मशारनिल्हे शरफु हे त्या इनामा संबंधानें कांहीं देववेव करितील तर त्यास जबाबदार केलें जाईल. आणि जो कोणी ती जमीन गहाण वगैरे घेऊं इच्छील त्यास ती मिळणार नाहीं एवढेंच नव्हे तर त्याच्या पैशा संबंधानें इनामीपणाच्या हक्काला कांहींच अधिकार पोचणार नाहीं. कळावें तारीख १४ माहे आगष्ट १८९३ इसवी.

सही

इन्यत्याज बेगम मर्दे मोहिद्दीन वल्लद अमिरुद्दीन इनामदार राहणार नायगांव इच्या हातची निशाणी.

---

नोटीस

नोटिसीचें उत्तर व तिळोले कुणबी यांस जाहिरात कडती मर्दे मारुती शेळकी राहणार खेरडें ता० जळगांव हल्लीं मु॥ भान इसः–

कळविण्यांत येते कीं तूं वैदर्भांत ता० २९ जुलई सन १८९३ चे ७ सातवे अंकात नोटिस दिली ती पावली आंतील सर्व मजकूर समजला दिलेली नोटीस सर्व खोटी आहे कारण तूं माझे येथून हिंदुधर्माप्रमाणें व चालीप्रमाणें दुसरें सासर माहेर करण्यास लहानपणापासून जात येत होतीस तुला वयात येऊन १४ वर्षे झाली पैकीं १० वर्ष माझे येथें होतीस त्या नंतर ११ वे वर्षीं तुझा बाप तुला दिपवाळीस नेण्या करितां आला तेव्हां मी सामोपचारानें व तुझे बापाचे समतीनें मी तुजला पाठविलें. जातें वेळीं तुझ्या आंगावर माझा डागीना गुंडवाळे वजन तोळे ४९ व कोपरवाळ्या तोळे २९, पाटल्या पोलट तोळे १८, व सोने तोळे २॥, कंठी तोळे ७ व मुद्या वगैरे तोळे ४ या प्रमाणें तुझे आंगावर होतें. माहेरी गेले दिवसापासून मी ४।५ वेळ तुला नेण्या कारितां आलो तुझे बापाचे मनातून माझा संसार व लौकिक बिघडविण्याच्या हेतूनें तुला पाठविलें नाहीं व त्यांनीं तुला लपऊन ठेविलें होतें तुला छपविल्या बद्दल मी पोलीसांत जाहिर करणार होतो परंतु तो पाठवील असें समजुन जाहिर केले नाहीं करितां तुला व तुझे आईबापास व सर्व लोकांस जाहिर करितों कीं नोटीस पावल्या पासून १० दिवसाचें आंत तुझ्या आंगावरील डागिन्यासह माझ्या जवळ येऊन संसार करावा असें न केल्यास ताब्यांत घेण्याबद्दल रितीप्रमाणें तजवीज करुं कदाचित तुझे बापानें तुला छपाविल्यास व दुसरा नवरा केल्यास तुझवर व तुझे बापावर व नवऱ्यावर पोलिसांत फिर्याद करून योग्य तजवीज करीन ह्मणूत दिली नोटीस.– ता० १४।८।९३ इ०

(सही.)

मारोती वल्लद जानजी शेळकी राहणार खेर्डे ता० जळगांव दातूर खुद.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .........०१

Six monthly............3 " 8 as
Single copy..............................4as

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXVII AKOLA MONDAY 28 AUGUST 1893 NO34

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २८ माहे आगष्ट सन १८९३ इ० अंक३४

### शिक्षण पद्धति

( एका अनुभवी शिक्षकाचा वढा )

( मागील अंकावरून पुढें चालूं )

गु०—शाबास. वाफेनें चालणाऱ्या गलबतास आगबोटी म्हणतात, हें तुला मघां सांगावयाचें राहिलें होतें. जमिनीवर जशा आगगाड्या चालतात, तशा पाण्यातून आगबोटी चालतात. असो. आज उशीर झाला आहे. पुढील खेपेस तुला समुद्राची आणखी माहिती सांगेन.

गु०— मुला, समुद्र कशाला मिळतो, ह्मणून तूं काल मला विचारिलेंस; त्याचें उत्तर मीं तुला अद्याप दिलें नाहीं. पण समुद्र केवढा असतो, हें तुला सांगितें. तर आतां लक्षांत ठेव कीं, अति खोल आणि फार लांब रुंद असा पाण्याचा प्रदेश असतो, त्यास समुद्र ह्मणतात; सागर असे त्याला दुसरें एक नांव आहे. कांहीं समुद्र लहान असतात, ह्मणजे आगबोटींत बसून थोड्या दिवसांत त्यांतून पार जातां येतें. आणि कित्येक समुद्र इतके मोठे असतात कीं, त्यांतून पार जाण्यास जलद चालणाऱ्या आगबोटीलाही कित्येक महिने लागतात. अशा समुद्राला महासमुद्र किंवा महासागर ह्मणतात.

वि०—गुरुजी, समुद्राच्या मोठेपणाची मला आतां चांगली कल्पना करितां येते. त्यांत खोल आणि लांबपर्यंत पाणी पसरलें असतें, तें जमिनीवरून ज्या हजारों एकाहून एक मोठाल्या नद्या समुद्रास मिळाल्या असतात, त्यांचें होय. पण गुरुजी, एखादे वर्षीं पाऊस कमी पडून नद्यांना पूर आले नाहींत, तर समुद्राचें पाणी कमी होऊन त्यांतली उंच जमीन उघडी पडत असेल नाहीं बरें?

गु०—मुला, समुद्राविषयीं मी तुला सांगत असतां, तूं अनेक प्रश्न करितोस, त्यावरून तुला ही माहिती समजत चालली आहे, असें मला वाटतें. आणि तुझ्या प्रश्नांचें उत्तर देण्याला मला अधिकाधिक आनंद होत आहे. असो; समुद्र कशाला मिळतो, आणि समुद्राचें पाणी, पाऊस न पडला तर, कमी होतें किंवा नाहीं, हें आतां सांगतों. पाणी नेहमीं उतरत्या जमिनीकडे वहात जावयाचें हें तुला समजलें आहेना?

वि०—होय, गुरुजी; पाणी उतरत्या प्रदेशाकडे वाहतें, ह्मणूनच नद्या अखेरीस समुद्राला जाऊन मिळतात. कारण समुद्र जमिनी पेक्षां सखल असतो.

गु०—ठीक. पाण्याचें मैदान किंवा सपाटी भोंवतालच्या जमिनीपेक्षां खोल असतें; ह्मणून आसपासचें सर्व पाणी नद्यांतून समुद्रास जाऊन मिळतें. तळ्याच्या एका टोंकास एक ओढा त्या तळ्यांत वाहत असला, तर तळ्याचें पाणी वाढेल किंवा नाहीं?

वि०—तळ्यांतलें पाणी दुसरें कोठें वाहत नसलें तर, तळ्यांचें पाणी वाढलेंच पाहिजे.

गु०—ज्या बाजूनें ओढा वाहतो, त्या बाजूचें पाणी दुसऱ्या बाजूकडील पाण्या पेक्षां अधिक वाढेल किंवा नाहीं?

वि०—नाहीं. सर्व पाणी सारखें उंच चढत जाईल. कारण घट्ट पदार्थां प्रमाणें पाणी एकाच ठिकाणीं उंच व्हावयाचें नाहीं, तें तळ्याच्या सर्व बाजू कडे एकदम चढत जाईल.

गु०—ही गोष्ट जर तुला समजली आहे तर समुद्राला शेंकडों नद्या मिळूनही त्याचें पाणी एका ठिकाणीं दुसऱ्या ठिकाणा पेक्षां अधिक उंच व्हावयाचें नाहीं, हें ही तुला समजेल.

वि०—समुद्राचें पाणी एका ठिकाणीं दुसऱ्या ठिकाणा पेक्षां अधिक उंच जरी होणार नाहीं तरी सगळ्या समुद्राचें सारखें चढण्याला किंवा उतरण्याला कांहीं हरकत नसावी असें मला वाटतें. तळ्यांचें पाणी उन्हाळ्यांत कमी होतें, पावसाळ्यांत वाढतें, तसेंच समुद्राचें होत असेल ना?

गुरुजी— मुला, एका ठिकाणीं पुष्कळ पाऊस पडतो, व दुसऱ्या ठिकाणीं कमी पडतो, किंवा मुळींच पडत नाहीं, असें कधीं कधीं होतें; हें तुला माहित आहे किंवा नाहीं.

वि०— होय, असें होतें, हें मला माहित आहे. यंदाच आपल्या वऱ्हाडांत आतां पर्यंत पाऊस कमी आहे, पण कोंकणांतून माझ्या काकांचीं पत्रें येतात, त्यांत तिकडे पावसाची रेलचेल आहे, ह्मणून लिहिलें आहे.

गु०— अद्याप पर्यंत कोंकणांत पुष्कळ पाऊस पडून पिकांची स्थिति फार चांगली आहे असें वर्तमान आहे. असेंच कधीं कधीं देशोंच होतें. एखादे देशांत एखादे वर्षीं कमी पाऊस होऊन पिकांचें नुकसान होतें; त्याचवेळीं दुसऱ्या देशांत अति पर्जन्यानें तसें होतें. एवंच आकाशांतून जमिनिवर पाणी पडावयाचें तितकेंच पडतें, परंतु एका देशांत कमी पडतें, आणि दुसऱ्या देशांत जास्त पडतें. कधीं कधीं सर्वत्र बेताचा पाऊस पडतो. तात्पर्य. समुद्राला जो पाण्याचा पुरवठा व्हावयाचा तो नेहमीं हो तोच हो एक गोष्ट झाली. दुसरी एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे, ती अशी कीं, पृथ्वीवर सर्व ठिकाणीं एकाच वेळीं पावसाळा होत नाहीं, तसेंच उन्हाळाही सर्वत्र एकदम सुरू होत नाहीं.

वि०— हां गुरुजी आठवलें. यंदाचा पावसाळा सुरू होण्या पूर्वीं ह्मणजे मे महिन्यांत आमचे बाबा वर्तमानपत्र वाचतांना ह्मणाले, यंदा आपल्याकडे पाऊस लवकर पडेल आणि तो इतक्यांतच ह्मणजे मे अखेर पडेल असें ते ह्मणाले असें कशावरून तुह्मी ह्मणतां, ह्मणून मी विचारलें, तेव्हां ते ह्मणाले कीं दक्षिणेस रामेश्वरा पलीकडे एक देश आहे तेथें पाऊस पडल्या पासून सुमारें वीस दिवसांनीं आपल्याकडे पावसाळा सुरू होतो. आणि तिकडे तर ९।१० तारखेला पाऊस पडला.

गु०— मुला, तूं एकदां गोष्ट ऐकिलीस ह्मणजे ती तुझ्या ध्यानांत राहते ह्मणून बरें आहे. असो. रामेश्वरा पलीकडें सिलोन बेट ह्मणजे आपण ज्याला लंका ह्मणतो तें, तेथें पाऊसकाळ आपल्या अगोदर सुरू होतो. आपल्या इकडे पावसाळा संपावयास येतो, त्या सुमाराला काबुलाकडे ह्मणजे रोहिले लोकांच्या देशांत पाऊस पडूं लागतो. या प्रमाणें आपल्या इकडे कडक उन्हाळा असतां दुसऱ्या एका देशांत कडक हिंवाळा असतो. कोणत्याही देशांत कोणत्याही काळीं असें मात्र कधीं व्हावयाचें नाहीं, कीं पावसाळा संपतांच उन्हाळ्यास आरंभ झाला. किंवा उन्हाळा संपल्यावर आधीं हिंवाळा लागला. एका देशांत ज्या वेळीं उन्हाळा असतो, त्याच वेळीं दुसऱ्या देशांत पावसाळा असतो, व तिसऱ्या देशांत त्याचवेळीं हिंवाळा असतो परंतु प्रत्येक देशांत उन्हाळा, पावसाळा आणि हिंवाळा या अनुक्रमांत कदापि फेर बदल व्हावयाचा नाहीं. या कारणानें पृथ्वी वरील सर्व नद्यांना, एकाच वेळीं पावसाळा नसल्या मुळें, पूर येत नाहींत त्यामुळें एकदम सगळ्या समुद्राचें पाणी वाढत किंवा कमी होत नाहीं. कारण एका देशांतल्या नद्यांना जरी पूर आले, तरी त्याचवेळीं दुसऱ्या देशांतल्या नद्यांचें पाणी अगदीं कमीं झालेलें असतें.

वि०— गुरुजी, समुद्रांत पाऊस पडतो किंवा नाहीं?

गु०— होय, पडतो तर. आपल्या या वऱ्हाड प्रान्ता सारखे ज्यांत अनेक प्रांत आहेत, असा हा हिंदुस्थान देश आहे, आणि हिंदुस्थाना सारखे अनेक देश ज्यांत बुडून जातील, असा समुद्र मोठा असतो त्यांत जमिनी प्रमाणेंच उन्हाळा पावसाळा आणि हिंवाळा असे तिन्ही काळ असतात. हिंवाळा कडक असतो, तेव्हां, समुद्राच्या पृष्ठ भागावर पाण्याचें बर्फ होतें. पावसाळा असतां विपुल वृष्टि होते उन्हाळा असतां पाण्याची वाफ होऊन आकाशांत जात असते. नद्यांतून किंवा समुद्रांत पाऊस पडून पाण्याची जितकी भर समुद्रांस मिळते, तितक्या पाण्याची वाफ होते. मुला, तूं ह्या तीन गोष्टी नेहमीं लक्ष्यांत ठेव-१ पाणी नेहमीं उतरत्या जागेकडे वाहतें; व त्याचा पृष्ट भाग उंच सखल असा न राहतां नेहमीं सारखा सपाट असा असतो २ पृथ्वीवर सर्वत्र एकाचवेळीं पावसाळा किंवा दुसरा कोणताही एक ऋतु नसतो. एका देशांत पावसाळा दुसऱ्या देशांत उन्हाळा, तिसऱ्या देशांत हिंवाळा असें असतें. ३ समुद्रांत नद्यांनीं किंवा पावसानें रोज जितकें पाणी येतें, तितक्या पाण्याची रोज वाफ होते. या तीन कारणांनीं समुद्रांचें पाणी कधीं कमी जास्त व्हावयाचें नाहीं.

वि०— गुरुजी, समुद्राचें पाणी कां वाढत नाहीं किंवा कमी होत नाहीं, हें आतां मला चांगलें समजलें.

गु०— तरी, समुद्र कशाला मिळतो, हा तुझा प्रश्न शिल्लक आहे. महासागर ह्मणजे पाण्याचें अफाट मैदान, ज्यांतून पार जाण्यास आगबोटीला देखील कित्येक महिने लागतात, हें तुला पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याच महासागराचा जमिनीच्या जवळचा भाग असतो, त्याला समुद्र ह्मणतात. हेंही तुला सांगितलें आहे. आतां, समुद्र हा महासागराचा भाग आहे, ह्मणून समुद्र महासागरास मिळतो, असें ह्मटलें तरी चालेल; परंतु नदीचें पाणी जसें वाहत जातें, तसेंच समुद्राचें पाणी महासागराकडे वाहतांना आपल्या दृष्टीस पडत नाहीं. ओढ्याचें पाणी तळ्यास मिळाल्यामुळें, तळ्यांतलें पाणी जरी वाढेल, तरी एका बाजूचें पाणी दुसऱ्या बाजूकडे वाहतांना आपल्या दृष्टीस पडत नाहीं ह्मणून समुद्र हा महासागराचा भाग आहे, असें ह्मणतात; समुद्र महासागरास मिळतो असें ह्मणत नाहींत.

वि०— नदीच्या काठानें कोठें कोठें जमिनीला वांक असतात, त्यांत नदीचें पाणी असतें, व ते वांक नदीचेच भाग असतात. नदी हा महासागर मानिला, तर ते वांक समुद्र नव्हेत काय, गुरुजी?

गु०— आतां तुला समुद्र ह्मणजे काय, व समुद्र आणि महासमुद्र यांत काय भेद आहे, तें चांगलें कळलें असें मी समजतों. तथापि समुद्र प्रत्यक्ष पाहून तुला त्यांचें ज्ञान होईल, त्याशीं मी सांगितलेल्या माहितीची तुलना करणें अशक्य आहे.

वि०— समुद्र येथून किती दूर आहे, गुरुजी?

गु०— आपल्या वऱ्हाडच्या पश्चिमेस वऱ्हाड प्रांता एवढा खानदेश ह्मणून एक प्रांत आहे. खानदेशांच्या पलिकडे मोठाले डोंगर आणि पर्वत आहेत. हे पर्वत ओलांडून खालीं उतरलें ह्मणजे कोकण लागतें. हा कोंकण प्रांत २०।२५ कोस पूर्व पश्चिम रुंद आहे. त्याची पूर्व हद्द पर्वतांनीं झाली आहे. आणि पश्चिम हद्दीवर समुद्र आहे. हा कोंकणप्रांत उत्तर दक्षिण पुष्कळ लांब आहे व तो पश्चिमेच्या अंगानें समुद्राच्या काठीं आहे. मुंबई हें त्या प्रांतांतलें मोठें शहर आहे. तेथें जाऊन पोंचण्यास आगगाडी १७।१८ तास लागतात.

वि०— आगगाडी दर तासास सुमारें

१९ कोस चालतें असें धरून चाललें तर मुंबई येथून ५०० मैलावर आहे, असें ह्मणावयाचें.

# वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य १ शके १८१५

'शारदासदन' ही संस्था महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. तिच्या मूळ उत्पादक पंडिता रमाबाई याही चांगल्या मशहूर आहेत. अमेरिकेंत असतांना या बाईनीं इंडियांतील अबलाजनांच्या आणि मुख्यत्वेंकरून विधवा हतभगिनींच्या कल्याणासाठीं ह्मणून अमेरिकेंत फंड उभारला आणि त्या फंडाच्या बळावर पुण्या मुंबईच्या सुधारक मंडळींच्या सल्यानें शारदा सदन स्थापिलें. आरंभीं इकडील लोकांस अमेरिकन लोकांचें मोठें कौतुक वाटलें आणि त्यांची उदारबुद्धी व मोठी देणगी ही पाहून सर्वजण चकित झाले.

आळश्यावर जशी गंगा यावी तशी या देशांतील अबला जनावर ही ईश्वरी उपकाराची पर्वणीच आली असें आरंभीं बहुत जणांस वाटलें. पंडिता रमाबाईच्या शारदासदनाची विख्याती सर्वत्र पसरली आणि तिच्या चालकांच्या खटपटीनें सदनांत विधवा मुली गोळा होत चालल्या. शारदा सदनांतील बातबेत, तेथील शिक्षणक्रम व राहण्याच्या सोई इत्यादि जणों काय सौख्याचें भांडारच आहे अशी वर्तमान पत्रांतून वाखाणणी प्रसिद्ध होत असे. पण हा आनंद सागराचा भ्रम अलिकडे नाहींसा झाला आहे. शारदा सदन ही संस्था ख्रिस्ती धर्म प्रसारासाठीं आहे अशी लोकांची आतां पक्की खात्री झाली. शारदा सदनाची सुधारक, सुबोधपत्रिका या पत्रांनीं जी जोरदार तरफदारी केली ती सर्व वृथा गेली. रावबहादूर महादेव गोविंद रानडे, डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर व राव बहादुर चिंतामण नारायण भट यांनीं शारदा सदनाशीं आपला संबंध तोडून टाकला. शारदासदन मिशनरी संस्था आहे म्हणून या विधर्मी संस्थेला त्यांनीं आपल्या संबंधा पुरती फारकत दिली. पंडिता रमाबाई या ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठीं व आपल्या हाता खालील मुलीस ख्रिस्ती बनविण्यासाठीं हर प्रयत्न करितात असें प्रत्यंतरास आलें.

अमेरिकन मिशनरी लोकांचा शारदा सदना विषयीं पक्का ग्रह आहे कीं सदन ही धर्मसंस्था आहे. त्यांच्या उपकृतीचा अतिरेक होण्याचें इंगित धर्मप्रसार हेंच आहे. हिंदुस्थानांतील अबलाजना विषयीं त्यांना भुतदयेचा पान्हा फुटला तो खोटा आहे असा आरंभा पासूनच बोभाटा होता. 'केसरी' कारांचे आम्ही खरोखर ऋणी आहो कीं त्यांनीं शारदा सदनाचे यथातथ्य स्वरुप लोकांस कळवण्या साठीं मोठे परिश्रम घेतले आणि कधी कोणाही राव बहादूराची भीड पडू न देता वेळोवेळीं शारदा सदनाचें यथास्थित वर्णन दिलें व बाह्य प्रांतातील लोकांस शारदा सदना विषयीं जागृत केलें या उपर शारदासदनाचा ज्यांनां उपयोग करून घ्यावयाचा असेल त्यांनीं ही संस्था मिशनरी मंडळींची आहे असें पक्कें जाणून काय तें करावें.

---

नवीन कायदे कौंसिलें थोड्या बहुत प्रति निधी तत्वावर सुरू झालीं ह्मणून त्यांतून अलिकडे लोकांचे विचार सरकारचे नजरेस स्पष्टपणें व खुलावटीनें येऊं लागले आहेत. सांप्रतच्या राज्यव्यवस्थेंतील मुलकी व फौजदारी कामें वेगळीं वेगळीं केलीं जावींत आणि मुलकीचा व फौजदारी न्यायखात्याचा कांहीं अर्थी अर्थी संबंध असूं नये असें राष्ट्रीय सभेचें मुख्य मागणें आहे, आणि त्या मागणीचा प्रवेश मुंबईच्या कायदे कौंसिलांत झाला. हा मोठा लाभ नवीन कायदे कौंसिला पासून झाला असें आह्मी मानतों. मुलकी व फौजदारी काम एकाच व्यक्तीकडे असल्यामुळें कोणतेंच नीटपणें होत नाहीं. फौजदारी कामाला जें कायद्याचें ज्ञान व अनुभव लागतो. त्याहून भिन्न विषयाचें ज्ञान, भिन्न लोकांशीं संबंध व भिन्न प्रकारची कामगिरी, हीं मुलकी अधिकाऱ्यास लागतात. दोन्ही कामांतील आवश्य गुणांचा संगम एका व्यक्ती मध्यें क्वचितच आढळतो. लोकांच्या सोई, गैरसोई या नीटपणें पाहिल्या जात नाहींत इतकेंच नाहीं तर मुलकी अधिकारी आपल्या माजिस्ट्रेटीच्या जोरावर मुलकी कारभार प्रजेस पीडाकारक करितों आणि माजिस्ट्रेट आपल्या मुलकी अधिकाराच्या जोरावर लोकांवर फार दरारा बसवून अन्यायाचे दरवाजे खुले करून देतो. मुलकी व फौजदारी अंमल हा एका व्यक्तीमध्यें असावा किंवा नसावा हा प्रश्न बहुतेक मिटल्यासारखाच आहे. मुलकी व फौजदारी अधिकार निरनिराळे करण्यास सरकार पैशाची नड दाखवीत असतें. ही नड कशी दूर करितां येईल या विषयीं नामदार फेरोजशहा मेथा यांनीं मुंबईच्या कायदे कौंसिलांत एक उत्तम युक्ति सुचविली. त्यांच्या सूचनें प्रमाणें मुलकी व फौजदारी अधिकारी निरनिराळे मिळतील इतकेंच नाहीं तर सालिना त्यांच्या सूचनेनें खर्चांमध्यें एक लाख रुपये बचत होण्याचा संभव आहे. नाम० मेथा साहेबांच्या सूचनेस अंग्लोइंडियन कौंसिलदारांनीं फारसा थारा मिळूं दिला नाहीं तरी त्यांच्या सूचनेचा प्रत्यक्ष पणें विचार करावा लागला ही गोष्ट कांहीं सामान्य नाहीं. ज्या तत्वाचा आज कायदे कौंसिलांत शिरकाव झाला आहे त्या तत्वाचा विजय कांहीं कालाच्या भवती न भवतीनें निःसंशय होईल असें आह्मी पक्कें अनुमान करितों.

वऱ्हाड प्रांतांतील मुलकी व दिवाणी आणि फौजदारी अधिकार एकाच व्यक्तीकडे असतात व त्यामुळें रयतेचें मोठें अहित होतें हें आम्ही वारंवार अनेक वेळां कळविलें आहे. कित्येक प्रसंगीं दिवाणी व फौजदारी न्याय ज्यांना करावे लागतात त्याना कायद्याच्या ज्ञानाचा गंधही नसतो तेव्हां त्यांच्या न्यायाची मातबरी ती किती ह्मणून सांगावी! मुलकी कामाचा अनुभव नसला तरी कित्येक आफिसर तें नेटानें रेटून नेत असतात अशा कामाचा चांगुलपणा व वाईटपणा आम्ही व्यक्ती विशेषा संबंधानें सांगूं शकत नाहीं. लोअर व हायर परीक्षांचा खरा उपयोग होत नाहीं. त्या परीक्षा जितक्या कसोशीनें घ्यावयास पाहिजेत तितक्या कसोशीनें घेतल्या जात नाहींत. मुलकी विषयांतील परीक्षेंत खरी कसोशी होईल तर बहुतेक कार्यभाग साधण्या सारखा आहे. परंतु दिवाणी, व फौजदारी कामें चालविण्यास जे कायदेपंडित व वाकबगार असे वकील येतात त्यांच्या पक्षप्रतिपक्ष मंडनाच्या वाग्जालासमोर या लोअरहायर पास झालेल्या न्यायधीशांचा नीट निभाव लागतो असें आह्मांस वाटत नाहीं. वास्तविक न्यायाधीश वकिला पेक्षां अधिक तरबेज व निष्णात असले पाहिजेत अशी जर मूळ गोष्ट आहे तर न्यायाधीशासाठीं वकिलीच्या परीक्षेहून अधीक कसोशीची परीक्षा असली पाहिजे आणि अशी परीक्षा लोअरहायरच्या त्रोटक कसोटीनें भागत नाहीं. सारांश वऱ्हाडांत न्यायाधीश व मुलकी अधिकारी निरनिराळे अधिकारी पाहिजेत इतकेंच नव्हे तर हल्लीं जे अधिकारी आहेत त्यांच्या पेक्षां अधीक शिकलेले असे पाहिजेत. यावरून असें समजलें जाऊ नये कीं सध्यां असलेल्या अधिकाऱ्या संबंधानें आह्मी कांहीं आक्षेप घेतों. फक्त आमची विनंती एवढीच कीं यापुढें नवीन जे लोक नेमले जातील त्यांच्या नेमणुकी विषयीं वर दर्शविलेली खबरदारी घेतली जावी.

---

# The Berar Samachar

MONDAY AUGUST, 28, 1893

## A FEW CHARACTERISTICS OF OUR PRESENT MOOD.

The consequences of a transformation of putting immediate social convenience in the first place, and respect for truth in the second, are naturally seen, in a distinct and unmistakable lowering of the level of national life; a slack and lethargic quality about public opinion; a growing predominance of material, temperary, and selfish aims, over those which are generous, far reaching and sublime; a deadly weakening of intellecutal conclusiveness, and clear shining moral illumination that does not make us at a loss to choose but that makes all our actions highly natural; and lastly of a certain stoutness of self-respect for which India was once specially distinguished. Gone is the self respect which pre-eminently ran through the veins of the ancient Aryans but also that which distinguished the Mahrattas and Hindus of the last century. The self-respect of the last century was of a general nature. The selfrespect of the present century has more in it of naked and abstracted selfishness and self love. A plain categorical proposition is becoming less and less credible to average minds. Or at least the slovenly willingness to hold a thousand contradictory propositions at one and the same kind is becoming more and more common. In our public behaviour, in morals not to say of our politics in which our government is inclined to give us a little share as possible, the suppression of our true opinion, if not the positive profession of what we hold to be an entirely false opinion, howsoever contagious its infection, is hardly ever counted as a vice and not seldom even goes for positive virtue and solid wisdom. One is conjured out of of selfishness to respect the beliefs of others through want of moral boldness and selfishness, but forbidden to express confidence in his own and to discuss or justify them.

This dread of the categorical proposition might be creditable, if it sprang from attachment to a very strong evidence or from a deep sense of the relative and provisional quality of truth. There might even be a plausible defence set up for it, if it formed from that formulated distrust of the energetic rational judgment in comparison with the emotional, affective, contemplative parts of man which underlies the various forms of social and public mysticism. If we look closely into our present mood, it is seen to be the product mainly and above all of a shrinking deference to the *status quo*, not merely as having a claim not to be lightly dealt with, which every serious man concedes, but as being the last word and final test of truth and justice. Physical science when translated into Indian Vernacular is alone allowed to be the sphere of accurate reasoning and distinct conclusions, but every other branch of literature, all private or public conversation instead admitting that these subjects have a logic of their own, are infected with a gross tinge of this peculiar idiosyncrasy. We deliberately suspect all first principles and practically deny the strict inferences from demonstrated premises. Faith in the soundness of given general theories of right and wrong melts away before the first momentary triumph of wrong or the first passing discouragement in enforcing right.

Our political sense—here we must clearly define what we mean by political sense—the sense of dealing with men and men, which has discovered so many secrets of others, which has deprived us of all freedom of speech or thought, is fast be coming our weakness and ruin. The policy of a party is not carrying out the opinion of any section of it, but the general consensus of the whole. This seems to be a hierophantic manner of saying that the policy of a party is one thing and the principle which makes it a party is another thing, and that men who care very strongly about any thing are to surrender that and the hope of it, for the sake of succeeding in something about which they care very little or not at all. This is our modern way of giving our people heart for their voyage, of inspiring them with resoluteness and self respect, with confidence in the worth of their cause and enthusiasm for its success. Thoroughness is a mistake and nailing our flag to the mast a bit of delusive heroics. Think wholly of today. Do not be daunted by an idea of tomorrow. Beware of the high and hold fast to the safe. Study General Consensus. Of course all these characteristics of our own society mark tendencies that may be common enough in all societies. They often spring from an indolence and enervation that beset a certain number of people, however invigorating the general mental climate may be. What we are now saying is that the general mental climate itself has outside the domain of translations ceased to be invigorating; that on the contrary, it fosters the more inglorious predisposition of men, and encourages a native willingness, already so strong, to acquiesce in a lazy accommodation with error, an ignoble economy of truth, and a vicious compromise of the permanent gains of adhering to a sound general principle, for the sake of the temporary gains of de

parting from it.

## वऱ्हाड.

हवामान— या आठवड्यांत पाऊस पुष्कळसा झाला. ही जलवृष्टी अगदीं ऐन गरजेच्या वेळेवर झाल्यामुळें ती पिकांस अमृतवृष्टी प्रमाणें फलदायक झाली आहे. हवा थंड व सर्द आहे. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं.

वऱ्हाड प्रांतांत सरकारी प्राासिक्यूटरची मोठी उणीव होती ती दूर करण्यासाठीं ५०० दरमहाची एक जागा नवीन करून तेथें रा.रा. प्रल्हाद नारायण जोग बी. ए. एल्. एल्. बी यांची नेमणूक करावी असें कर्नल स्पान्स्की ज्युडिशिअल कमिशनर यांनीं वरिष्ठ सरकारांस लिहिलें आहे.

कर्नल मॅकंझी रेव्हिन्यू कमिशनर हे हैदराबादेस आलिशान रेसिडेंट साहेबांचे मुलाखती साठीं गेले आहेत. या भेटीच्या वेळीं साहेब मजकूर सारा वाढविण्या विषयीं सध्या जो प्रश्न चालूं आहे त्याचाही विचार करणार आहेत असें 'प्रमोदसिंधु' कर्ते म्हणतात.

वऱ्हाडचे डायरेक्टर आफ ल्यांड रिकार्डचे हेड क्लार्क रा. रा. नाडकर्णी हे मुंबईकडे परत गेल्या कारणानें त्यांच्या रिकाम्या जागीं रा. रा. चिंतामण मोरेश्वर आपटे इनस्पेक्टर–राजिस्ट्रेशन खातें यांची निवड झाली ही गोष्ट उत्तम झाली.

आणि राजिस्ट्रेशन कडील इनस्पेक्टरच्या जागीं रा. रा. व्यंकटराव रंगराव देशपांडे सब रजिस्ट्रार यांस बढती मिळाली हें पाहून आनंद वाटतो.

मोर्शीच्या नायब तहशिलदारीवर मूर्तिजापूरचे मि. महमद साहेब यांस बदलून उमरावतीचे रा. रा. रामचंद्र अंबादास यांस मूर्तिजापूरास धाडलें. आणि उमरावतीच्या नायब तहशीलदारीवर रा. रा. दवलत झाबाजी खजिनदार आकोला यांस नेमिलें.

इलिचपूर शहर मुनसिपालिटीचे सेक्रेटरीच्या जागीं सन्मानार्थ बिनपगारी गृहस्थ आजपर्यंत असे पण त्या ऐवजीं ४० रुपयांचा पगारदार सेक्रेटरी नेमिला असल्या विषयीं कळतें.

रा. रा. त्र्यम्बक गणेश परांजपे तहशिलदार मूर्तिजापूर हे आफि. एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर झाल्यामुळें त्यांच्या रिकाम्या जागीं मोर्शीचे नायब तहशीलदार मि. रहिमतुल्ला यांस तहशीलदार नेमिलें हें कळविण्यास संतोष वाटतो.

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना.

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सर्टिफिकीट मिळण्याविषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याचे मालमिळकतीचा कबजा करण्यालायक मनुष्य नेमण्या विषयीं.

सन १८९० चा आक्ट ८ कलम १० प्रमाणें.

अर्जीचा नंबर.

क्ला. १३ मिसल. नंबर २

१८९३

वि० सिविल जडज्य साहेब जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार मेहेरबान तहशीलदार साहेब तालुके खामगांव जिल्हा आकोला.

यांतील (अज्ञान) नामदेव वा॥ राघो जात हिंदु राहणार माटरगांव बु॥ हल्लीं अंत्रज ता. खामगांव जिल्हा आकोला यानें (याचें पालन व मालमिळकतीचा कबजा करण्यालायक मनुष्य नेमला जावा म्हणून) अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजावरून किंवा अगदीं जवळचें नातलगपणाचें कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदर्हू अज्ञानाचे मालमिळकतीवर सांभाळकर्ता यानात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं. त्यांणीं तारिख १६ माहे सप्टेंबर सन १८९३ इ॥ रोजीं वरील अर्जीची चौकशी होणार आहे ते वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखीं हकीकत दाखल करावी.

ता० २२ माहे आगष्ट सन १८९३ इ०

V. N. Dandeker.

शिक्का. सिविल ज्यडज्य

आज्ञानाचा आक्ट नंबर ८ यांतील कलम १० सन १८९० प्रमाणें. कजबे माटरगांव बु॥ येथील आज्ञान नामदेव वा॥ राघो येटाळे हल्लीं राहणार अंत्रज याचे माहितीबद्दल टिपण

(अ) नामदेव राघो कुणबी पुरुष हिंदू जन्म तारीख १९—९—८३

राहणार माटरगांव बु॥ हल्लीं अंत्रज तालुके खामगांव येथें बहिणीचे घरीं राहतो अज्ञान स्त्री नसून पुरुष आहे.

(क) निराळी यादी सोबत आहे.

(ड) अज्ञान नारायण वा॥ रामा गुंड राहणार अंत्रज याचे ताब्यात आहे. (हा इसम अज्ञानाचे बहिणीचा नवरा आहे.) जंगम जिंदगी हराश होऊन उत्पन्न मुंबई ब्यांकेंत आहे स्थावर जिंदगी पैकीं घर माटरगांव बु॥ चे पाटलाचे ताब्यांत असून शेतें सरकार मार्फत नक्यानें लाऊन काढलें आहेत.

(ई) अज्ञानास फक्त एक सख्खी बहिण मंजी नांवाची असून ती अंत्रज तालुके खामगांव येथें राहते हल्लीं अज्ञानाचे पालन पोषण तीच करीत आहे.

(एफ) नाहीं.

(ग) अर्जी कोणीही केली नाहीं असें प्रकर्णावरून दिसतें.

(ह) अज्ञान त्याचे बहिणीचे ताब्यांत आहे तेव्हां फक्त त्याचे जिनगीच्या व्यवस्थे करितां व पालन करण्या करितां नेमणूक होणें आहे.

(आय) अज्ञानाचे पालन करणार मे. तहशिलदार ता० खामगांव यांस नेमलें आहे.

(जे) अर्जी मुळींच नाहीं.

(के) अर्ज नसल्यामुळें कारण नाहींत.

(एल) नाहीं.

येणे प्रमाणें माहिती असे ता० १–४–९३

फारशी सही. शाबासखा तहशिलदार साहेब ता० खामगांव यांची.

इंग्रजी सही. क्यापटन जे. जो. मॉरीस

दिपुटी कमिशनर

जिल्हा आकोला.

खरी नक्कल

Sd. S. P. Pathak.

सिरस्तेदार

अज्ञानाचे आक्ट् ८ सन १८९० कलम १० प्रमाणें अज्ञान नामदेव वल्लद राघो येटाळे राहणार अंत्रज याचे मिळकतीची यादी.

| मालाचे वर्णन | अजमास किंमत. |
|---|---|
| अकोले मुंबई ब्यांकेत जमा आहे ते. | ४४४०१३०३ |
| अज्ञानाचे माटरगांव बुद्रूक व ब्रह्मणवाडा बुद्रूक या गांवचे शेताचे सन १८९२-९३ सालाचे नफ्याचे उत्पन्ना बद्दल. | २११ |
| माटरगांव बुद्रूक येथील राहातें घर १८ खांबी | १५० |
| माटरगांव बुद्रूक येथील शेते स. नंबर ७४ पैकीं एकर ५०२६ अकार ११०८ सालीम विकले असता अंदाजा उत्पन्न | ३०० |
| ब्राह्मण वाडी बु. येथील शेत स. नंबर १३ पैकीं एकर ८०९ आकार ११०४ सालीम सदर्हू. | २०० |
| माटरगांव खु. शेत स. नं. ८ एकर ११०२६ आकार २० यांतील हिस्सा ०१००८ सदर्हू. | ८० |
| ज्या शेताबद्दल तक्रार आहे ती. ब्राह्मण वाडा बु. येथील शेत स. नंबर ३६ एकर १३०१६ आकार २१–$\frac{1}{2}$ हिस्सा भागनें राजिष्टरांत. आहे. व वहिवाटींत फक्त $\frac{1}{3}$ आहे. निकाल होणें आहे. | ६१०१००८ |
| महादर खेड येथील शेत स. नंबर ५१ एकर १७०३९ अकार २३ यांतील ०२०८ चा हिस्सा. | रु. ५० |

टीप

यावरील जिनगी शिवाय मैताजी व मैताच्या मुलीच्या सासऱ्यानीं मौजे ब्राह्मणवाडा बु. येथील शेत स. नंबर ३५ आणि त्याच गांवचे स. नंबर ३६ यांतील $\frac{1}{3}$ हिस्साही खरेदी दिला आहे. हल्लीं मैताच्या मुलीचा सासरा मैत जाला आहे.

सही फारशी. शाबासखा तहशिलदार साहेब ता० खामगांव यांची

खरी नक्कल

Sd. S. P. Pathak.

सिरस्तेदार

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचे सरटीफिकीट मिळण्याविषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्यालायक मनुष्य नेमण्या विषयीं वर्ग १३ १८९०चा अक्ट ८ कलम १ प्रमाणें.

अर्जीचा नंबर ६ सन १८९३

डेप्युटी कमिशनर साहेब जिल्हा इलिचपूर याचे कोर्टांत.

अर्जदार— गोविंदभट

बापाचें नांव— हरभट अ. पा. बळीराम दिवाकर

जात— ब्राह्मण

राहणार— तळवेल तालुके इलिचपूर

वरील (अज्ञान) बापाचें नांव हरभट जात ब्राह्मण राहणार तळवेल तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर याणें

(याचें पालन व मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला जावा म्हणून) अर्ज दिला आहे. यास्तव, मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजा वरून किंवा जवळचें नातलगपणाचे कारणा वरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहु आज्ञानाचे मालमिळकतीवर सांभाळ कर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्यां सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्याणीं तारिख ८ माहे सप्टेंबर सन १८९३ इा रोजीं वरील अर्जीची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १७ माहे ८ सन १८९३ इा.

Shamasuddin Alikhan
Officiating Deputy Commissioner
Ellichpur District.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल कारितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मिसल. नंबर १६

१८९३

डेपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव— माहादू

बापाचे नांव शिवरामजी

राहणार सासनरामापूर ता० दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांस मयत

सिवरामजी बापाचे नांव पिरथमजी राहणार सासनरामापुर तालुके दर्यापूर जिल्हा येलिचपूर यांचें कर्ज वसूल कारितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें म्हणून सदर्हू अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. ८ माहे सप्टेंबर सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जीचा चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. ता. १७ माहे ८ सन १८९३ इ.

Shamsuddin Alikhan
Officiating Deputy Commissioner
Ellichpur District.

## वर्तमानसार.

वायव्य प्रांतात व इतर ठिकाणीं यंदा गोवधाच्या संबंधानें रक्तपात होऊन जे दुःखद प्रसंग गुदरले, त्यांच्या एकंदर हाकिकती-वरून असें अनुमान होतें कीं, हिंदुस्थानच्या सत्ताधारी विलायतेंतील पार्लमेंटानें ह्या रक्तपाताकडे दृष्टि देऊन तो बंद होण्याचे उपाय त्वरित योजले नाहींत तर या देशांत अनर्थपात होण्यास कारण होईल. सालमजकुरीं मुसलमानांनीं केलेले गोवध व दंगे सामान्य किंवा स्वाभाविक नसून निराळ्या स्वरूपाचे दिसत आहेत. ह्मणजे हिंदुलोकांस मुद्दाम चिडवून मुसलमानांचें आणि हिंदूंचें हाडवैर पाडावें अशा बुद्धीनें अधिकारी लोकांकडून मुसलमान लोकांस उत्तेजन मिळाल्यामुळें ते दंगे झालेले दिसतात. ज्या ठिकाणीं हिंदु मुसलमान लोक नयीमयीनें नागत होते, व ज्याच्या मध्यें परस्पर फूट नव्हती, अशा ठिकाणीं मुसलमानांस गोवध करण्यास हिंदूच्या देवालयाजवळ नवीन जागा अधिकाऱ्यांनीं नेमून दिल्या, आणि त्यामुळेंच यंदा जिकडे तिकडे आपापसांत भयंकर कलहाग्नि पेटला आहे, असें निरनिराळ्या वर्तमान पत्रांतील लेखांवर भरंवसा ठेविला तर दिसून येण्याजोगें आहे. 'महमदन आब्झरवर' ह्मणून एक वजनदार मुसलमानी पत्र निघत असेंत, त्याणें असें लिहिलें आहे कीं, "पूर्वीं कधींच होत नव्हतें अशा ठिकाणीं गोवध करण्यास व पूर्वींपार ज्या जागा गोवधाच्या ह्मणून नेमलेल्या होत्या, त्या ठिकाणीं तो न करण्यास अझमगड येथील अधिकाऱ्यांनीं परवानगी दिली, ही त्यांणीं फारच मोठी चुकी केलेली आहे. ह्या मुसलमानी पत्रानें जात्याभिमानाचें वारें बाजूस ठेवून हा जो निस्पृहतेचा लेख लिहिला आहे, त्यावरून वरील ह्मणण्याची बरीच यथार्थता होते. अझमगडच्या दंग्याचें संबंधानें लखनौ येथील आडव्होकेट' पत्रांत विस्तृत लेख येत आहेत; त्यांत तिकडील इलाखाधिपतीनीं चौकशी करावी ह्मणून लोकांचे मनानें खऱ्या मानिलेल्या अशा कांहीं गोष्टी नमूद केल्या आहेत, त्यां पैकीं कित्येक येथें नमूद करण्यासारख्या आहेतः— (१) मि० डुपरनेक्स अझमगडचे जिल्हाधिकारी यांनीं मुसलमानांकडे जाऊन गोवध करण्या बद्दल त्यांनीं त्यांना उत्तेजन दिलें असावें, व गोवधांस प्रतिबंध होऊं नये ह्मणून जी देखरेख ठेवावयाची तें काम बुध्या हिंदु तहशिलदार, हिंदु डेपुटि कलेक्टर व हिंदु पोलिस इन्स्पेक्टर यांजवर संपविलें होतें, असें दिसतें (२) गाजीपूर येथील मुसलमान लोकांनीं गोवध करावयाचे नाहींत! असा आपसांत रुकारीच ठराव केला असून तेथें मि० ब्रनेट ह्मणून एक अंमलदार गेला, आणि तो गेल्यावर सायंकाळीं मुसलमानांनीं हिंदुबरोबर दंगा केला. (३) माऊ ह्मणून एका गांवांत हत्यारें बाळगण्याचे परवाने फक्त० ५० असामीस मिळालेले आहेत, परंतु तेथें दंगा झाला त्यावेळीं शेंकडों मुसलमान लोक बंदुका व तलवारी घेऊन हत्यारबंद झालेले होते. हीं इतकीं हत्यारें त्यांजपाशीं कोठून आलीं? (४) अझमगडच्या दंग्यांतील ह्मणून जे शेंकडों हिंदु कैद केले. त्यांत एक असामी अगदीं आंधळा व कांहीं लुळेपांगळे लोकही धरले. (५) गोरक्षिणी सभेस मदत करणाऱ्या प्रत्येक मनुष्यास चाबुकमार देऊन त्याची अपतिष्ठा करून टाकूं, असें निरोप गवांत जाऊन लोकांस सांगण्याबद्दल माजिस्ट्रेटांना उघड सांगितलें.

"गोरक्षक सभा बंडखोर आहेत"

हें एक नवीनच तत्व अधिकाऱ्यांनीं काढलें आहे. तत्व काढलें आहे एवढेंच नव्हे; तर ह्या सभांचें निर्दालन करण्याचे प्रयत्न चालू असल्याचें दृष्टोपत्तीस येतें 'इंडियन मिरर' पत्रांत लिहिलें आहे कीं, "गाझीपूरच्या डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटांनीं, गोरक्षणी सभेशीं संबंध असलेले लोकांचे बरावर लष्करी पहारे ठेविले होते." याशिवाय अशी ही एक बातमी प्रसिद्ध झाली आहे कीं,— वायव्य-प्रांतांतील गोरक्षिणी सभांचे संबंधानें चौकशी करण्याबद्दल त्या प्रांताच्या मुख्य सरकारा कडून गुप्त हुकूम सुटले आहेत. ह्या गुप्त हुकमाचा परिणाम राष्ट्रीय सभेसारखा होऊं लागेल, या भितीनें कित्येक मोठमोठे लोक गोरक्षणी सभांशीं असलेले संबंध तोडून मोकळे होऊं लागले आहेत.

परवांच्या दंगादंगींत पाटणा प्रगण्यांत हिल्सा येथें मुसलमान लोकांनीं दंगा करून गांवची लूट केली, ती लूट तेथील मुसलमान डेपुटि माजिस्ट्रेट व मुसलमान पोलिस अधिकारी यांचे दृष्टीपुढें झाली; व त्याबद्दल सदरहू अंमलदारास शिक्षा झाल्या. अधिकाऱ्यांची फूस मिळाल्याचें परिणाम असेच व्हावयाचे.

एका सेशनजज्जांचा मुसलमानांस उपदेश— कृष्णगड येथील सेशनजज्ज मि० हों डले यांच्या पुढें एक मुसलमानांच्या दंग्याचा खटला चालला होता; त्याचा हुकूम सांगतांना कोर्टांत जमलेल्या सभ्य व प्रतिष्ठित मुसलमान गृहस्थांस साहेबांनीं असा सद्बोध केला कीं,—"भाईनों तुह्मीं गाई मारून हिंदु लोकांच्या मनास खिजवूं नका, अशी माझी तुह्मांला विनंती आहे. देशहित ज्याला ह्मणतात तें देशहित हिंदुलोकांचें ऐक्य व स्नेहभाव असणें यावरच अवलंबून आहे असें मी समजतों. विशेष करून मुला लोकांला माझें सांगणें असें आहे कीं; दुसरीं जनावरें मारा; पण हिंदुलोकांनीं पूज्य मानलेल्या गायांचे वध करण्याचें जितकें तुमच्यानें टाळवेल तितकें टाळा; यांतच सर्वांचें हित आहे"— बनारसडिव्हिजनचे कमिशनर साहेबांनीं कांशीच्या माजिस्ट्रेटांस एक पत्र लिहिलें आहे; त्यांत सुद्धां — "मुसलमानांच्या "पुढाऱ्यांनीं आपल्या जातभाईस असा उपदे"श करण्याची सूचना केली आहे कीं, जेथें "जेथें हिंदु व मुसलमान लोकांस एका ठिका"णी नांदून दिवस काढावयाचे आहेत; जेथें "तेथें मुसलमानांनीं फक्त बकरे व मेंढेच मा"रून गरज करावी; गाइच्या करूं नये—अशी सल्ला देण्यांत तुमची शिकस्त असूं ती करा,, बांकीपूर येथें सरमॅकडोनल्ड साहेबांनीं अशाच प्रकारचें उपदेशपर भाषण केलें. त्या भाषणाचीं बंगाली, उर्दू व ब्रह्मीभाषेंत पुस्तकें छापून तीं बंगाल, व बहार वगैरे देशांतील मुसलमानांस वांटण्याचा उद्योग कलकत्ता येथील एक मुसलमानी सभा हल्लीं करित आहे.

जानपूर येथील असि० माजिस्ट्रेट मि० वे. कोर्टांत काम करित बसले असतां एका मुसलमानानें येऊन साहेबांस जोडा मारला; त्या मुसलमानास हल्लीं पकडले असून खटला चालला आहे.

नदी खालून बोगदा.— हुगळी नदी खालून १॥ मैलाहून जास्त लांबीचा बोगदा आगगाडी करितां खणण्याचा विचार चालला आहे. खर्चाचा अजमास ७० लाख रुपयांचा केला आहे असें कळतें.

तारेची नवी युक्ती— सिधहैद्राबाद येथील तारखात्याकडील मि० क्लेमेंट साहेबांनीं हातानें खुटखुट करीत बसल्या शिवाय यंत्रानें आपोआप तारेचा निरोप जाण्यायेण्याची कल्पना काढली असून त्याबद्दल हल्लीं त्यांनीं हिंदुस्थान सरकाराशीं पत्रव्यवहार चालविला आहे, असें 'सिंधगॅझेट, वरून कळतें.

रशिया सरकार अमेरिकेंतील न्यूयार्क बंदरांत आपलें लढाऊ आरमार कायमचें ठेवीत आहे असें कळतें.

हिंदुस्थान सरकारची छावणी नवंबर महिन्याच्या आरंभीं कलकत्त्यास जाणार. स. शो.

जबलपुरास एक मारुती व एक गणपती यांच्या मूर्तीतून कांहीं कारणानें ओलावा बाहेर दृष्टोस पडूं लागल्यामुळें लोक मोठें अरिष्ट येणार आहे असें समजून व सदरील ओलावा ह्मणजे घामाच्या धारा होत असें प्रतिपादन करावयास लागले आहेत इतकेंच नव्हे पण या भावी अरिष्टाच्या शान्त्यर्थ ब्राह्मणभोजनें घालीत आहेत असें समजतें सदरहू मूर्तीद्वय कोणती लढाई मारावयास गेले होते तें कोणी शोध लावून कळवील काय?

पंजाबांत येत्या नाताळांत प्रदर्शन भरविण्याची तयारी मोठ्या झपाट्यानें सुरू आहे. प्रदर्शनाला पुष्कळ उत्पन्न होईल असें ह्मणतात.

राष्ट्रीयसभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठीं आन. दादाभाई नौरोजी हे येत्या नोव्हेंबरच्या अखेरीस इकडे येणार आहेत. सु० प०

शिकागो येथील जगद्व्यापी प्रदर्शनापैकीं एका वखारीस आग लागून त्यांत २० मनुष्यांची आहुती झाली. सर्व जगाचें प्रदर्शन त्यांत नारायणाची स्वारी कां नसावी? पु० वै०

विठूच्या पदच्युत केलेल्या सुलतानानें गडबड चालविल्यावरून इंग्रजसरकारची फौज गलबतांतून खाली उतरली व दोन तास कडक लढाई करून विठू शहरास आग लावून दिली या प्रकरणांत इंग्रजांचा एक मेला व दोन जखमी झाले असेंही तीच तार सांगते. आग लावून देण्याचें कारण मोठें सयुक्तिक खरें?

रशियानेंही आपल्या टांकसाळींत चांदीचें नाणें पाडण्याची बंदी केली आहे.

निझामसरकार दिलरजंग उर्फ अबदुल हक यांस पुन्हां चाकरींत ठेवीत आहेत. या बातमीस कांहीं आधार नाहीं असें सांगतात.

कलकत्त्यास मागिल शुक्रवारीं दंगा होणार अशी बातमी असल्यामुळें शहरांत चहूंकडे कडेकोट बंदोबस्त करण्यांत आला होता! मोठी मौज आहे.

लार्ड लान्सडाऊनच्या मागून लार्ड राबर्ट हे हिंदुस्थानचे गव्हरनरजनरल होणार अशी दाट बातमी आहे.

आक्ससच्या शेजारीं सरहद्द या ठिकाणीं रशिया आपलें एक ठाणें बसवीत आहे. सर हद्द हें ठिकाण १८७३ त केलेल्या करारावरून अफगाणहद्दींत येतें असल्यामुळें रशियास आपलें एक ठाणें तेथें स्थापन करण्याचा हक्क पोचत नाहीं असें इंग्रजांचें ह्मणणें आहे.

रशिया आपल्या चवक्या हिरातच्या आंगास पुढें पुढें नेत आहे असें सांगतात.

गव्हारस्तान खिलातच्या आसपास लुटालूट करीतच आहे. ठा० अ०

जबलपूर येथील शुभचिंतक पत्र वरून असें कळतें कीं हरीगांव नांवाच्या खेड्यांत पटवेकरी जातीची एक स्त्री गरोदर असतां कांहीं कारणामुळें तिनें विहीरींत उडी टाकली नजीकच्या लोकांनीं विहीरींत कोणी पडलें असें ऐकून ते जवळ गेले. व तिला विहीरींत पडलेली पाहून वर काढण्याकरितां एक मोट सोडिली. ईश्वरलीला अगाध आहे. ती स्त्री विहीरींत पडल्यावरोबर बाळंत झाली. व मोटेंतून आपण उपजलेल्या मुलासह वर आली ती दोन्हीं अद्यापि सुखरूप आहेत. तारत्या पुढें मारल्याचें कांहींच चालत नाहीं. न्या सु.

शाईचा मक्ता-- युनायटेड स्टेटसमधल्या नोटी छापण्याची जी शाई आहे ती तयार करणारा एकच मनुष्य आहे. ती शाई करण्याची कृती त्या मनुष्याच्या बापानें आरंभीं शोधून काढिली. व त्यानें मरतांना ती या मनुष्याला सांगितली. ती दुसऱ्या कोणालाही करतां येत नाहीं. या शाईबद्दल त्या मनुष्याला दरसाल १०,००० डालर फायदा होतो.

हायकोर्ट जज्जानीं माफी मागितली— हैदराबाद येथील हायकोर्टाचे जज्ज जनाब हाफिस अहमद खानखां हे एका मोकदम्यांतील फैसला सुनावित असतां ज्या वकिलाचे विरुद्ध तो फैसला होता त्यानीं त्याचवेळीं हा फैसला मुराफा (अपील) करण्या योग्य आहे असे शद्ध उच्चारले तेव्हां सदर जज्जांनीं त्यास भर कोर्टांतून बाहेर जाण्याविषयीं हुकूम दिला त्या प्रमाणें अमल बजावणें तर झालीच. परंतु पुढें सदर कोर्टांतील सर्व वकिलांनीं हें कृत्य अदालतीच्या कर्तव्याबाहेर आहे असें कळविलें सदर जज्जानें तेथेंच सर्वांची माफी मागितली असें समजतें. या प्रमाणें वकिलांचे अंगीं पाणी पाहिजे. आणि अमलदार ही थोडेसे समजूतदार पाहिजेत. न्या० सि०

अतिशय जुना वृक्ष — लंका बेटांत अनुराधापूर नांवाचें गांव आहे. त्या गांवांत एक अति जुनाट वृक्ष आहे; तो ३ शें वर्षांपूर्वीं आपल्या अमलांत होता असा दाखला मिळाला आहे जगांत ह्या वृक्षाचें 'आयुष्य' बरेंच प्राचीन काळचें आहे असें समजलें जात आहे.

ईश्वरी योजना.— शिकागोच्या जगद्यात्रेंत अनेक प्रकारचे लहान लहान पतंग, वगैरे फुलपांखरें अतिशयच झालीं होतीं. व त्यापासून लोकांस फार त्रास होत असे इतक्यांत लक्षावधि चिमण्या त्या ठिकाणीं येऊन त्यांनीं ते सर्व त्रासदायक जिव तेथून हुसकून देऊन मारून खाले व लोकांची पीडा दूर केली. ईश्वरी योजना विलक्षण खरी!

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.